


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार १ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## लिओनेल मेस्सीचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा



**अर्जेंटिना/वृत्तसंस्था :** फुटबाल जगतातून एक अत्यंत मोठी बातमी समोर आली आहे. अर्जेंटिनाचा महान फुटबालपटू आणि जागतिक फुटबालचा बादशहा लिओनेल मेस्सी याने आंतरराष्ट्रीय फुटबालमधून अधिकृतपणे निवृत्तीची घोषणा केली आहे. सोशल मीडियावर एका भावनिक पोस्टद्वारे ३९ वर्षीय मेस्सीने आपल्या दोन दशकांच्या दैदीप्यमान आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. आपल्या निवृत्तीच्या निवेदनात लिओनेल मेस्सीने चाहत्यांच्या आणि देशाच्या नावा भावना व्यक्त करताना म्हटले आहे की, हा असा निर्णय होता ज्याचे मला तीव्र दुःख झाले होते आणि आजही मनाच्या एका कोप-यात त्याचे दुःख आहे पण मला समजले आहे की आता योग्य वेळ आली आहे. मी तुम्हाला शपथपूर्वक सांगतो की मी नेहमीच माझे सर्वस्व दिले आहे केवळ या शेवटच्या काही वर्षांतच नाही जेव्हा आपण सर्वकाही जिंकलो, तर त्याआधीपासूनही. (पान २ वर)

# दिल्लीत धावत्या बसमध्ये 16 वर्षीय विद्यार्थिनीवर बलात्कार

## बस 47KM धावत राहिली, काचांवर लावले होते पडदे; चालक-वाहक अटकेत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत एका धावत्या स्लीपर बसमध्ये १६ वर्षीय शाळकरी मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना ४ ऑगस्ट रोजी घडली. पोलिसांनी ३१ ऑगस्ट रोजी त्याबाबतची माहिती दिली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ग्रेटर नोएडा येथील 'परी चौक' येथून बसमध्ये चढली होती. आरोपींनी तेथून तिला 'काश्मिरी गेट' येथे उतरवले. या प्रवासात बसने सुमारे ४७ किलोमीटरचे अंतर कापले. यावेळी बसच्या खिडक्यांना पडदे लावलेले होते.पोलिसांनी या प्रकरणी बस चालक कुलदीप आणि वाहक संदीप यांना अटक केली आहे. त्यांना नेमके कधी अटक करण्यात आली, याबाबतचा तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. पीडित मुलगी उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यातील असून ती इयत्ता




अकरावीची विद्यार्थिनी आहे.

दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार, पीडितेचा मैनपुरी येथील तिच्या घरी वाद झाला होता. त्यानंतर, तिने कुटुंबाला काहीही न सांगता रात्री घर सोडले. ती नोएडामध्ये राहणा-या आपल्या चुलत भावंडाला भेटायला जात होती.मुसळधार पाउस आणि अंधारामुळे ती चुकून 'परी चौक' (Pari Chowk) येथे उतरली. त्याच वेळी, एक रिकामी स्लीपर बस तिथून जात होती. पावसात अडकलेल्या त्या विद्यार्थिनीने बस थांबवण्याचा इशारा केला.चालक आणि वाहकाने तिला बसमध्ये घेतले आणि सांगितले की बस नोएडा सेक्टर-६३ कडे जात आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, बस सुरू झाल्यानंतर काही वेळातच वाहकाने त्या विद्यार्थिनीशी अश्लील वर्तन करण्यास सुरु वात केली.

**विरोध केल्यावर जीवे मारण्याची धमकी-**पीडितेच्या म्हणण्यानुसार, चालक आणि वाहकाने तिच्यावर बलात्कार केला. तिने विरोध केला असता, दोघांनीही तिला जीवे मारण्याची धमकी दिली.आरोप आहे की, त्या दोघांनी मध्यरात्री काश्मिरी गेट बस टर्मिनलसवळील रिंग रोडवर त्या विद्यार्थिनीला उतरवले आणि तेथून पळ काढला. त्याच रात्री, त्या विद्यार्थिनीने काश्मिरी गेट पोलिसांशी संपर्क साधला आणि घडलेला सर्व प्रकार सांगितला. (पान २ वर)

## देशातील ट्रेन आता खासगी कंपन्या चालवणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** आता खासगी कंपन्या भारतात रेल्वे ट्रॅक बांधून त्यावर ट्रेन चालवणार आहेत. यासाठी सहा ठिकाणचे मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. भारतीय रेल्वेचाही यात हिस्सा असणार आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या सार्वजनिक-खासगी भागीदारी मूल्यांकन समितीने अशा प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. हायब्रीड ॲन्युइटी माडेलचा वापर करून देशात सहा रेल्वे कारिडार विकसित करण्याचा हा प्रस्ताव आहे. सध्या ज्या प्रकारचे रेल्वे मार्ग बांधले जात आहेत, त्याच प्रकारचे रेल्वे मार्ग खासगी कंपन्या बांधतील, अशी माहिती देण्यात आली आहे. भारतीय रेल्वेने एकूण ६४७ किलोमीटर लांबीचे सहा रेल्वे मार्ग निश्चित केले आहेत. हे मार्ग हायब्रीड ॲन्युइटी माडेल अंतर्गत बांधले जातील. प्रकल्पाच्या खर्चात खासगी कंपन्या ६० टक्के, तर रेल्वे ४० टक्के योगदान देणार आहे.



दरम्यान, हा प्रस्ताव काही दिवसांतच केंद्रीय मंत्रिमंडळाकडे मंजुरीसाठी पाठवला जाईल. एकदा मंजुरी मिळाल्यानंतर निविदा मागवल्या जातील. विशेष म्हणजे, सार्वजनिक-खासगी भागीदारी सूत्रानुसार नवीन रेल्वे मार्ग प्रकल्प विकसित होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या सहा नवीन रेल्वे मार्गांच्या प्रकल्पाचा अंदाजित खर्च १५,९७६ कोटी रुपये आहे. संपूर्ण सवलत कालावधी विचारात घेतल्यास, या प्रकल्पांचा एकूण भांडवली खर्च ४०,८६६ कोटी रुपये होईल. (पान २ वर)

# 'CJP म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्राम- देवेंद्र फडणवीस

**पुणे/प्रतिनिधी :**आता विचारधारेशी लढाई संपली आहे आणि इश्युची लढाई सुरू झालीय. मात्र या लढाईतही आपण हरणार नाही. विरोधकांच्या कार्यपद्धतीचा योग्य पद्धतीने मुकाबला केल्याशिवाय आपण शांत राहणार नाही. CJP ही केवळ एखादी छोटी संघटना समजू नका. CJP म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्राम आहे. यात जे ४-५ पोरं पुढे दिसतात, त्यांच्यामागे बैठकीत भारत जोडो संघटनेतील त्याच १८० संघटनांतील लोक आहेत, ज्यांनी लोकसभेत नॅरेटिव्ह केला. आता तेच नवीन नाव घेउन मैदानात उतरलेत असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

पुण्यातील महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी सध्याच्या परिस्थितीवर भाष्य केले. ते म्हणाले की, आता ही लढाई फेक नॅरेटिव्हच्या विरोधात आहे. लोकसभेला फेक नॅरेटिव्हला आपण बळी पडलो. त्यानंतर आपण लढाई सुरू केली आणि फेक नॅरेटिव्हला ब्रेक करून थेट नॅरेटिव्ह घेउन जनतेत गेलो. त्यानंतर आपल्याला विधानसभेत मोठे यश मिळाले. आता पुन्हा फेक नॅरेटिव्ह फॅक्टरीला सुरुवात झाली आहे. आता कार्यपद्धतीत बदल झालेला आहे. काँग्रेससारखा पक्ष ते आपल्याशी लढू शकत नाही हे त्यांना माहिती आहे. ज्यावेळी ते आपल्याला प्रश्न विचारतात तेव्हा एक बोट आपल्याकडे आणि चार बोटे त्यांच्याकडे असतात. त्यांनाही जनता प्रश्न विचारते, तुम्ही काय केले सांगा..मग मोदींच्या १२ वर्षाच्या कारभारासमोर काँग्रेसचा ५० वर्षाचा कारभार खुजा दिसतो. त्यांच्या राज्यातील भ्रष्टाचार, पेपरफुटी या गोष्टींची त्यांना उत्तरे देता येत नाहीत. लोकसभेपूर्वी काँग्रेसने भारत जोडो नॅरेटिव्ह केला होता. हा काँग्रेसचा नॅरेटिव्ह नव्हता तर त्यात १८० अशा संघटना होत्या ज्यांच्यावर अर्बन नक्षलवादाचा आरोप होता. त्यांना कुठलीही विश्वासार्हता नसते. त्यांना निवडणूक लढवायची नसते. कुठलीही उत्तरे द्यायची नसतात. त्यामुळे ते रोज खोटे बोलायचे, आपण त्यांना उत्तरे द्यायची असा हा नॅरेटिव्ह होता. आता ही लढाई विचारधारेची नाही तर ही लढाई इश्युवर आणली आहे. विचारधारेची लढाई त्यांनी केली पण त्यात यशस्वी होउ शकले नाहीत असं त्यांनी म्हटलं. तसेच आता ते विचारधारेवर बोलत नाही आता ते इश्युवर बोलतात. कुठली शाळा चांगली आहे, कुठे काय चाललंय? जिल्हा परिषदेच्या शाळांपैकी ७०-७५ टक्के शाळा चांगल्या आहेत. २५ टक्के शाळा चांगल्या नाहीत, या चांगल्या करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. आमच्या जिल्हा परिषदेच्या अनेक




शाळा अशा आहेत जिथे प्रवेशासाठी रांगा लागल्या आहेत. अनेक शाळा इतकं चांगले काम करत आहेत, मात्र त्यापैकी एकही शाळा या लोकांना दिसत नाही. ज्या शाळेत नवीन वर्ग खोली बनली आहे, (पान २ वर)

## महादेवाचे दर्शन करून परततांना तिघे ठार,7 गंभीर

**किनवट/इस्लापुर (नांदेड)-** मराठवाड्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या सहस्त्रकुंड धबधब्याचा आनंद घेउन महादेवाचे दर्शन घेतल्यानंतर तेलंगणाकडे परतणा-या भाविकांच्या कमांडर जीपचा भीषण अपघात झाला.तोटंबा जंगल घाटात चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने जीप रस्त्या लगतच्या झाडावर जोरदार आदळली.या भीषण दुर्घटनेत तिघे जण जागीच ठार झाले असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात सोमवारी दि.३१ ऑगस्ट सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडला. तुम सायलू(६०),तुम गौरा बाई (६०)आणि आवला गंगाधर (५५)(सर्व रा.पार्डी,ता.कुबेर,जि. निर्मल,तेलंगणा) अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या भाविकांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार,तेलंगणातील निर्मल जिल्ह्यातील कुबेर मंडळांतर्गत येणा-या पार्डी येथील १० ते १२ भाविक सोमवारी एपी २५ एएच ६७४७ क्रमांकाच्या कमांडर जीपने नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील सहस्त्रकुंड येथे आले होते.धबधब्याचे मनमोहक रूप पाहिल्यानंतर आणि येथील श्री महादेव मंदिराचे दर्शन घेतल्यानंतर सायंकाळच्या सुमारास सर्वजण जीपने आपल्या गावाकडे परत निघाले होते. भाविकांची जीप सीमावर्ती भागातील तोटंबा गावाजवळील जंगल घाटात आली असता, भरधाव वेगातील जीपवरील चालकाचा ताबा अचानक सुटला.त्यामुळे नियंत्रण सुटलेली जीप रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या झाडावर जाउन थेट आदळली. हा अपघात इतका भीषण होता की,कमांडर जीपचा अक्षरशः चुराडा झाला.

## सीजेपीच्या मोर्च्यावर बंदीस सर्वोच्च नकार

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत होणा-या कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) च्या मोर्चावर बंदी घालण्यास नकार



दिला. न्यायालयाने म्हटले की, या मोर्चामुळे कोणतीही अप्रिय घटना घडेल, असे मानण्याचे कोणतेही ठोस कारण नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी सांगितले की, प्रशासनाकडून अपेक्षा आहे की ते कायदा व सुव्यवस्था राखतील आणि सर्व पक्षांनी जबाबदारीने व कायद्यानुसार काम करावे याची खात्री करतील. ही याचिका निवृत्त दिल्ली पोलिस अधिकारी राजेंद्र सिंह यांनी दाखल केली होती. त्यांनी म्हटले की, दिल्लीत होणा-या ब्रिक्स परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोठ्या मिरवणुका आणि निदर्शनांना परवानगी देउ नये. काकरोच जनता पार्टीने शनिवारी सरकारवर मागण्या पूर्ण न केल्याचा आरोप केला. सीजेपीने एक्स वर लिहिले की, सरकार प्रत्येक वेळी अपूर्ण आश्वासने देउन वाचू शकत नाही.सरकारसमोर ठेवलेल्या चारपैकी तीन मागण्या अजूनही अपूर्ण आहेत. पहिली विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना नुकसान भरपाई दिली जावी. दुसरी विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेली एफआयआर मागे घेतली जावी आणि कोणतीही कारवाई केली जाउ नये. तिसरी आरएएफ आणि दिल्ली पोलिसांनी माफी मागावी. काकरोच पार्टी ५ सप्टेंबर रोजी पुन्हा दिल्लीत मोर्चा काढणार आहे. त्यांनी लोकांना यात सहभागी होण्याचीही विनंती केली.५ सप्टेंबर रोजी मोर्चा इंडिया गेटपासून सुरू होउन नवी दिल्ली पोलीस मुख्यालयापर्यंत जाईल. यामध्ये नीट पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांचे कुटुंबीयही सहभागी होतील. २४ ऑगस्ट रोजी उखढ ने आपल्या कार्यकारी समितीच्या व्हर्च्युअल बैठकीनंतर हा निर्णय घेतला होता. पक्षाने म्हटले की, सरकारने सांगितले होते की विद्यार्थ्यांवरील दाखल केलेले खटले रद्द होतील, पण तसे झाले नाही. त्यांनी आमच्या संयमाला कमजोरी समजू नये.

## तांत्रिक बिघाडामुळे 'नीट-पीजी' परीक्षेत गोंधळ

**जयपूर :** वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट-पीजी २०२६ परीक्षेला जयपूरमधील दोन केंद्रांवर तांत्रिक बिघाडाचा फटका बसला. सिटापुरा येथील दोन केंद्रांवर परीक्षा उशिराने सुरू झाली. त्यानंतर परीक्षा सुरू असतानाच संगणक वारंवार बंद पडल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. या प्रकारामुळे गोंधळ निर्माण झाला. संतप्त विद्यार्थ्यांनी केंद्राबाहेर येत आंदोलन केले. सिटापुरा येथील आयऑन डिजिटल झोनच्या दोन केंद्रांवर सकाळी ९ वाजता परीक्षा सुरू होणे अपेक्षित होते. मात्र, परीक्षा सुरू होण्यास विलंब झाला. परीक्षा सुरू झाल्यानंतरही संगणक प्रणाली वारंवार बंद पडत होती. सहा ते सात वेळा ही समस्या निर्माण झाल्याचा दावा करण्यात आला. काही विद्यार्थ्यांनी त्याहून अधिक वेळा संगणक बंद पडल्याचे सांगितले. संगणक पुन्हा सुरू झाल्यानंतर काही विद्यार्थ्यांच्या पडद्यावर मोजकेच प्रश्न दिसले व पुन्हा संगणक बंद पडल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. तांत्रिक बिघाडामुळे अनेक विद्यार्थी परीक्षा केंद्राबाहेर आले. त्यांनी केंद्राच्या तांत्रिक व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करत आंदोलन केले.

# छत्रपती शिवरायांच्या शेजारी असलेला मोदींचा फोटो हटवला

**पुणे /प्रतिनिधी-** पुण्यातील एका कालेजमध्ये अमित ठाकरे पोहोचले. या कॉलेजमध्ये पोहोचल्यानंतर अमित ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली. त्यांनी कालेजमधील वसतिगृह अधीक्षकांच्या कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोशेजारी असलेला पंतप्रधान मोदींचा फोटो हटवायला लावला. फोटो हटवण्याचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातून मोठी राजकीय घडामोड समोर येत आहे. पुण्यातील सरकारी तंत्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणा--या सुविधांची पाहणी करण्यास गेलेले मनसे नेते अमित ठाकरे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेची जोरदार चर्चा होत आहे. या कॉलेजमध्ये गेल्यावर अमित ठाकरे यांनी कँटिनमध्ये मिळणारे जेवण आणि खेळाडूंना प्रशिक्षक मिळत नसण्यावरून कॉलेजच्या अधीक्षक, मुख्याध्यापकांना



जाब विचारला. यावेळी एका विद्यार्थ्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूला पंतप्रधान मोदींचा फोटो असल्याचे सांगितले.

त्यानंतर अमित ठाकरे यांनी मोदींचा फोटो काढण्यास सांगितला. त्यानंतर मनसे कार्यकर्त्याने तातडीने पंतप्रधान मोदींचा फोटो खाली उतरवला. फोटो काढतानाचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. आता फोटो हटवण्यावरून राजकीय वाद पेटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुणे दौ-यावर असलेले अमित ठाकरे हे पुण्यातील सात कालेजला भेट देणार आहेत. तसेच कालेजमधील जेन-झी विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. त्यांच्या दौ-याच्या पार्श्वभूमीवर पुण्यात अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ते पुण्यात शैक्षणिक भ्रष्टाचाराची दहीहंडी फोडणार आहेत. त्याचबरोबर कालेजबाहेर सिगारेट, गुटखा विक्रीविरोधातही कारवाईची मागणी करणार आहेत.

## अमित ठाकरेंवर तातडीने गुन्हा दाखल करा

**पुणे / प्रतिनिधी-** मनसेचे नेते अमित ठाकरे हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. पुणे दौ-यावर असताना त्यांनी




शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाला भेट दिली. या भेटीमध्ये त्यांच्यासोबत मनसेचे काही कार्यकर्ते होते. विद्यालयाच्या वसतिगृह अधीक्षकाच्या कार्यालयात पोहोचल्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोवरून आक्षेप घेतला. छत्रपती शिवरायांच्या फोटोच्या बाजूला मोदी यांचा फोटो लावायचा नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यानंतर मोदी यांचा फोटो हटवण्यात आला. आता याच फोटो हटवण्यावरून (पान २ वर)

## धर्मांतर केल्याने जात संपुष्टात येत नाही

### इस्लाम धर्म स्वीकारल्याने ओबीसी प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या नगरसेविकेला मोठा दिलासा

**मुंबई / प्रतिनिधी-**धर्मांतर करून इस्लाम धर्म स्वीकारला म्हणून आगरी ओबीसी जात आपोआप संपुष्टात येत नाही आणि तो लाभ नाकारता येत नाही, हा उरण नगर परिषदेतील काँग्रेसच्या नगरसेविका नंदा नामदेव म्हात्रे उर्फ नाहिदा इरफान ठाकूर यांचा युक्तिवाद ग्रा धरत मुंबई उच्च न्यायालयाने रायगड जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा निर्णय रद्दबातल ठरवला आहे. तसेच, याविषयी राज्य सरकारच्या २९ जानेवारी १९८३ रोजीच्या आणि ३ जून १९९६ रोजीच्या शासन निर्णयांचा (जीआर) विचार करून म्हात्रे यांना फेरसुनावणी द्या आणि २३ नोव्हेंबरपर्यंत नव्याने निर्णय द्या, असा आदेशही न्यायालयाने समितीला दिला आहे. समितीकडून नव्याने निर्णय दिला जाईपर्यंत तसेच याचिकाकर्तीच्या विरोधात निर्णय आल्यास त्या तारखेपासून पुढील दोन आठवड्यांपर्यंत नगर परिषदेने तिच्या नगरसेवकपदाविषयी निर्णय घेउ नये, असेही न्या. रियाझ छागला व न्या.



फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठाने नुकत्याच दिलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे. गेल्या वर्षीच्या उरण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक-अ मधून नंदा उर्फ नाहिदा या २१ डिसेंबर २०२५ रोजी ओबीसी आगरी प्रवर्गातून निवडून आल्या. मात्र, त्यांनी धर्मांतर करून मुस्लिम व्यक्तीशी विवाह केला आणि इस्लाम धर्म स्वीकारला असल्याने त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असे कारण (पान २ वर)

# खजिना राहिला सुरक्षित!

## महापुरातून बाहेर काढली तिजोरी; 1.5 कोटी रोकड, 50 कोटींचे सोने

**काठमांडू /वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरानंतर आता हळूहळू तिथले जनजीवन मार्गावर येत आहे. या भयानक पुराचे पाणी ओसरल्यानंतर नेपाळ पोलिसांनी एका बँकेतून कोट्यवधीची कॅश, सोने आणि आवश्यक कागदपत्रे सुरक्षित बाहेर काढली आहे. यासाठी पोलिसांनी ८ तास अभियान राबवले होते.माहितीनुसार, पोलिसांनी पूरग्रस्त भागातील एग्रीकल्चर डेवल्पमेंट बँक त्रिशूली शाखेच्या तिजोरीतून दीड कोटी रोकड आणइ ५० कोटी किंमतीचे सोने बाहेर काढले आहे. त्याशिवाय बँकेची आवश्यक कागदपत्रे आणि महत्त्वाची रेकार्डही सुरक्षित बाहेर काढलेत. बँकेतून बाहेर काढलेली रक्कम, सोने आणि इतर कागदपत्रे कडेकोट बंदोबस्तात एका सुरक्षितस्थळी पोहचवली आहेत. या अभियानात बँकेची संपत्ती सुरक्षित ठेवण्यावर पोलिसांनी विशेष भर दिला.

**नेपाळ पोलिसांनी केला व्हिडिओ शेअर-** नेपाळ पोलिसांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफार्मवर संपूर्ण अभियानाची माहिती दिली. पोलिसांनी बँकेतून रोख रक्कम, सोने आणि महत्त्वाची कागदपत्रे काढण्याचा प्रयत्न करणा-या कर्मचा-यांचा एक व्हिडिओ देखील प्रसिद्ध केला. सुमारे आठ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बँकेतून अंदाजे १.५ कोटी रुपये रोख, अंदाजे



५० कोटी रुपये किमतीचे सोने आणि महत्त्वाची कागदपत्रे सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आली. त्यानंतर या सर्व वस्तू सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्यात आल्या असं नेपाळ पोलिसांनी सांगितले. दरम्यान, विनाशकारी पूर आणि भूस्खलनाचा सामना करत असतानाच नेपाळ पोलिसांकडून ही मोहीम राबवण्यात आली आहे. पूर आणि भूस्खलनाने अनेक भागांमध्ये हाहाकार माजवला असून शेकडो लोकांचा बळी घेतला आहे. अनेक भागांमध्ये पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या मृतदेहांची ओळख पटवणे कठीण झाले आहे. अधिका-यांनी ओळख न पटलेल्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यास सुरुवात केली आहे.

## सीएनजीच्या दरात प्रतिकिलो 2 आणि घरगुती गॅसच्या दरात एक रूपयाची वाढ

**मुंबई :** मुंबई आणि महानगर परिसरात महानगर गॅस लिमिटेडने (एमजीएल) सीएनजीच्या दरात प्रति किलो २ रुपयांनी, तर घरगुती पीएनजीच्या दरात १ रुपयांची वाढ केली आहे. ही दरवाढ आज, १ सप्टेंबरपासून लागू होणार आहे. दरवाढीमुळे मुंबई आणि परिसरात आता सीएनजी प्रति किलो ८८ रुपये झाला आहे, यामुळे सामान्यांचा प्रवास येत्या दिवसात महागणार आहे.मध्य पूर्वेतील युद्धाच्या संकटामुळे आंतरराष्ट्रीय निर्देशांकांशी निगडित इनपुट गॅसच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. या वाढीमुळे एमजीएलने सीएनजीच्या दरात वाढ केली आहे. सीएनजीला मोठी मागणी असून, सीएनजी विभागासाठी लागणा-या इनपुट गॅसचा मोठा भाग आयात केलेल्या स्पाट RLNG द्वारे पूर्ण केला जातो. यामुळे सीएनजीसाठी लागणा-या इनपुट गॅसच्या खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. वाढलेली सीएनजीची मागणी पूर्ण करण्यासाठी एमजीएलला आता जास्त दराने स्पाट RLNG मधून गॅस मिळवावा लागत आहे. इनपुट गॅसच्या किमतीतील वाढीमुळे कंपनीद्वारे पुरवठा होणा-या गॅसच्या एकूण खर्चावर लक्षणीय परिणाम झाला आहे. इनपुट गॅसच्या वाढत्या खर्चाची अंशत? भरपाई करण्यासाठी आणि आपल्या ग्राहकांना सीएनजीचा निरंतर व शाश्वत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी एमजीएलने सीएनजीची किमती २ रुपये प्रति किलोने वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. दरवाढीचा परिणाम मुंबई महानगर प्रदेश म्हणजे एमएमआरमध्ये सीएनजीवर चालणा-या सुमारे १२ लाख वाहनांवर होण्याची शक्यता आहे.



पान १ व १० वरून

## प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

दर्यापूर विधानसभा मतदार संघात १ लाख ४२ हजार ९८४ पुरूष, तर १ लाख ३२ हजार ८६५ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ७५ हजार ८५२ मतदार नोंदण्यात आले आहेत. मेळघाट विधानसभा मतदार संघात १ लाख ४० हजार ६१० पुरूष, तर १ लाख ३३ हजार ११२ महिला मतदार आणि ७ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ७३ हजार ७२९ मतदार नोंदण्यात आले आहेत.

अचलपूर विधानसभा मतदार संघात १ लाख ३१ हजार २१५ पुरूष, तर १ लाख २२ हजार ८३ महिला मतदार असे एकूण २ लाख ५३ हजार २९८ मतदार नोंदण्यात आले आहेत. मोर्शी विधानसभा मतदार संघात १ लाख ३४ हजार ८०३ पुरूष, तर १ लाख २७ हजार ६५१ महिला मतदार असे एकूण २ लाख ६२ हजार ४५४ मतदार नोंदण्यात आले आहेत.

**३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळली-** प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीतून १ लाख ९ हजार ३०७ मय्यत, आढळून नआलेले २२ हजार ३५७, कायम स्तलांतरीत १ लाख ६४ हजार ५१३ आणि ९७८ इतर तसेच ५६ हजार १४२ आधिच नोंदलेले मतदार अशा एकूण ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघातील १० हजार ६८१ मय्यत, आढळून न आलेले १ हजार ४९५, कायम स्तलांतरीत २३ हजार ६९४ आणि ८४ इतर तसेच ४ हजार ४८३ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ४० हजार ४३७ मतदार वगळण्यात आले आहेत. बडनेरा विधानसभा मतदार संघातील २३ हजार ६६७ मय्यत, आढळून नआलेले ३ हजार ५२३, कायम स्तलांतरीत २५ हजार ९८३ आणि २६४ इतर तसेच १० हजार ३३१ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ६३ हजार ७६८ मतदार वगळण्यात आले आहेत.

अमरावती विधानसभा मतदार संघातील १८ हजार ९२० मय्यत, आढळून नआलेले ९ हजार २४९, कायम स्तलांतरीत ३० हजार ५१५ आणि १३६ इतर तसेच १६ हजार ९७६ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ७५ हजार ७९६ मतदार वगळण्यात आले आहेत. तिवसा विधानसभा मतदार संघातील १४ हजार ७८० मय्यत, आढळून नआलेले २ हजार ६४, कायम स्तलांतरीत २३ हजार ७३२ आणि ८७ इतर तसेच ७ हजार ६५९ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ४८ हजार ३२२ मतदार वगळण्यात आले आहेत.

दर्यापूर विधानसभा मतदार संघातील ८ हजार ६८८ मय्यत, आढळून नआलेले १ हजार १७५, कायम स्तलांतरीत १७ हजार ८६५ आणि ११७ इतर तसेच २ हजार ३३१ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ३० हजार १७६ मतदार वगळण्यात आले आहेत. मेळघाट विधानसभा मतदार संघातील १३ हजार २८६ मय्यत, आढळून नआलेले १ हजार ८०५, कायम स्तलांतरीत १२ हजार ४५५ आणि १२७ इतर तसेच ६ हजार ३५० आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ३४ हजार २३ मतदार वगळण्यात आले आहेत.

अचलपूर विधानसभा मतदार संघातील १० हजार २१० मय्यत, आढळून नआलेले १ हजार ४६२, कायम स्तलांतरीत १८ हजार ८६७ आणि ५७ इतर तसेच ३ हजार ६९० आधिच नोंदलेले मतदार असे एकूण ३४ हजार २८६ मतदार वगळण्यात आले आहेत. मोर्शी विधानसभा मतदार संघातील ९ हजार ७५ मय्यत, आढळून नआलेले १ हजार ५८४, कायम स्तलांतरीत ११ हजार ४०२ आणि १०६ इतर तसेच ४ हजार ३२२ आधिच नोंदलेले मतदार असे एकूण २६ हजार ४८९ मतदार वगळण्यात आले आहेत.

**जिल्ह्यात २२ मतदान केंद्रांची वाढ-** प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होण्यापूर्वी नवीन प्रस्तावित मतदान केंद्र व समायोजन मतदान केंद्र याद्वारे मतदान केंद्रांचे सुसूत्रिकरण करण्यात आले आहे. यानुसार अस्तित्वात असलेल्या २ हजार ६८२ मतदान केंद्रांची संख्या वाढून २ हजार ७०४ झाली आहे. बडनेरा विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३४५ वरून वाढून ३५४ झाली आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३२२ वरून वाढून ३२८ झाली आहे. मेळघाट विधानसभा मतदार संघात मतदान केंद्रांची संख्या ३५६ वरून वाढून ३६३ झाली आहे. अमरावती जिल्ह्यातील सर्व पात्र मतदारांनी आणि वगळण्यात आलेल्या मतदारांनी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व आक्षेप नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. १ आक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नव मतदारांनी फॉर्म क्रं. ६ भरून मतदार यादीत नाव नोंदवावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्याची

पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, बिलालने हे टोकाचे पाऊल कोणत्या कारणातून उचलले, याचा अद्याप उलगडा झालेला नाही. पोलिसांकडून त्याच्या वैयक्तिक परिस्थितीचा तसेच मोबाईल व इतर बाबींचा तपास केला जाणार असून, कुटुंबीय, मित्र आणि महाविद्यालयाशी संबंधित व्यक्तींकडूनही माहिती घेतली जाणार आहे. गाडगेनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

## अचलपूर नाका ते माळवेशूपुरा गेट

नागरिकांकडून होत आहे.आणि दोन्ही बाजूने नाली चे बांधकाम न झाल्याने दोन्ही बाजूने पाणी साचत आहे. या रस्त्यावर बिच्छन नदीचे पुल आहे .या पुलाचे बांधकाम संबंधित ठेकेदार करणार का ? सुरक्षा कठड्याची निर्मिती करणार का ? स्ट्रीट लाईट ची निर्मिती करणार का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.यामुळे शासनाचा साडे अकरा कोटीच्या निधीतून या रस्त्याचे कायापालट न होता या उलट मनमर्जीप्रमाणे रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे बांधकाम होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.यामुळे अचलपूर शहराकडे जाण्यासाठी हा महत्त्वपूर्ण रस्ता असल्याने अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाचे अभियंता आता तरी लक्ष देणार का ? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित ठेकेदाराने अचलपूर - परतवाडा जुळ्या शहरातील मुख्य रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे बांधकाम केले आहे.विदर्भ मील परिसरातील त्या मुख्य रस्त्यावर जागोजागी भेगा पडल्या आहे.आणि फायबर चे लावलेले गतिरोधक सुद्धा गायब झाले आहे .यामुळे संबंधित ठेकदाराचा बांधकामाचा दर्जा बाबत ही अनेक प्रश्न निर्माण झाले आहे ? याबाबत आता अचलपूर नगर परिषद कोणती कारवाई करणार ? हे लवकरच स्पष्ट होणार आहे .या संदर्भात संबंधीत प्रतिनिधीने अचलपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांची प्रतिक्रिया घेतली असता त्यांनी सांगितले की,याबाबत संबंधित अभियंत्याकडून संपूर्ण माहिती घेऊन पुढील कारवाई केली जाणार आहे.

## अतिदक्षता विभागाची नव्याने

या रूग्णालयाचा कोणताही प्रस्ताव जिल्हा नियोजन कार्यालयाकडे प्रलंबित नाही. रूग्णालयातील प्रस्तावांबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती असून या समितीकडून छाननी केल्यानंतरच प्रस्ताव नियोजनकडे सादर केले जातात. येत्या कालावधीत अतिदक्षता कक्ष हा एम्सच्या मानकानुसार तयार करण्यात येईल. याठिकाणी जागतिक दर्जाचे उपकरणे बसविण्यात येतील. यात कोणतीही त्रृटी राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल. जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासाठी निधीची करतरता भासू देणार नसल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

यावेळी स्वप्नील बोरंगे, प्रफुल्ल चोपडे, गंगाराम बेठेकर या पालकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहिर केलेल्या पाच लाख रूपयांचा धनादेश पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. तसेच खासगी रूग्णालयांनी शिशूंवर मोफत उपचार केल्याबद्दल आभार मानले.

## अंजनगाव सुर्जी येथिल माऊली

समस्या आहे' अशी कारणे सांगितली जात आहेत. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे बँक मॅनेजरकडून प्रत्येक ग्राहकाला 'दहा दिवसांनंतर पैसे मिळतील' असे आश्वासन दिले जात आहे, परंतु तो दहा दिवसांचा कालावधी गेल्या महिनाभरापासून संपतच नाहीये.या बँकेत अनेक ठेवीदारांच्या लाखो रुपयांच्या मुदत ठेवी, दैनंदिन बचत आणि आवर्ती ठेवी आहेत. स्वतःच्या कष्टाचा पैसा मिळत नसल्याने ठेवीदारांच्या मनात आता धडकी भरली आहे. अंजनगाव सुर्जी येथील ठेवीदार राजेंद्र झाडे यांनी या गंभीर प्रकरणी बँकेचे सीईओ निकेत धोटे यांच्याशी यांचेशी ग्राहकासमोर चर्चा केली. मात्र, त्यांचेकडूनही कोणतेही समाधानकारक आणि ठोससास्थ उत्तर मिळाले नाही तेव्हा झाडे यांनी बँकेच्या जनरल म?नेजर सोबत संवाद साधला परंतू तेथेही योग्य उत्तर मिळाले नाही.

या बाबत शाखा व्यवस्थापकांना विचारणा केली असता, त्यांनी 'पुढील पाच ते सहा दिवसात सर्व व्यवहार सुरळीत करण्यात येतील' असे आश्वासन दिले आहे. मात्र वारंवार मिळणाऱ्या अशा आश्वासनांमुळे ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास उडाला असून, 'आमचे पैसे परत मिळणार तरी का?' असा सवाल ते उपस्थित करत आहेत.लग्न, आजारपण, शेतीची कामे आणि मुलांच्या शिक्षणासाठी ठेवलेले पैसे ऐनवेळी मिळत नसल्याने अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत. बँक बुडणार तर नाही ना? अशी भीती आता व्यक्त केली जात आहे.या प्रकरणी सहकार विभाग आणि मल्टीस्टेट सोसायटीच्या नियामक मंडळाने तातडीने लक्ष घालून ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण द्यावे आणि बँकेच्या आर्थिक स्थितीची सखोल चौकशी करावी, अशी मागणी बंडूभाऊ हतोडकर, सचिन जायदे, राजेंद्र झाडे, कुलदीप पाटील मुरतकर,झव्वर या ठेवीदारांकडून करण्यात आली आहे.

## खारवगळ नाल्यावर पूल बांधा,

वाढल्यानंतर शेतकरी व शेतमजुरांचा शेतीकडे जाणारा मार्ग धोकादायक बनतो. अनेकदा अचानक पूर आल्याने शेतकरी व शेतमजूर शेतात अडकून पडण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, नाल्याच्या पाण्यामुळे परिसरातील शेती पाण्याखाली जाऊन पिकांचे नुकसान होत असल्याचेही शेतकऱ्यांनी सांगितले. बेंबळा धरणामुळे पावसाळ्यात पाण्याची पातळी वाढते. तसेच खारवगळ नाल्याचे पाणी चंद्रभागा नदीत सुरळीतपणे प्रवाहित न झाल्याने पाणीसाठा वाढतो, असा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत नाल्याचे खोलीकरण झाल्यानंतर गेल्या १५ ते १७ वर्षांपासून या नाल्यात मोठ्या प्रमाणात पाणीसाठा राहत असल्याचेही निवेदनात नमूद आहे. खारवगळ नाल्यावर पुलासाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे निवेदने दिली आहेत. सन २०१७ मध्ये तत्कालीन खासदार रामदास तडस यांनी डीपीडीसीच्या माध्यमातून पुलाच्या निधीसंदर्भात पत्र दिले होते. मात्र त्यानंतरही निधी मंजूर झाला नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मागील वर्षी आमदार प्रताप अडसड यांनीही पुलाचे काम प्राधान्याने करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र अद्याप प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. खारवगळ नाल्यावर तातडीने पक्का पूल बांधण्याचा निर्णय घेऊन त्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करावी, निधी मंजूर करावा, नाल्याच्या पाण्यामुळे होणारे पिकांचे नुकसान थांबविण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, बेंबळा धरण व खारवगळ नाल्याच्या पाणीप्रवाहाचा तांत्रिक अभ्यास करून योग्य निचऱ्याची व्यवस्था करावी तसेच पुलाच्या प्रलंबित प्रस्तावाची सद्यस्थिती शेतकऱ्यांना लेखी स्वरूपात कळवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.येत्या एका आठवड्यात पुलाच्या कामाबाबत ठोस निर्णय घेऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण न केल्यास ७ सप्टेंबरपासून खारवगळ नाल्याजवळ आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देतांना उपसरपंच अनिल वानखडे, शेतकरी संजय गिरुळकर, शेख अंबीर शेख मुनीर, सुरेंद्र काकडे, आशीष बेंद्रे, राजू घुगरे, विजय मेश्राम, अशोक देशमुख, अमोल देशमुख, मनोहर उके, विजय मलोडे, लखपती मेश्राम, मारोती मेश्राम, अमोल बेंद्रे, प्रवीण धांदे, पांडुरंग भोयर, जनार्दन शेंडे, मनोज ढोके, विनय गोटेफोडे, मेहबूब खा पठाण, अनंत भोयर, हरीशाम कडू, ईश्वर भोयर, मधुकर शेंडे, सुरेश सहारे, अनिल सहारे, अतुल जवंजाळ, सुनील चनेकार, संजय मेश्राम, अश्विनी तुपट, अमर बनकर, अरुण परसोडकर, संजय काकडे, बाबुराव काकडे, नितेश बनकर, मोरेश्वर चनेकार यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## मेंढपाळांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सोबत झालेल्या मुंबईत बैठकी मध्ये राज्य सरकारने मेंढपाळ बांधवांसाठी जीआर काढला मात्र त्याची अंमलबजावणी नीट केली जात नाही असा आरोप करण्यात आला. त्यामुळे शासन निर्णयाची स्थानिक पातळीवर अंमल बजावणी करावी, २७ वनविभागांमध्ये स्थानिक परिस्थिती बघून मेंढ्यांसाठी चराईची जागा तात्काळ ठरवून द्यावी. मेंढपाळांना वनात अनावश्यक अडवणूक, दंड किंवा त्रास देऊ नये, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी, वन ,महसूल, पशुसंवर्धन, मेंढपाळ प्रतिनिधी यांची बैठक घेऊन चराई क्षेत्र फायनल करावे, राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेचा लाभ थेट मेंढपाळांपर्यंत पोहोचवावा. आणि जीआरची अंमल बजावणी कोणत्या जिल्ह्यात किती झाली याचा जिल्हानिहाय अहवाल जाहीर करावा,आम्ही शासनाच्या विरोधात नाही, आम्ही निर्णयाचे स्वागत करतो पण निर्णय फक्त फाईलमध्ये नको. प्रत्येक मेंढपाळाला प्रत्यक्ष फायदा मिळाला पाहिजे अशी मागणी करत मेंढपाळानी जोरदार आंदोलन केले. या आंदोलनानंतरही जर प्रशासन जागे नाही झाले तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## बसपाचे जिल्हाधिकारी कार्यालयावर

आहे. अनेक युवक या व्यसनामुळे अवेळी काळाच्या तोंडी गेले आहेत. काही कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. या साठीच बसपाने नशामुक्त फ्रेझरपुराचा मुद्दा हाती घेतला आहे. यापूर्वीही या मागणीसाठी परिसरात आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने लवकरात लवकर प्रश्नाचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले होते पण अजून पर्यंत यावर कोणताही निर्णय नाही झाला. यामुळे परिसरातील नगरसेवकांनी नागरिकांनी पुन्हा आंदोलन करण्याचा निर्धार केला आहे. प्रभागातील नगरसेवक सचिन वैद्य, इस्लाम भाई लालूवाले नगरसेविका विद्या माटे यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या आंदोलनामध्ये राजू गजभिये, सुरेश मेश्राम, नीलेश बनसोड, धनराज गुल्हाने, दीपक पाटील, योगीराज रोटगे, प्रफुल्ल लोखंडे, अश्विनी लोखंडे, सुजल बनसोड, यश काळे, आशिष जामनेकर, अनिल माटे, कांता बनसोड, संगीता पाटील, स्वाती वैद्य, अनिता मेश्राम, किरण शहारे, रवी मेश्राम, गौरव माटे, मीना डोंगरे, रंजना मंडे, विवेक शहारे, पांडुरंग सवई, यश काळे, भावना खोब्रागडे, अश्विनी लोखंडे, करुणा पाटील, वर्षा रामटेके, रेखा रामटेके, शोभा वाहने सह परिसरातील नागरिकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## उपवर्गीकरणावरून संघर्ष पेटवण्याचे

दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ सोमवार रोजी दुपारी २ वाजता चांदुर रेल्वे येथे भेट दिली असता सर्वप्रथम नगरपरिषद समोरील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला संघर्ष चेतना मार्चचे प्रणेते चरणदास इंगोले यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन उपवर्गीकरण विरोधी लढा अधिक तीव्र करण्याचा व जिंकण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला आहे.

त्यानंतर २.३० वाजता राज्याचे मुख्यमंत्री यांच्या नावाने एस.डी.ओ.यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले.

चरणदास इंगोले यांच्या नेतृत्वात निवेदन देताना निवेदन देताना चांदुर रेल्वे तालुक्यातील ज्येष्ठ रिपब्लिकन नेते नानासाहेब डोंगरे, माजी नगरसेवक बंडू आठवले, पिरीपाचे चांदूर तालुकाध्यक्ष बबन मोहोड, उमेश गोंडाणे, जानराव वाटाणे,रोशन मोहोड,मनोज हरणे,अनंता कांबळे ,निवृत्ती शेंडे,विष्णू खडसे, श्रीकांत शेंडे दादाराव इंगळे,योगीदूत चतुर,सुधीर स्थूल, संजय खोब्रागडे,शेखर मोटघरे ,कोसम लोणारे,रमेश घोडेस्वार,देवानंद गवई ,आनंद भगत,नरेश स्थूल,प्रभाकर भगत,गोवर्धन नाईक समाधान वानखडे, दीपक शंभरकर यांच्य सह अनेक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

## तरुणीवर अत्याचार,

करून मदतीसाठी आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला. मात्र, घरातील टीव्हीचा आवाज मोठा असल्याने तिचा आवाज बाहेर गेला नाही, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यावेळी आरोपीने पीडितेच्या तोंडावर हात ठेवून तिला व तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

घटनेनंतर आरोपीकडून सातत्याने धमक्या मिळत असल्याने आणि भीतीपोटी पीडितेने तत्काळ पोलिसांत तक्रार केली नाही. अखेर धैर्य एकवटून तिने ३० ऑगस्ट रोजी पहाटे दर्यापूर पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली.

या प्रकरणी दर्यापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ६४(२), ७५(२), ७८(२), ३५१(३) तसेच बाल लैंगिक अत्याचारासंबंधीच्या कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी प्रकरणाचा तपास सुरू केला असून आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

नगर पंचायत कार्यालय, ढाणकी
जाहीर दरपत्रक मागणी नोटीस

या नोटीसद्वारे सर्व कंत्राटदार / पुरवठा धारकांना कळविण्यात येते की, ढाणकी नगर पंचायतीद्वारे हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान अंतर्गत विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. तरी त्या अंतर्गत विकास कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता दरपत्रक दिनांक ०१.०९.२०२६ ते दिनांक ०७.०९.२०२६ पर्यंत मागविण्यात येत आहेत. एक किंवा सर्व दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार नगर पंचायतीने राखून ठेवण्यात आलेला आहे. या दरपत्रकांच्या पुर्व अर्हता अटी व सविस्तर दरपत्रक सूचना ढाणकी नगर पंचायतीच्या भांडार विभागाकडे उपलब्ध राहतील. याची इच्छुक कंत्राटदार/पुरवठा धारकांनी नोंद घ्यावी.

१) महिलांसाठी प्रगत, सुरक्षित व शाश्वत पिंक टॉयलेट () व हिरकणी कक्षाचे डिझाईन, बांधकाम, पुरवठा, स्थापना संचालन व देखभाल
२) नगर परिषद हद्दीतील महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन (पॅड) व्हेंडींग मशिन व इन्सिनरेटर मशिनचा पुरवठा व स्थापना
३) नगर परिषद हद्दीतील नागरिकांसाठी शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी आरओ वॉटर एटीएमचा पुरवठा व स्थापना
४) नगर परिषद हद्दीतील नागरिकांसाठी ईव्ही चार्गिंग स्टेशन बांधणी व स्थापना
५) नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या छतावर सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे
६) नगर परिषद हद्दीतील प्रशासकीय इमारतीच्या छतावरुन पावसाच्या पाण्याचे संकलन व साठवण व्यवस्था करणे
७) नगर परिषद हद्दीतील जुन्या सार्वजनिक विहिरीतील गाळ काढून संकलन करणे
८) नगर परिषद हद्दीतील नागरिकांसाठी आकर्षक सेल्फी पॉईटची निर्मिती व स्थापना

स्वा/-
मुख्याधिकारी,
नगर पंचायत, ढाणकी

## शिवकावड यात्रा रॅलीने मोर्शीनगरी

उपस्थित राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.यावेळी मोर्शीचे आमदार चंदू यावलकर,प्रीती बंड, अरुण पडोळे,नगराध्यक्ष प्रतीक्षा गुल्हाने, उपाध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,प्रशांत डहाणे, सुरेशचंद्र विटाळकर यासह नगरसेवक, नगरसेविका मंचकावर उपस्थित होते.रॅली मार्गावर विविध संघटनेच्या वतीने पाणी चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.ही कावड शोभायात्रा रैली समोर मार्गक्रमन करीत रामजीबाबा मंदिर चौक येथे पोहोचताच या ठिकाणी रामजीबाबा संस्थानचे अध्यक्ष नंदकुमार कुबडे यांच्या हस्ते कावड यात्रेचे पूजन व महाआरती करण्यात आली.नंतर ही कावड यात्रा श्रीशेत्र पाळा मार्गे सालबर्डी येथील वैराग्यमूर्ती संत महादेव महाराज संस्थान येथे पोहोचली.शिवकावड यात्रा समिती व समस्त हिंदूबांधव मोर्शी यांच्या वतीने नगरसेवक तथा शिवसेनेचे तालुका प्रमुख रवींद्र गुल्हाने,योगेश गणेश्वर,वामनराव वासनकर यांच्या नेतृत्वात महाआरती करण्यात आली. ही कावड यात्रा घेऊन पहाडावर असलेल्या भुयारात पोहोचून भल्या मोठ्या सालबर्डी येथील निसर्गरम्य खडकाखाली असलेल्या भोले शंकराच्या स्वयंभू शिवलिंगावर एकूण २५१ भरण्याद्वारे पाणी सोडण्यात आले.

या कावड यात्रेत हजारो महिला पुरुष व राजकीय मंडळी सहभागी झाले होते. स्थानिक जयस्तंभ चौक येथे वाहतुकीची कोंडी निर्माण झाली असतांना उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, ठाणेदार राहुल आठवले, नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.या कावडयात्रेच्या यशस्वीतेसाठी रवी गुल्हाने व योगेश गणेश्वर मित्रमंडळींनी अथक परिश्रम घेतले.

## लिओनेल मेस्सीचा आंतरराष्ट्रीय

मी नेहमीच लढलो आणि या जर्सीसाठी मैदानावर आपले प्राण पणाला लावले, जेणेकरून तुम्हाला आनंद मिळेल आणि अर्जेंटिनीय असल्याचा अभिमान वाटेल.वेळ कमी होत चालली आहे, आयुष्याचे अध्याय संपत येतात आणि हा असा अध्याय आहे जो मला मनापासून सुन्न करतो. मला राष्ट्रीय संघाचा भाग असणे आवडते, मी त्यावर प्रेम केले आहे आणि नेहमीच करत राहीन. मी माझ्याकडे जे काही होते ते सर्व काही दिले आहे; माझ्याकडे आता देण्यासारखे काही उरलेले नाही, आणि शिवाय, काही महान तरुण खेळाडू पुढे येत आहेत जे येथे असण्यास पात्र आहेत. २००५ मध्ये अर्जेंटिराष्ट्रीय संघातून पदार्पण करणा-या मेस्सीने आपल्या कारकिर्दीत एकूण २०७ आंतरराष्ट्रीय सामने खेळले. त्याच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने २०२२ चा ऐतिहासिक फिफा विश्वचषक जिंकला, तर नुकत्याच पार पडलेल्या २०२६ च्या विश्वचषकात संघ उपविजेता ठरला होता. याशिवाय, त्याने आपल्या देशाला दोन वेळा कोपा अमेरिका स्पर्धा जिंकवून देण्यात मोलाची भूमिका बजावली.नुकत्याच पार पडलेल्या २०२६ च्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात स्पेनविरुद्ध झालेल्या पराभवानंतर आणि वैयक्तिक पातळीवर वडिलांच्या निधनानंतर मेस्सीने यावर सखोल विचार केला होता. अखेर, नव्या पिढीला संधी देण्यासाठी आणि आपल्या प्रदीर्घ व यशस्वी प्रवासाला विराम देण्यासाठी त्याने हा कठीण निर्णय घेतला आहे. त्याच्या या निवृत्तीमुळे जगभरातील फुटबालप्रेमींच्या डोळ्यात पाणी आले असून एका सुवर्णयुगाचा अंत झाला असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## दिल्लीत धावत्या बसमध्ये

**बस पार्किंगमधून आरोपींना अटक; बस जप्त-**पोलिसांनी तिमारपूर येथील बस पार्किंगमधून दोन्ही आरोपींना अटक केली. गुन्ह्यात वापरलेली स्लीपर बसही जप्त करण्यात आली असून, वाहनाची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे.पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्या दिवशी बसमध्ये बिघाड झाल्यामुळे आरोपींनी ती दुरु स्तीसाठी सुरजपूर येथील वर्कशापमध्ये नेली होती.दुरु स्ती पूर्ण झाल्यानंतर, चालक आणि वाहक ती रिकामी बस घेउन तिमारपूरकडे जात असताना त्यांना परी चौकाजवळ ती विद्यार्थिनी भेटली. पोलिसांनी सांगितले की, मध्यरात्रीच्या प्रवासात गुन्हा लपवण्यासाठी त्या दोघांनी बसच्या आत असलेल्या पडद्यांचा वापर केला, जेणेकरून बाहेरून जाणा-या लोकांना आत काय चालले आहे हे दिसू नये.

## देशातील ट्रेन आता

या मार्गांवरून प्रामुख्याने कोळसा, लोहखनिज, बाक्साईट, लोह वितळवण्यासाठीचा कोळसा किंवा कोक, रासायनिक खते, सिमेंट आणि काही धान्यांची वाहतूक केली जाईल असे समजते.ही योजना प्रत्यक्षात अंमलात आणण्यासाठी आयआरसीटीसीकडून तयारी देखील सुरू झाली आहे. आयआरसीटीसीने या प्रकल्पात गुंतवणूक करू इच्छिणा-या कंपन्यांसोबत बैठक देखील घेतली. या बैठकीमध्ये थीम कशाप्रकारच्या असाव्यात, भाडे करार कसा असावा, प्रवाशांना काय सुविधा देण्यात याव्यात? संभाव्य प्रोजेक्टचे फायदे अशा विविध विषयांवर चर्चा करण्यात आली आहे. पुढील महिन्यात संबंधित कंपन्यांसोबत आणखी एक महत्त्वपूर्ण बैठक होणार असून त्यानंतरच योजनेचे स्वरूप स्पष्ट होईल, अशी माहिती अधिका-यांच्या वतीने देण्यात आली आहे. एका विशिष्ट थिमवर आधारित खासगी ट्रेनप्रमाणेच प्रवाशांसाठी देखील खासगी ट्रेन चालवण्याचा विचार सुरू आहे. खासगी ट्रेन वाहतुकीसाठी विविध कंपन्यांकडून निविदा मागवण्यात आल्या होत्या. सुरुवातीला मुंबई दिल्ली मार्गावर खासगी ट्रेन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली होती. २०२३ पर्यंत देशात काही प्रमाणात खासगी ट्रेन धावतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. सुरुवातीला हे सहा मार्ग डिझाइन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट आणि ट्रान्सफर या सूत्रानुसार विकसित करण्याचे नियोजन होते, परंतु आता ते हायब्रीड ॲन्युइटी माडेलवर विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## "CJP म्हणजे कॉंग्रेस जिताओ

तिथे जाउन जुन्या वर्ग खोलीचे फोटो काढतात आणि त्या पडलेल्या आहेत असं दाखवतात. कुणीही जर आम्हाला काही दाखवत असेल आणि ते सत्य असेल तर आम्ही त्यावर कार्यवाही करतो. पण त्यांचा हेतू तो नाही. इश्युच्या माध्यमातून ते फक्त रिकामा ग्लास दाखवणारे आहेत. आपल्याकडे खूप कामे आहे. ती दाखवण्यासारखी आहे. मात्र हे लोक असे आहेत, ज्यांना उत्तरे देउ शकत नाही. कारण हाच कॉंग्रेस आणि अन्य पक्षाचा व्यक्ती असता तर आम्ही एवढे केले तुम्ही काय केले हे सांगता येते पण या लोकांना तशी उत्तरे देता येत नाहीत हा कार्यपद्धतीला बदल आहे असा आरोपही फडणवीसांनी केला. दरम्यान, राम मंदिराला विरोध केल्यानं जनतेने यांना घरी बसावले. विचारधारेला विरोध करून फायदा नाही हे लक्षात आल्यानंतर त्यांनी इश्यु समोर आणला. दुर्दैवाने राम मंदिर दानपेटीत जो काही घोटाळा झाला त्यावर १८०० कोटींचा घोटाळा असं दाखवले, हा आकडा कुठून आला? असे नॅरेटिव्ह करण्याचा प्रयत्न केला. हिंदुत्वाला विरोध करता येत नाही म्हटल्यावर हिंदू कसे चुकीचे आहेत, हिंदूंमध्ये काय चुकतंय, हिंदूंच्या मंदिरात चोरी होतेय हे दाखवतात. आता यांचे पुढचे टार्गेट कुंभमेळा आहे. आता पोपट बोलायला लागलेत. कुंभमेळ्यात भ्रष्टाचाराचा आरोप होताहेत. कुंभमेळ्यात आतापर्यंत जितके टेंडर झालेत, ते २०-३० टक्के कमी दरात दिले आहेत. एका एका टेंडरमध्ये १०० कोटी रूपये वाचताहेत. जी कामे केली त्याचे ४ टप्प्यात ऑडिट ठेवले आहे. मात्र खोटे बोला आणि रेटून बोला असं विरोधकांचे काम आहे असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना लगावला.

## अमित ठाकरेंवर तातडीने

चांगलाच वाद पेटला आहे. भाजपाने अमित ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी केली आहे. अमित ठाकरे यांच्या सांगण्यावरून मोदी यांचा फोटो हटवल्यानंतर आता भाजपाचे नेते नवनाथ बन आक्रमक झाले आहेत. त्यांनी अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी केली आहे. तसेच अमित ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा अपमान करण्याचे काम केले आहे. ते मनसेचे नवे नवे झालेले नेते आहेत. मोदी यांचा फोटो लावणे हा प्रोटोकालचा भाग आहे, प्रोटोकालच्या माध्यमातून हे सगळं होतं, असं मतही त्यांनी व्यक्त केलं. भारतीय पंतप्रधानांचा फोटो प्रत्येक शासकीय कार्यालयात असतो. अमित ठाकरे जेथे गेले ते शासकीय कालेज आहे. फोटो काढण्याच्या आधी प्रोटोकाल वाचायला हवा होता. ते नव्याने घराच्या बाहेर पडले आहेत. घरात बसणा-यांना प्रोटोकाल माहिती नसतो, अशी खोचक टीकाही नवनाथ बन यांनी केली.

**वसतिगृहाच्या अधीक्षकांना धारेवर धरले-** दरम्यान, नरेंद्र मोदी यांचा फोटो हटवल्यानंतर अमित ठाकरे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांसाठी आणखी एक गुन्हा दाखल झाला तर हरकत नाही, असे ते म्हणाले आहेत. आपल्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या भेटीत अमित ठाकरे यांनी वसतिगृहाच्या अधीक्षकांना धारेवर धरले. वसतिगृहातील जेवण, स्वच्छता याविषयी त्यांनी अधीक्षकांना जाब विचारला. आपल्या संभाषणाच्या दरम्यान अमित ठाकरे यांनी काही फोटो त्यांना दाखवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत प्रश्न विचारले.

## धर्मांतर केल्याने जात

देत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने १० ऑगस्ट २०२६ रोजीच्या आदेशाने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरवले. त्यानंतर त्यांनी कोर्टात धाव घेतली होती.आंतरधर्मीय विवाह केल्याने ओबीसी लाभ बाद होणार नसल्याचे राज्य सरकारने १९८३मधील जीआरद्वारे स्पष्ट केले होते. १९७९मधील जीआरद्वारे तसा लाभ केवळ हिंदू व शीख धर्मांविषयी देण्यात आला होता. मात्र, १९८३च्या जीआरद्वारे ते सर्व धर्मीयांसाठी लागू करण्यात आले. तसेच १९९६मधील जीआरमध्येही त्याचा पुनरुच्चार करण्यात आला. असे असतानाही समितीने त्या जीआरचा विचार न करता चुकीचा निर्णय दिला, असा युक्तिवाद ॲड. भनगोजी यांनी केला. तर, सरकारी वकिलांनी समितीच्या निर्णयाचे समर्थन केले. मात्र, खंडपीठाने भनगोजी यांचा युक्तिवाद ग्रा धरून वरीलप्रमाणे आदेश देत हा निकाल दिला.

## सरकारी नोकरीच्या नावावर २३.५० लाखांनी गंडविले

### परतवाड्यातील २ युवकांची फसवणूक, २ आरोपी गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरकारी नोकरी लावून देण्याच्या नावावर परतवाडातील दोन तरुणांना २३ लाख ५० हजार रुपयाने गंडविण्यात आल्याची घटना समोर आली आहे. पोलीस दल आणि आरोग्य विभागात क्लार्क पदाची नोकरी लावून देण्याचे आमिष दोघांना दाखविण्यात आले होते.या प्रकरणी परतवाडा पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. माहिती अनुसार स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे गौरव राजेंद्र हजारे (वय २३, रा. वायगाव ता. भातकुली ) आणि त्याचा मित्र हे दोघेही परतवाडा शहरात भाड्याच्या खोलीत राहून पोलीस भरती आणि इतर परीक्षांची तयारी करत होते. याच दरम्यान आरोपी सुशील प्रभाकर तायडे (वय ३३,रा. वृंदावन कॉलनी ) आणि प्रवीण विनायकराव रामटेके (वय ३८, रा. अर्जुन नगर) यांच्याशी त्यांची ओळख झाली. आरोपींनी शासन आणि उच्च स्तरावर आपली चांगली ओळख असल्याचा खोटा दावा केला आणि त्यांना पोलिस व आरोग्य विभागात नोकरी लावण्याचे आमिष दाखवले. या आमिषाला बळी पडून दोन्ही युवकांनी १७ जानेवारी ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत वेग वेगळ्या हप्त्यांमध्ये फोन-पे आणि ऑनलाइन बँक ट्रान्सफरद्वारे आरोपींच्या खात्यात एकूण २३ लाख ५० हजार रुपये जमा केले. मोठी रक्कम दिल्या नंतर ही नियुक्ती प्रक्रिया सुरू न झाल्याने युवकांना संशय आला. त्यांनी पैसे परत मागितले असता आरोपी टाळाटाळ करू लागले. संशय दूर करण्यासाठी आरोपींनी बनावट नियुक्ती पत्रेही पाठवली. मात्र जेव्हा युवकांनी त्या पत्रांची पडताळणी केली तेव्हा ते बनावट असल्याचे लक्षात आले आणि आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.फसवणूक झाल्याचे लक्षात येताच दोन्ही युवकांनी परतवाडा पोलीस ठाण्यात धाव घेऊन लेखी तक्रार दिली. गौरव हजारे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला.सध्या आरोपी सुशील तायडे आणि प्रवीण रामटेके यांना अटक करण्यात आली आहे. पोलीस आता आरोपींचे बँक खाते, ऑनलाइन ट्रान्झॅक्शन आणि बनावट कागदपत्रांचे जाळे तपासत आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## वार्षिक सर्वसाधारण सभा नियमबाह्य पद्धतीने गुंडाळल्याचा आरोप

### वाशिम जि.प. प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या सभेतील प्रकार; चौकशी करून कारवाईची संचालकांची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, वाशिमची वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ३० ऑगस्ट रोजी जैन भवन येथे झाली. मात्र, या सभेचे कामकाज नियमबाह्य पद्धतीने अर्धवट थांबविण्यात आल्याचा आरोप करीत संस्थेचे संचालक दत्तात्रय केशवराव इढोळे, प्रशांत उत्तमराव वाझुळकर व जगन्नाथ विठोबा आरू यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार निवेदन सादर केले आहे.



निवेदनानुसार, सभेच्या सुरुवातीला मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन सुरू करण्यात आले. यावेळी कर्मचारी भरतीसंदर्भातील नोंदीवर हरकत घेण्यात आली. संबंधित विषय सभेच्या विषयपत्रिकेत चर्चेस अथवा मंजुरीसाठी आलेला नसल्याचा आक्षेप घेण्यात आला. या आक्षेपावर चर्चा करून निर्णय घेण्याऐवजी सभेचे कामकाज थांबविण्यात आल्याचे तक्रारदार संचालकांचे म्हणणे आहे.

तसेच वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, खर्च मंजुरी, उपविधी दुरुस्ती, कर्मचारी भरती, कर्जवाटप आदी विषयांचे वाचन व चर्चा झाली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. सभासदांनी लेखी स्वरूपात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरेही सभेत देण्यात आली नसल्याचे तक्रारदारांनी म्हटले आहे. दरम्यान, चर्चा सुरू असतानाच राष्ट्रगीत सुरू करून सभा समाप्त करण्यात आल्याने विषयपत्रिकेतील सर्व विषयांवर निर्णय घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे

#### चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी

सभेचे कच्चे इतिवृत्त तयार करताना संचालकांच्या हरकती व आक्षेपांची नोंद घ्यावी, सभासदांनी मांडलेले प्रश्न व निवेदने इतिवृत्ताचा भाग करावीत, तसेच सभेच्या कामकाजातील प्रक्रियात्मक त्रुटींची चौकशी करून आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. संस्थेच्या अध्यक्ष, व्यवस्थापक व संबंधित पदाधिकाऱ्यांनी नियमबाह्य पद्धतीने कामकाज हाताळले असल्यास योग्य ती कार्यवाही करावी, अशीही मागणी जिल्हा उपनिबंधकांकडे करण्यात आली आहे.

सभेच्या इतिवृत्तात प्रत्यक्ष घडलेल्या घटनांची अचूक नोंद करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## विभागीय शिक्षक मेळावा हजारो शिक्षकांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

स्थानिक कन्हैया रिसॉर्ट, शेलू रोड, कारंजा (लाड) येथे आयोजित करण्यात आलेला विभागीय शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक शिक्षक मेळावा २०२६ 'शोध आनंदी जीवनाचा' या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम हजारो शिक्षकांच्या अभूतपूर्व उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षकांच्या विविध शैक्षणिक समस्यांवर विचारमंथन, शिक्षकांच्या सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक दृढ करणे तसेच सांस्कृतिक देवाणघेवाणीच्या माध्यमातून शिक्षकांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करणे, या प्रमुख उद्देशाने या भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी उद्घाटक म्हणून कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सईताई प्रकाशदादा डहाके उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेस्टा शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजयराव तायडे पाटील होते.

मेळाव्यास मार्गदर्शक म्हणून डॉ. शिवाजीराव कुचे, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. नामदेवराव दळवी, उपाध्यक्ष अभिजित देशमुख, अनिल असलकर, श्रीकृष्ण गोरडे, प्रशांत गावंडे, संतोष गडेकर, संदीप गावंडे, पुरुषोत्तम जुजगर, रामकृष्ण गुंजकर, सुभाष कोसलगे, सुभाष जिद्देवार यांच्यासह विविध शिक्षक संघटनांचे विभागीय, जिल्हा व तालुका पदाधिकारी उपस्थित होते. तसेच शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, लोकप्रतिनिधी, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शिक्षकांनी या मेळाव्यात सहभाग नोंदविला.

### 'शोध आनंदी जीवनाचा' संकल्पनेवर शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक विचारमंथन



मेळाव्याची 'शोध आनंदी जीवनाचा' ही संकल्पना विशेष आकर्षणाचा विषय ठरली. आजच्या धकाधकीच्या जीवनात शिक्षकांसमोरील वाढते मानसिक व व्यावसायिक ताणतणाव, बदलते शैक्षणिक धोरण, डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अध्यापनातील नवीन आव्हाने या पार्श्वभूमीवर विविध विषयांवर सखोल विचारमंथन करण्यात आले.

शिक्षकांनी केवळ ज्ञानदानाचे कार्य न करता स्वतःचे मानसिक आरोग्य, कौटुंबिक जीवन आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या यांच्यात योग्य समतोल साधणे आवश्यक असल्याचे विविध मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले. तणावमुक्त जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी, आधुनिक डिजिटल अध्यापन पद्धती आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण व्यवस्थेवरही उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी शिक्षण व समाजकारण क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट योगदान देणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा विशेष सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गुणवंतांचा गौरव करताना उपस्थित शिक्षकांनी उत्स्फूर्त टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे अभिनंदन केले.

मेळाव्यामुळे शिक्षकांना आपल्या समस्या, अपेक्षा आणि अनुभव मांडण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या आव्हानांवर सामूहिक चर्चा करून त्यावर सकारात्मक मार्ग शोधण्याचा प्रयत्न या मेळाव्यात करण्यात आला. शैक्षणिक चर्चेसोबतच सामाजिक बांधिलकी आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचा सुंदर संगम या कार्यक्रमात अनुभवायला मिळाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजित देशमुख यांनी केले. त्यांनी मेळाव्याच्या आयोजनामागील भूमिका आणि 'शोध आनंदी जीवनाचा' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन नीता खाडे आणि चाफेकर गांगवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संतोष चौधरी यांनी केले. हजारो शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा विभागीय शिक्षक मेळावा संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मेस्टा शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, शिक्षक समन्वय समितीचे सदस्य तसेच स्थानिक शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. शैक्षणिक विचारमंथन, सामाजिक जाणीव आणि सांस्कृतिक उत्साहाचा त्रिवेणी संगम साधणारा हा मेळावा शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## माजी सैनिकांचा उपचार आता वाशीममध्ये



■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील माजी सैनिकांना वाशीम येथेच उपचार मिळण्यासाठी माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी येथील विम्स हॉस्पिटल डॉ. कैलास दागडिया यांच्यासोबत चर्चा केली. डॉ. दागडिया यांनीही याबाबत सकारात्मकता दर्शविल्याने माजी सैनिकांना आता वाशीम येथेच उपचार मिळेल, असा विश्वास माजी सैनिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. जिल्ह्यातील माजी सैनिकांना उपचार घेण्याकरिता वाशीम जिल्ह्यामध्ये कोणतेच हॉस्पिटल नाही, परिणामी माजी सैनिकांना उपचाराकरिता अकोला येथील ईसीएचएस येथे जावे लागते. हा उपचार घेण्याकरिता माजी सैनिकांचे वय ६० वर्ष ते ८५ वर्ष असल्याने त्यांना अकोला येथे उपचार घेण्याकरिता जाणे अवघड होते. त्यामुळे माजी सैनिक प्रायव्हेट दवाखान्यातच इलाज करावा लागतो.

## जिल्हा व्यापारी महासंघाचा पदग्रहण सोहळा गुरुवारी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम जिल्हा व्यापारी महासंघ पदग्रहण सोहळ्याचे आयोजन गुरूवार ३ सप्टेंबर रोजी करण्यात आले असून, या सोहळ्याला शहरातील व्यापारी बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन व्यापारी मंडळाचे अध्यक्ष आशिष ठाकूर यांनी पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांशी बोलतांना केले.

पदग्रहण सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खा. संजय देशमुख हे राहणार असून, यावेळी प्रमुख उपस्थितीत आ. भावना गवळी, आ. श्याम खोडे, आ. सई डहाके, आ. अमीत झनक, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिप मुकाअ अर्पित चव्हान, पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्यासह नप मुख्याधिकारी अरविंद मुंढे, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ. अनिल कावरखे, संदिप वाघमारे, गजानन खिरे,, अभिजीत देवगीरकर, भाऊराव चव्हाण आदींची उपस्थिती लाभणार आहे.

वाशीम शहरातील मन्नासिंह चौकातील स्वागत लॉन येथे पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ३ सप्टेंबर रोजी होणारा वाशीम जिल्हा व्यापारी महासंघाचा पदग्रहण सोहळा हा केवळ पद स्वीकारण्याचा कार्यक्रम नसून, वाशीम जिल्ह्यातील व्यापारी एकतेचा नव्या पर्वाचा शुभारंभ आहे. व्यापरी संघाच्या दोन्ही संघटना एकत्र आल्यामुळे संघटना आणखी मजबूत झाली आहे. व्यापाऱ्यांचे प्रश्न समाज आणि प्रशासनापर्यंत पोहचविण्यासाठी आपले प्रयत्न राहणार असल्याचे व्यापारी संघटनेचे अध्यक्ष आशिष ठाकूर म्हणाले. यावेळी पत्रकार परिषदेला रोहीत हेडा, गजानन गावंडे, वसंता परळकर, नरेश जिवनाणी, रुपेश लढ्ढा आशिष हुरकट, आनंद गडेकर, प्रविण पाटणी, अकीलभाई तेली यांची उपस्थिती होती.

## हर हर महादेवच्या गजराने दुमदुमली राजुरा नगरी



### शिवभक्तांची उसळली गर्दी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

श्रावण महिन्याच्या पावन पर्वावर त्र्यंबकेश्वर धाम येथून निघालेल्या जय सावता सिद्धेश्वर कावड मंडळाचे राजुरा नगरीत ३० ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता वाजता दरम्यान आगमन झाले यावेळी हिवराळे परिवार व ग्रामस्थांच्या वतीने डिजेच्या निनादात मोठ्या जल्लोषात आणि भक्तिमय वातावरणात स्वागत करण्यात आले. कावड यात्रेच्या स्वागतासाठी शिवभक्तांनी मोठी गर्दी केली होती. कावड मंडळाच्या आगमना निमित्त सकाळ पासूनच राजुरा येथे शिवमय वातावरण निर्माण झाले होते त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग येथुन पवित्र जल घेऊन निघालेली ही कावड यात्रा राजुरात दाखल होताच संत गजानन महाराज मंदिरा समोर डिजेच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतिषबाजी स्वागत करण्यात आले. तरुण शिवभक्तांनी डीजे च्या तालावर ठेका धरत 'हर हर महादेव', 'बम बम भोले' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून सोडला अनेक ठिकाणी महिलांनी औक्षण करून स्वागत केले

यशवंत हिवराळे यांच्या परिवाराच्या वतीने यात्रेत सहभागी झालेल्या कावडधारी भक्तां साठी गावाच्या शिवेवर चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती त्या नंतर गावात आगमन होताच प्रतिक हिवराळे यांच्या निवासस्थानी सर्व कावडधारी भक्तांचे पाय धुऊन आणि भगवा शेला टोपी घालून स्वागत करण्यात आले त्या नंतर गावातुन भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला

कावड यात्रेचे दर्शन घेण्यासाठी आणि स्वागतासाठी हजारो शिवभक्त रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी या भक्तिमय सोहळ्यात सहभाग घेतला. कावड मंडळाच्या वतीने राजुरा येथील महादेव मंदिरात पवित्र जलाने महादेवाला जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर कावड यात्रेची सांगता झाली. जय सावता सिद्धेश्वर कावड मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून ही परंपरा जपत आहे.

## जेसीआय युनिक प्रियदर्शिनीची वृक्षारोपण मोहीम

**अकोला :** स्थानिक जेसीआय युनिक प्रियदर्शिनीच्या वतीने महानगरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली.जेसीआय युनिक प्रियदर्शिनीच्या अध्यक्षा आरती लढ्ढा यांच्या अध्यक्षतेखाली व प्रकल्प प्रमुख रश्मी पसारी व सुमन अग्रवाल यांच्या उपस्थितीत आयोजित या मोहिमेत गायगाव रस्त्यावरील परिसरात आंबा, पेरू, जांभूळ, पिंपळ आदींचे वृक्षारोपण करण्यात येऊन त्यांच्या सांगोपनाची जबाबदारी घेण्यात आली.

उपस्थित मान्यवरांनी या पर्यावरणीय उपक्रमाचे कौतुक करीत टीमला शुभेच्छा व्यक्त केल्यात.

जेसीआय युनिकच्या अध्यक्षा आरती लढ्ढा यांनी या उपक्रमाबद्दल माहिती देत या मोहिमेत नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी आरती लढ्ढा, स्नेहल लोहिया, मोनिका राठी, कविता लोहिया, नम्रता खंडेलवाल, राधिका करणानी सह उपस्थित होत्या.

## गाय हि आमची नाही तर माझी आई आहे हि भावना जोपासा - संत श्री गोपालनंद सरस्वती महाराज

**वाशिम :** भारतीय संस्कृती मध्ये गौ मातेला आईचा दर्जा आहे. गाई पासुन शेन, तुप, विविध आजारावर औषधी उपलब्ध आहे.गौमातेच्या सेवे मुळे धन, धान्य ,आरोग्य व सर्व प्रकारचे साधने प्राप्त होतात. जोपर्यंत गाय हि आमची नाही तर माझी आई आहे हि भावना प्रत्येकांमध्ये निर्माण होणार नाही तो पर्यंत गाय वाचनार नाही देशामध्ये ८० वर्षानंतर प्रथमच केंद्रातील शासनाने गौमातेकडे लक्ष केंद्रीत केले असुन ३ मागन्या मान्य केल्या आहे.उर्वरीत मागन्या पुर्ततेसाठी या अभीयानामध्ये सर्वांचे योगदान जरूरी असल्याचे प्रतीपादन राजस्थान पुष्कर येथील ग्वालसंत श्री गोपालनंद सरस्वतीजी महाराज यांनी केले.



स्थानीक आ.यु.डी.पी येथील श्री संत गजानन महाराज मंदीर सभागृहात ३० ऑगस्ट रोजी गौ सन्मान आव्हान अभीयान अंर्तगत त्यांनी वरील प्रतीपादन केले यावेळी मंचावर ह.भ.प नामदेवराव काकडे महाराज ,ह.भ.प सुभाष ठाकरे महाराज,ह.भ.प कृष्णा महाराज घोडके,ह.भ.प मनोहर अवचार,ह.भ.प गजानन महाराज मापारी,महंत जीतेंद्र महाराज,ह.भ.प पंकज देव महाराज,ह.भ.प बालकष्ण महाराज खोलगडे,ह.भ.प जय महाराज सरनाईक ,बालयोगी भोलेनाथजी आदींची उपस्थीती होती.यावेळी सर्व संतांनी गौ मातेचे महत्व विषद करीत गाय वाचेल तर देश वाचेल असे सांगत या अभीयानामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आव्हान केले.यावेळी ग्वाल संत श्री गोपालनंद सरस्वतीजी महाराज यांनी पुढे सांगीतले की गौ सन्मान स्वाक्षरी अभीयानामध्ये पहिल्या टप्यात ५ कोटी,दुसऱ्या टप्यात १५ कोटी जनतेंनी समर्थन दिले असुन आता तीसऱ्या टप्यात ३१ कोटी स्वाक्षरी अभीयानाचे लक्ष आहे.१ डीसेंबर रोजी मुंबई येथे आजाद मैदानावर ११ लाख गौ भक्त जमा होणार असुन शासनाचे लक्ष वेधनार आहे.भारतात गौहत्या पुर्णपणे बंद करावी,गौमातेला राष्ट्र मातेचा दर्जा देण्यात यावा,गौ सेवे करीता एक केंद्रीय कायदा बनवावा व केंद्रीय गौ मंत्रालय स्वतंत्र स्थापन करण्यात यावे अशी मागनी केली.अनेक राज्यात गौमातेला राज्य मातेचा दर्जा देण्यात आला असुन अनेक राज्यात अद्यापहि हा दर्जा दिलेला नाही त्यामुळे गौ भक्तांना हि लढाई एकत्रीत येउन लढने जरूरी आहे असे सांगीतले.गौ मातेची सेवा म्हनजे संस्काराची,करूनेची व जीवदयाची सेवा आहे.गौ मातेचा सन्मान व स्वरक्षन करन्याचा संकल्प सर्वांनी घ्यावा यावेळी त्यांनी केले. सदर कार्यक्रमात सरपंच नीकेश गावंडे व पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांनी गौ सन्मान अभीयानाला समर्थन जाहिर कले कार्यक्रमाचे प्रास्तावीक विभाग प्रभारी उज्वल गव्हाड,संचालन राज्य प्रभारी ह.भ.प बालकृष्ण महाराज तर आभार जिल्हाप्रभारी सौ.सुमन वर्मा यांनी मानले. कार्यक्रमाला गौ भक्त,महिला,विविध संघटना,गौ शाळा पदाधिकारी उपस्थीत होते.

## एकदिवसीय बाल आनापान ध्यान शिबिर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

विपश्यना प्रचार व प्रसार समिती, वाशिम यांच्या वतीने रविवार, ३० ऑगस्ट रोजी १२ ते १६ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी एक दिवसीय बाल आनापान ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ. तुषार गायकवाड यांच्या फार्महाऊसवरील ध्यान सभागृहात झालेल्या या शिबिरात एकूण ६५ मुला-मुलींनी सहभाग घेतला. शिबिरात मुलांना नैसर्गिक श्वासाकडे सजगपणे लक्ष देण्याची ध्यानपद्धती शिकविण्यात आली. यामुळे मनाची एकाग्रता, शांतता, संयम, सकारात्मक विचार आणि अभ्यासातील लक्ष वाढण्यास मदत होते, असे मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराचे वेळापत्रक सकाळी ८.३० ते ९.३० नोंदणी व नाश्ता, त्यानंतर ध्यान व मार्गदर्शन, दुपारी ११.४५ ते १२.३० भोजनाची विश्रांती, तर सायंकाळी ४.३० ते ५ वाजता अल्पोपहार व शिबिराचा समारोप असे होते.

## लोककलावंतांनी महापुरुषांचे विचार गावोगावी पोहोचवावेत - दीपक बळमे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

उमरा शम. येथे सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त महात्मा ज्योतिबा फुले शिक्षण, कला, क्रीडा व आरोग्य बहुउद्देशीय संस्था, उमरा शम. ता. जि. वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६ व्या व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या १०४ व्या संयुक्त जयंती उत्सव २०२६ तसेच संस्थेच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त 'गीत वामनाचे' हा विनामूल्य सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद वाशिमचे अर्थ व बांधकाम सभापती सुरेश मापारी होते, तर कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्य दिगंबर खोरणे यांच्या हस्ते करण्यात आले. विशेष उपस्थिती म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सामाजिक समरसता विभागाचे विभाग प्रचारक दीपकजी बळमे व जिल्हा संयोजक भिकाजी ढगे उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करताना दीपकजी बळमे म्हणाले की, लोककलावंत सामाजिक समरसतेचा विचार गावोगावी प्रचार-प्रसार करून जिवंत ठेवण्याचे तसेच लोककलेचे जतन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. सर्व जाती-धर्मातील लोककलावंतांना एकत्र आणून गेल्या वीस वर्षांपासून शाहीर संतोष खडसे हे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करीत आहेत. त्यांच्या या कार्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सुरेश मापारी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, लोककलावंतांनी थोर महापुरुषांचे विचार आणि लोककला जिवंत ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. माझ्या सर्कलमधील ज्या-ज्या गावांमध्ये मी जातो, त्या ठिकाणी शाहीर संतोष खडसे यांचे नाव घेतले जाते. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात लोककलावंत म्हणून त्यांनी आपला लौकिक निर्माण केला आहे, ही अभिमानाची बाब आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शाहीर संतोष खडसे यांनी लोककलावंतांनी थोर महापुरुषांच्या विचारांसोबत लोककला जिवंत ठेवावी, असे आवाहन केले. सर्व लोककलावंतांनी एकत्र येऊन आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढा उभारला पाहिजे. एकजुटीने प्रयत्न केल्यास लोककलावंतांना निश्चितच न्याय मिळू शकतो, असे त्यांनी सांगितले.

'गीत वामनाचे' या सांस्कृतिक कार्यक्रमात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जीवनकार्यावर आधारित तसेच त्यांच्या लेखणीतून साकारलेली एकापेक्षा एक सरस गीते विविध गावांमधून सहभागी झालेल्या लोककलावंतांनी सादर केली. लोककलेच्या माध्यमातून महापुरुषांचे विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाला शेषराव मेश्राम (परिवर्तन कला महासंघ जिल्हाध्यक्ष), शाहीर रतन हाडे, लोमेश चौधरी (राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक कलावंत मानधन समिती सदस्य), विनोद पट्टेबहादूर, नंदकिशोर भोयर, नंदकिशोर मुके, रामकृष्ण वानखेडे माऊली, पुष्पराज कढोळे, विष्णू धोंगडे (गोंधळी लोककलावंत), प्रज्ञानंद भगत (गायक/गीतकार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त), शाहीर धम्मानंद इंगोले, ह.भ.प. सुरेश गजभार, कांताराम शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर व लोककलावंत उपस्थित होते.

सावळी, जयपूर, सोडा, गणेशपूर, उमरा कापसे, हनवतखेडा, ब्राह्मणगाव, सावरगाव जिरे, उमरा शम., बोरळा, दुबळवेल व पांढुर्णा आदी गावांमधून लोककलावंतांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७५ ■ मंगळवार १ सप्टेबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# गणेशोत्सवात नियमांचा भंग खपवून घेणार नाही

## जिल्हाधिकाऱ्यांचा मंडळांना स्पष्ट इशारा

**वर्धा जनमाध्यम :** येत्या काही दिवसात जिल्ह्यात विविध सण, उत्सव मोठ्या आनंद आणि उत्साहात साजरे केले जाणार आहे. या आनंदाच्या काळात जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही, सर्व सण उत्सव शांततेत पार पडेल, यासाठी मंडळांसह सर्वसामान्य नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आगामी सण, उत्सवाच्या अनुषंगाने शांतता व समन्वय समितीची सभा जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे, भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधिन अधिकारी शोभिता पाठक तसेच शांतता समितीचे सदस्य, पोलिस अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात आगामी सर्व उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी संयुक्त प्रयत्न करण्यात यावे. विशेषत: गणेशोत्सव काळात अधिक काळजी घेण्यात यावी. गणेश विसर्जन मार्गातील अतिक्रमणे काढून रस्ता मोकळा करावा. आवश्यक तेथे रस्त्यांची डागडुजी करण्यात यावी. संबंधित भागातील पोलिस अधिकाऱ्यांनी ग्रामसेवकांच्या मदतीने मंडळांच्या संपर्कात राहून उत्सव गालबोट न लागता उत्साही वातावरणात पाड पाडण्यासाठी प्रयत्न करावे. या काळात स्वच्छता, मोकाट जणावरे व कुत्रे यांचा उपद्रव किंवा अडथडा होणार नाही, हे पाहावे.



शहरी भागात गणेशोत्सव काळात वाहतुक व्यवस्थापन करावे, कुठेही वाहनांची गर्दी होऊन मार्ग अडथळायुक्त होऊ नये. पोलिस विभागाने यादरम्यान पोलिस फिरत्या पथकांची कारवाई गतीमान करावी. मंडळाच्या सदस्यांनी परिसरात अस्वच्छता, सुव्यवस्था होणार याकडे लक्ष द्यावे. सण, उत्सव काळात अफवा पसरविणे किंवा चुकीच्या गोष्टी कोणी करीत असल्यास मंडळांनी अशा घटनांची प्राथमिक माहिती पोलिस विभागास द्यावी. माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवण्यात येईळ. यामुळे अनुचित प्रकार टाळण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

मिरवणूक काळात डीजीचे आवाज कोणत्याही परिस्थितीत निर्धारीत आवाजापेक्षा अधिक असून नये तसेच मिरवणूकीत लेझर लाईटचा वापर व रात्री १० वाजतानंतर ध्वनीक्षेपकांचा वापर मंडळांनी करु नये. डीजे आवाजाबाबत प्रमाणपत्र पोलिस विभागाकडून घेण्यात यावे. डीजेचा आवाज आणि लेझर लाईट मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या बाबी असल्याने याबाबतीत कोणी उल्लंघन केल्यास कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.

जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी देखील सण, उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. सण, उत्सव आनंदाच्या गोष्टी आहेत, त्यामुळे आपल्या कृतीमुळे या आनंदाला गालबोट लागता कामा नये, असे सांगितले. सदाशिव वाघमारे, सुरज गोहाड यांनी देखील मार्गदर्शन केले.

**लेझर लाईट, डीजेचा अतिरिक्त आवाज नको जिल्ह्यात कायदा, सुव्यवस्था राखण्याचे आवाहन**

यावेळी शांतता समितीचे सदस्य, मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी काही विषय मांडले. त्यावर वेळेत कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना बैठकीत दिल्या. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी प्रताप वाघमारे यांनी मंडळांनी उत्सव काळात अनुसरावयाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली.

महिलांसाठी दामिनी व्हाट्स?प हेल्पलाईन

जिल्हा पोलिस दलाच्यावतीने पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या संकल्पनेतून दामिनी व्हाट्स?प हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे. या हेल्पलाईनवर महिला, मुली आपल्या तक्रारी नोंदवू शकतील. या हेल्पलाईनच्या पोष्टरचे अनावरण जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. सदर हेल्पलाईन क्रमांक ७६२०५२००२५ असा आहे.

## खड्डयांच्या खाईत वर्धा लोकसभा

# ८०० कोटींच्या निधीसाठी काळेंची गडकरींकडे धाव

### तीन प्रमुख मार्गांच्या दुरवस्थेने नागरिक त्रस्त; अपघातांचा धोका वाढला

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा लोकसभा मतदारसंघातील खड्डेमय रस्त्यांचा प्रश्न आता थेट दिल्लीच्या दरबारात पोहोचला आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे तब्बल ८०० कोटी रुपयांच्या सीआरएफ निधीची मागणी केली आहे.



पुलगाव–विजयगोपाल–शिरपूर, वर्धा–वायफड–रसुलाबाद–सोरटा आणि वर्धा–दिग्रस–मांडवा या तीन प्रमुख मार्गांची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली आहे. जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबर आणि खराब रस्त्यांमुळे दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. ग्रामीण भागातील शाळकरी विद्यार्थी, रुग्ण, शेतकरी, व्यापारी आणि नोकरदारांसाठी हे मार्ग जीवनवाहिनी असतानाही त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी आहे.

खासदार काळे यांनी वर्धा–वायफड–रसुलाबाद–सोरटा मार्गासाठी २०० कोटी, वर्धा–दिग्रस–मांडवा मार्गासाठी २०० कोटी, तर पुलगाव–विजयगोपाल–शिरपूर मार्गासाठी ४०० कोटी रुपये मंजूर करण्याची मागणी केली आहे.

रस्त्यांची दुरवस्था आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी निधी मंजूर करून कामांना तातडीने सुरुवात करावी, अशी आग्रही मागणी काळे यांनी केली आहे. आता गडकरी या मागणीला कितपत प्रतिसाद देतात, याकडे वर्धा लोकसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

# इमारत उभी... कार्यालय गायब

## सारवाडीतील शासकीय इमारतीला पाच वर्षांपासून कुलूप, लाखोंचा निधी धूळ खात

**आष्टी शहीद जनमाध्यम :-** सारवाडी येथे नागरिकांच्या महसूलविषयक अडचणी सोडविण्यासाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या मंडळ अधिकारी कार्यालयाच्या इमारतीला गेल्या पाच वर्षांपासून कुलूप असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. इमारत तयार, बांधकाम पूर्ण आणि शासनाचा निधी खर्च झाला. मात्र कार्यालय सुरू करण्याचा मुहूर्त अद्याप सापडलेला नाही. त्यामुळे 'इमारत उभी, पण कार्यालय कुठे असा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महसूल विभागाच्या कामांसाठी नागरिकांना फेरफार, सातबारा, दाखले, जमीनविषयक कामे आणि इतर प्रशासकीय बाबींसाठी दूरवरच्या कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठीच मंडळ अधिकारी कार्यालयाची इमारत उभारण्यात आली. मात्र पाच वर्षे उलटूनही ती वापरात आली नसेल तर शासनाचा लाखो रुपयांचा खर्च नेमका कोणत्या उपयोगाचा, असा प्रश्न ग्रामस्थांनी केला आहे.

### शासन आपल्या दारी... मग कार्यालयाला कुलूप का

पारडी येथे आयोजित शासन आपल्या दारी उपक्रमादरम्यान आमदार सुमित वानखडे यांनी सारवाडी येथील मंडळ अधिकारी कार्यालयाच्या प्रश्नाची दखल घेत संबंधित ठिकाणी भेट देऊन परिस्थिती जाणून घेतली होती.

### शासन आपल्या दारी'च्या घोषणेला प्रशासनाचा हरताळ सरपंच, उपसरपंचांसह ग्रामस्थांचे खासदार अमर काळेंकडे साकडे



त्यामुळे आता कार्यालय सुरू होईल, अशी ग्रामस्थांची अपेक्षा होती. मात्र भेटीनंतरही प्रत्यक्ष कार्यालय सुरू न झाल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एकीकडे शासन नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारापर्यंत देण्याचा दावा करीत आहे. दुसरीकडे नागरिकांच्या सोयीसाठी उभारलेली शासकीय इमारतच पाच वर्षे बंद ठेवली जात असेल तर शासन आपल्या दारी की कार्यालयाला कुलूप भारी असा टोला ग्रामस्थांकडून लगावला जात आहे.

### खासदार अमर काळेंकडे साकडे

सारवाडी येथील मंडळ अधिकारी कार्यालय तातडीने सुरू करून नागरिकांना स्थानिक पातळीवर महसूल विभागाच्या सेवा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी सरपंच, उपसरपंच तसेच एकांबा येथील बंडू पाठे यांनी खासदार अमर काळे यांच्याकडे केली आहे. खासदारांनी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून कार्यालय सुरू करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आता खासदारांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### पाच वर्षे कुलूप... जबाबदार कोण

शासकीय निधीतून इमारत बांधायची, लाखो रुपये खर्च करायचे आणि त्यानंतर वर्षानुवर्षे ती वापराविना ठेवायची, हा प्रकार प्रशासनाच्या नियोजनाचा नमुना आहे की उदासीनतेचा कार्यालय सुरू करण्यासाठी नेमकी अडचण काय आहे, याचे उत्तर संबंधित विभागाने जनतेसमोर देण्याची मागणी होत आहे. इमारत धूळ खात पडणार आणि नागरिक सरकारी कामांसाठी वणवण भटकणार, हा कारभार आणखी किती दिवस चालणार कार्यालय सुरू करण्यास विलंब करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का शासनाच्या पैशातून उभारलेली सुविधा जनतेच्या सेवेत कधी येणार या प्रश्नांवर प्रशासनाने आता केवळ आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली आहे.

# ग्रामसभेच्या ठरावातच खोडतोड?

## दहेगावात सरपंच- ग्रामसेवकां विरोधात पोलिसांत तक्रार

### खाणपट्ट्याच्या ना-हरकतीवरून ग्रामस्थ आक्रमक



**सेलू जनमाध्यम:** ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकतेचा दावा केला जात असतानाच दहेगाव (गो.) येथे ग्रामसभा ठरावात कथित फेरफार आणि खाणपट्ट्याच्या ना-हरकत प्रमाणपत्रावरून ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. ग्रामसभेच्या नावाखाली बनावट ठराव तयार केल्याचा गंभीर आरोप करीत संतप्त ग्रामस्थांनी थेट पोलीस ठाणे गाठून सरपंच व ग्रामसेवकांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल केली. सोमवारी पंचायत समिती सेलूचे गटविकास अधिकारी देवानंद पाणबुडे यांच्या उपस्थितीत विशेष ग्रामसभा झाली. मौजा किन्हाळा येथील सर्वे क्रमांक २६/१/२ मधील दोन हेक्टर क्षेत्राच्या खाणपट्ट्यासाठी देण्यात आलेल्या ना-हरकत दाखल्यावर ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ग्रामसभा घेणे बंधनकारक असताना मासिक सभेच्या ठराव क्रमांक सातमध्ये कथित फेरफार करून २० मे २०२६च्या ठरावाला २९ मे २०२६ची ग्रामसभा असल्याचे दाखवून ठराव तयार केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.विशेष म्हणजे २५ ऑगस्ट रोजी पंचायत समितीच्या चौकशी समितीने ग्रामपंचायतीची आठ रजिस्टर जप्त केली होती. तपासणीत प्रोसेडिंग बुकमध्ये खोडतोड तसेच वेगवेगळ्या शाईचा वापर आढळल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकाराबाबत ग्रामसेवकांनी तोंडी कबुली दिल्याचाही दावा करण्यात आला.

ग्रामसभेत समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने ग्रामस्थांनी पोलिसांत धाव घेतली. स्टेशन डायरी क्रमांक १५४ अन्वये तक्रार नोंदविण्यात आली असून ँन्ए कलम ३१८(४), ३३६(३) व ३४० अंतर्गत गुन्हा दाखल करावा, मूळ प्रोसेडिंग बुक जप्त करावे आणि संबंधित खाणपट्ट्यांच्या एनओसी रद्द कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणाचे फोटो, व्हिडिओ, पंचनामा आणि एनओसीची कागदपत्रे आमदार समीर कुणावार यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्हा खनिकर्म अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामसभेला तलाठी, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक तसेच दहेगाव आणि किन्हाळा येथील शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे; आरोपीला ५ वर्षे कारावास

### २ हजारांचा दंड; तळेगाव पोलिसांच्या तपासाला यश

**वर्धा जनमाध्यम** अल्पवयीन मुलीला अंधारात नेऊन तिच्याशी अश्लील चाळे करणाऱ्या मंगेश काकडे रा. वर्धामनेरी याला जिल्हा व सत्र न्यायालय क्रमांक ३ ने पाच वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायाधीश श्रीमती अन्सारी यांनी हा निकाल दिला. आरोपीवर दोन हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला असून दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.



अल्पवयीन पीडिता बहिणीसोबत शारदादेवीच्या महाप्रसादासाठी गेली असताना आरोपीने तिला अंधारात नेले. यावेळी त्याने तिच्याशी अश्लील चाळे केले. पीडितेने आरडाओरड करून बहिणीला आवाज दिल्याने आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. याप्रकरणी तळेगाव पोलिस ठाण्यात २०१८ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस उपनिरीक्षक रवि राठोड यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी अभियोक्ता प्रसाद सोईतकर यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. पोलिस हवालदार चंदन ठाकूर यांनी साक्षीदारांना न्यायालयात हजर केले. ठाणेदार मंगेश भोयर यांनीही साक्षीदारांना मार्गदर्शन केले.

## ज्येष्ठ शिक्षक भाऊराव राऊत यांचे निधन



**सेलू :** येथून जवळच असलेल्या कोटंबा येथील जिल्हा परिषद शाळेचे माजी शिक्षक भाऊराव रामचंद्र राऊत यांचे सोमवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते.

त्यांच्या पश्चात मुलगा, सून, भाऊ, नातू, नातीन तसेच मोठा आप्तपरिवार आहे, ते कोटंबा येथील माजी सरपंच शरद राऊत यांचे वडील होतं.

# जास्तीत जास्त मतदारांचा यादीत समावेशासाठी प्रयत्न करा - जिल्हाधिकारी

**वर्धा जनमाध्यम :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण एसआयआर अंतर्गत जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी आणि वगळलेल्या मतदारांची यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यात जास्तीत जास्त मतदारांचा समावेश यादीत होईल, यासाठी राजकीय पक्षांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले.




### दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत

### जिल्ह्यात यादीनुसार ९ लाख ५९ हजारांवर मतदार

### प्रारुप मतदार यादीचे राजकीय पक्षांना वितरर्ण

प्रारुप यादीबाबत राजकीय पक्षांसोबत आज जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेतली. त्यावेळी त्यांनी सदर आवाहन केले. यावेळी निवडणूक उपजिल्हाधिकारी अनिल गावित तसेच विविध राजकीय पक्षांचे प्रा.खलील खतीब, अविनाश मांडे, आशिष देशमुख, भैय्याजी देशमुख, प्रवीण चोरे, मनोजकुमार देशमुख, यशवंत झाडे, पंकज सत्यकार, मिलन गांधी, राजु वरटकर उपस्थित होते. जिल्ह्यात मतदार यादीचा पहिला टप्पा चांगल्या पद्धतीने पार पडला. विविध कारणाने जवळजवळ १५ टक्के मतदार प्रारुप यादीत समाविष्ठ होऊ शकले नाही. त्यातील जे मतदार यादीत समाविष्ठ होऊ शकतात, अशा मतदारांच्या समावेशासाठी प्रशासनासोबतच राजकीय पक्षांनी देखील सहकार्य करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाल्या.प्रारुप यादीवर मतदारांना आक्षेप असल्यास तशी सुविधा देण्यात आली आहे. वेळेत आक्षेप सादर करण्यात यावे. जिल्ह्यात काही मतदान केंद्र एकत्र करण्यात आले तर काही नवीन ठिकाणी हलविण्यात आले आहे. पात्र नागरिक मतदानापासून वंचित राहू नये आणि अपात्र किंवा दुबार नोंदी यादीत राहू नयेत, हा एसआयआर प्रक्रियेचा उद्देश आहे. त्यामुळे नागरिकांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपले नाव यादीत आहे किंवा नाही, याची खात्री करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

जिल्ह्यात बीएलओ मार्फत घरोघरी भेट देऊन 'हंर्ल्सूंग्दह इदंस' (इं) चे वितरण व संकलन करण्यात आले. प्राप्त माहितीच्या पडताळणीनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रारूप यादीनुसार जिल्ह्यात ९ लाख ५९ हजार ६४ मतदारांचा समावेश आहे. सर्वेक्षणादरम्यान जिल्ह्यात १ लाख ७८ हजार १७८ अर्ज हे मृत, स्थलांतरित किंवा दुबार नोंदींमुळे

### एसआयआरची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

गोळा होऊ शकले नाहीत. यामध्ये प्रामुख्याने मृत व्यक्ती ४७ हजार ६८८, पत्ता न सापडलेले किंवा अनुपस्थित १० हजार ३०२, कायमचे स्थलांतरित ९५ हजार ८९, पूर्वीच नोंदणीकृत २४ हजार ८४१ व इतर २५८ नोंदींचा समावेश आहे.

दावे व हरकती नोंदवण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत संधी

नागरिकांना प्रारूप मतदार यादीवर आपले दावे आणि आक्षेप नोंदवण्यासाठी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आली आहे. त्यासाठी खालील फॉर्म भरून आवश्यक ती स्वयंप्रमाणित कागदपत्रे सादर करावी लागतील. फॉर्म ६ नवीन मतदार नोंदणीसाठी किंवा यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी, फॉर्म ७ नावाला हरकत घेण्यासाठी किंवा नाव वगळण्यासाठी. फॉर्म ८ नाव, पत्ता किंवा इतर तपशीलात दुरुस्ती करण्यासाठी दाखल करता येतील. त्यासाठी आवश्यक कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

दावे व हरकतींसाठी निवारणासाठी त्रिस्तरीय प्रशासकीय व्यवस्था

दावे व हरकतींचे नियमानुसार निराकरण्यासाठी त्रिस्तरीय व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली आहे. यामध्ये प्रथम स्तर ईआरओ स्तरावर प्राथमिक तपासणी व कार्यवाही. द्वितीय स्तर (जिल्हा निवडणूक अधिकारी) ईआरओ च्या निर्णयाविरुद्ध जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील करता येईल. याकरिता विधानसभा निहाय उपजिल्हाधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. तृतीय स्तर (मुख्य निवडणूक अधिकारी) अंतिम अपिलासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, मुंबई यांच्याकडे दाद मागता येईल. अधिक माहितीसाठी १९५० या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आनंदनगरात दारूचा काळा धंदा उघड!

### पोलिसांच्या धाडीत भट्टी उद्ध्वस्त



**वर्धा जनमाध्यम-** आनंदनगर परिसरात रेल्वे रुळालगत टीनाच्या शेडमध्ये सुरू असलेल्या गावठी दारू निर्मितीच्या अड्ड्यावर शहर पोलिसांनी धडक कारवाई केली. पोलिसांनी छापा टाकून तब्बल ७ लाख ३१ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून दारूभट्टी उद्ध्वस्त केली. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आनंदनगर परिसरात रेल्वे रुळालगतच्या टीनाच्या शेडमध्ये मोठ्या प्रमाणात गावठी दारू तयार केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा केल्यानंतर पोलिस पथकाने संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला. यावेळी शेडमध्ये गावठी दारू निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात कच्चा माल आणि तयार दारू आढळून आली.कारवाईदरम्यान ४०० लिटर उकळता मोह सडवा, ४ हजार १०० लिटर कच्चा मोह रसायन सडवा आणि ९० लिटर तयार गावठी मोहा दारू तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे अन्य साहित्य असा एकूण ७ लाख ३१ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. दारू निर्मितीचा अड्डाच उद्ध्वस्त करण्यात आल्याने परिसरातील अवैध दारू विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडिक आणि निरीक्षक नागेशकुमार चतरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड, महेंद्र पाटील, अभिजित वाघमारे, रंजित भुरसे आणि अमोल साळवण यांच्या पथकाने केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# ‘युद्ध मानवतेला घातक...’-मोदींनी दिला शांततेचा संदेश

## बिश्केकमध्ये पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची किर्गिझस्तानची राजधानी बिश्केक येथे भेट झाली. या भेटीदरम्यान पंतप्रधान मोदींनी पुतिन यांना युद्ध थांबवण्याचे आवाहन केले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, युद्ध हे मानवतेला धोका आहे आणि भारताने नेहमीच शांततेचे समर्थन केले आहे. मानवतेच्या भल्यासाठी युद्ध कोणत्याही परिस्थितीत संपवलेच पाहिजे.

पंतप्रधान मोदी म्हणाले, सर्व प्रश्न शांततेनेच सोडवले पाहिजेत. आपण युद्धाच्या समाप्तीकडे वाटचाल केली पाहिजे, कारण युद्धाचा प्रत्येक दिवस मानवतेच्या कल्याणाला मागे ढकलतो.बुद्ध आणि गांधींच्या आदर्शांचे पालन करणारा देश म्हणून भारत नेहमीच शांततेच्या बाजूने राहिला आहे, असेही मोदी म्हणाले.

**दोन्ही देशांसाठी राष्ट्रीय हित सर्वोच्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी पुतिन यांना म्हणाले, ‘तुमचा गेल्या वर्षीचा भारत दौरा खूप यशस्वी आणि संस्मरणीय होता. आमच्यासाठी ही अत्यंत समाधानाची बाब आहे की आमचे सहकार्य नव्या उंचीवर पोहोचत आहे आणि आम्ही दोन्ही देशांतील लोकांच्या कल्याणासाठी एकत्र काम करत आहोत. राष्ट्रीय हिताला सर्वोच्च प्राधान्य देउन पुढे जाणे, हाच आमचा दोघांचा विचार राहिला आहे आणि भविष्यातही तोच आमचा मुख्य मंत्र राहील.

**चर्चेत संरक्षण आणि उर्जा यासह विविध विषयांचा समावेश**

या बैठकीदरम्यान, पंतप्रधान मोदी आणि रशियाच्या राष्ट्राध्यक्षांनी ब्रिक्स शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर संरक्षण सहकार्य, उर्जा पुरवठा, व्यापारी संबंध, खत पुरवठा आणि प्रमुख भू-राजकीय मुद्द्यांवर चर्चा केली. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांना भेटून पंतप्रधान मोदींनी आनंद व्यक्त केला. युक्रेनच्या मुद्द्यावर भारत सर्व शांततापूर्ण प्रयत्नांना पाठिंबा देतो आणि यापुढेही देत राहील. भारत सर्व समस्यांच्या शांततापूर्ण निराकरणाचे समर्थन करतो, जे संपूर्ण मानवतेसाठी आवश्यक आहे. सप्टेंबरमध्ये ब्रिक्स शिखर परिषदेसाठी राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा नवी दिल्ली दौरा रशिया आणि भारत यांच्यातील संबंध अधिक दृढ करेल, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.



# आयएनएस निपुण नौदलाच्या ताफ्यात दाखल

**मुंबई :** भारतीय नौदलाची समुद्रातील ताकद आणखी वाढली आहे. मुंबईतील नौदल ड?कयार्डमध्ये स्वदेशी बनावटीचे आयएनएस निपुण डाइव्हिंग सपोर्ट व्हेसल भारतीय नौदलाच्या ताफ्यात अधिकृतपणे दाखल करण्यात आले. हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेडने (एचएसएल) हे जहाज स्वदेशी तंत्रज्ञानाच्या मदतीने तयार केले आहे. नौदल प्रमुख ॲडमिरल कृष्ण स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात कठर निपुणचे नौदलात कमिशनिंग करण्यात आले. या जहाजामुळे पश्चिम नौदल कमांडला खोल समुद्रातील बचाव आणि डाइव्हिंग मोहिमांसाठी अत्याधुनिक सुविधा मिळणार आहेत. सुमारे ८,५०० टन वजनाचे कठर निपुण हे जहाज ७५ टक्के स्वदेशी सामग्रीपासून तयार करण्यात आले आहे. हे जहाज समुद्रात ३०० मीटर खोलीपर्यंत सॅचुरेशन डाइव्हिंग करू शकते. तसेच ७५ मीटरपर्यंत साइड-स्टेज डाइव्हिंग मोहिमाही राबवता येतात. समुद्रात एखादी पाणबुडी अडचणीत सापडल्यास तिच्यातील नौसैनिकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठीही आयएनएस निपुण महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

**समुद्राच्या तळाशी दुरु स्तीही शक्य-** समुद्राच्या तळाशी एखादे जहाज किंवा यंत्रणा खराब झाल्यास त्याची दुरु स्ती करण्यासाठीही या जहाजाचा वापर करता येणार आहे. यासाठी जहाजात १५ टन क्षमतेची सब-सी क्रेन, डायनॅमिक पोझिशनिंग सिस्टम आणि १,००० मीटर खोलीपर्यंत काम करू शकणारे आरओव्ही म्हणजेच रिमोटली ऑपरेटेड व्हेइकल्स आहेत. खराब हवामान आणि समुद्राच्या मोठ्या लाटांमध्येही जहाज स्थिर राहू शकते. त्यामुळे खोल समुद्रातील कठीण आणि जोखमीच्या मोहिमा अधिक सुरक्षितपणे पार पाडता येतील.

**जहाजात रु ग्णालयाचीही सुविधा-** आयएनएस निपुणमध्ये खोल समुद्रातील मोहिमांदरम्यान वैद्यकीय मदत देण्यासाठी अत्याधुनिक सुविधा आहेत. जहाजात ८ खाटांचे रु ग्णालय, कउब्र, ऑपरेशन थिएटर आणि हायपरबेरिक मेडिकल सुविधा उपलब्ध आहेत. डाइव्हिंगदरम्यान निर्माण होणा-या आरोग्यविषयक समस्या हाताळण्यासाठी या सुविधा महत्त्वाच्या ठरणार आहेत.

**२०१८ मध्ये झाला होता करार-** संरक्षण मंत्रालयाने सप्टेंबर २०१८ मध्ये हिंदुस्तान शिपयार्ड लिमिटेडसोबत अशा दोन डाइव्हिंग सपोर्ट व्हेसलच्या निर्मितीसाठी सुमारे २,३९३ कोटी रु पयांचा करार केला होता. या कराराअंतर्गत कठर निस्तार आणि आयएनएस निपुण ही दोन जहाजे तयार करण्यात आली. कठर निस्तार जुलै २०२५ मध्ये नौदलात दाखल झाले असून ते पूर्व नौदल कमांडअंतर्गत कार्यरत आहे. आता कठर निपुणच्या समावेशामुळे पश्चिम नौदल कमांडची खोल समुद्रातील बचाव आणि डाइव्हिंग क्षमता आणखी मजबूत झाली आहे. ३० जुलै रोजी आयएनएस निपुण नौदलाकडे सुपूर्द करण्यात आले होते. त्यानंतर ३१ ऑगस्ट रोजी मुंबईतील नौदल डाकयार्डमध्ये त्याचे अधिकृत कमिशनिंग करण्यात आले.

# महाराष्ट्रातील ६७ जणांच्या संपर्कासाठी प्रयत्न जारी

**मुंबईः** नेपाळ-तिबेट प्रदेशात २६ ऑगस्ट २०२६ रोजी आलेल्या महापुरामध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पर्यटक व नागरिकही अडकले आहेत. यातील ६७ जणांचा संपर्क व शोध घेण्यासाठी शर्थीचे प्रयत्न चालू आहेत. ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील एकूण बाधित नागरिक संख्या ४०५ आहे. यापैकी २६२ नागरिकांना स्वगृही आणण्यासाठी यशस्वी कार्यवाही होत असून उर्वरित ७६ संपर्कात असून सुरक्षित आहेत.

**विशेष पथक काठमांडू येथे दाखल-** संपर्क होउ शकला नाही अशा पर्यटक नागरिकांच्या शोधासाठी केंद्र सरकारचे विशेष पथक काठमांडू येथे दाखल झाले असून भारताचे नेपाळमधील राजदूत यांनी देखील या पथकाची भेट घेउन आवश्यक सूचना दिल्या आहेत. आपत्तीमुळे बाधित नागरिकांशी संपर्क साधून त्यांच्या सुरक्षिततेची माहिती घेण्याबरोबरच त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनांनुसार प्रवासातील अडचणी दूर करण्याबरोबरच विविध प्रकारची मदत उपलब्ध केली जात आहे. रिचा टूर्स प्रा. लि. या संस्थेमार्फत गेलेल्या ६० नागरिकांच्या गटाशी अद्याप थेट संपर्क प्रस्थापित झालेला नाही. तसेच अन्य ७ नागरिकांची लिंकद्वारे नोंद झाली असून त्यांच्याशीही अद्याप संपर्क होउ शकलेला नाही. या व्यक्तींचा ठावठिकाणा व माहिती मिळविण्याचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहेत. मुख्यमंत्री कार्यालय आणि प्रशासन बाधित पर्यटक व नागरिक राज्यात सुरक्षितरित्या पोहोचावे यासाठी यावर सातत्याने लक्ष ठेवून आहे. राज्यातील आणखी ६९ नागरिक देखील पुढील प्रवास करून मुंबईत पोहोचतील. तिबेटमधील मानसरोवरजवळील सागा येथून ३७ नागरिक २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी मुंबईत सुखरूप पोहोचले आहेत. तसेच सुरक्षित असल्याची माहिती मिळालेल्या नागरिकांपैकी नागपूरमधील १०५ नागरिक भारतात परतले आहेत.

# गणेशोत्सव सांस्कृतिक पद्धतीने साजरा करा

## डीजेच्या अनावश्यक वादात पडू नका -मुख्यमंत्री

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात गणेशोत्सव आणि दहीहंडी उत्सवाच्या अगोदर डीजेचा वाद सुरु झाला आहे. डीजेबंदी साठी नागरिकांनी मोर्चाही काढला आहे. उत्सव साजरा व्हावा पण डिजेमुक्त असावा अशी पुणेकरांची मागणी आहे. यावरून वातावरण चांगलेच तापले आहे. त्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सण-उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. गणेशोत्सव पूर्णपणे सांस्कृतिक परंपरेने आणि उत्साहात साजरा करा, डीजेच्या अनावश्यक वादात पडू नका असे आवाहन त्यांनी पुणेकरांना केले आहे. पुण्यातील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित भाजपच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत ते बोलत होते. यावेळी बोलताना फडणवीस यांनी काँग्रेस आणि राहुल गांधींच्या 'फेक नॅरेटीव्ह' वर टीका केली. काँग्रेस पक्ष थेट निवडणुकीच्या मैदानात भाजपशी मुकाबला करू शकत नाही. त्यामुळे संविधानाचे नाव घेउन देशात अराजकता पसरवण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. ज्यांनी १९७५ मध्ये आणीबाणी लावून संविधानाची मोडतोड केली आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार संपवले, त्यांच्याच हातात आज लाल संविधानाचे कव्हर आहे; मात्र त्यांच्या डोक्यात माओवादी विचार भरलेले आहेत असा हल्लाबोल त्यांनी केला आहे.



**'कुंभमेळा हे विरोधकांचे पुढचे टार्गेट'-** विरोधकांच्या रणनीतीवर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, ‘लोकसभा निवडणुकीपूर्वी 'भारत जोडो'च्या नावाखाली १८० हून अधिक संशयास्पद संस्था जोडल्या गेल्या आहेत. आता पुन्हा एकदा खोटे नॅरेटीव्ह सेट करण्याचे काम सुरू आहे. राम मंदिरावरून संभ्रम निर्माण केल्यानंतर आता विरोधकांचे पुढचे टार्गेट 'कुंभमेळा' हे आहे. यासाठी आतापासूनच काही 'पोपट' बोलायला लागले आहेत,‘ असा थेट टोला त्यांनी विरोधकांना लगावला.

**महिला आरक्षणावर काँग्रेसचे दुटप्पी धोरण-** महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून काँग्रेसवर निशाणा साधताना ते म्हणाले, ‘काँग्रेसने कायम महिला आरक्षणाला छुपा विरोध केला आहे. २०२३ मध्ये जेव्हा संसदेत महिला आरक्षण विधेयक आले, तेव्हा डी-लिमिटेशनची अट माहिती असूनही काँग्रेसने केवळ बहुमतामुळे मतदान केले. राहुल गांधी जर महिलांना संधी देण्याबाबत प्रामाणिक असते, तर त्यांनी प्रियांका गांधींना संधी का दिली नाही? पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली २०२९ मध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण नक्की लागू होईल.‘

# डॉक्टर होण्याचा कटऑफ वाढला

## ४ सप्टेंबरपर्यंत घ्यावा लागणार कॉलेजमध्ये प्रवेश

**मुंबई :** राज्यात यंदा एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कटऑफमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) सुरू असलेल्या एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली असून त्यामध्ये सरकारी कालेजांमधील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गाचा कटऑफ यंदा ५३८ गुणांपर्यंत पोहोचला आहे. गेल्या वर्षी सरकारी मेडिकल कालेजांचा प्रवेशाचा कटऑफ ५०९ एवढा लागला होता. तर यंदा खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांतील खुल्या प्रवर्गाचा प्रवेशाचा कटऑफही ४८२ गुणांपर्यंत वाढला आहे. गेल्या वर्षी खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांतील कटऑफ ४७९ एवढा होता.

पहिल्या फेरीत ज्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळाले आहे त्यांना ३१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान मूळ कागदपत्रे व आवश्यक शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह वाटप झालेल्या महाविद्यालयामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. बँक सुट्टीच्या दिवशी धनादेशद्वारे शुल्क भरण्यास परवानगी असेल. मात्र, पुढील कामकाजाच्या दिवशी तो डिमांड ड्राफ्टने बदलणे आवश्यक राहील.


## जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.४१०/२०२६ ने.ता.०८.१०.२०२६

अर्जदार :
१. राजीव आप्पासाहेब उल्हे, **वय ६८ वर्षे, व्यवसाय - शेती**
**रा.ब्राम्हणवाडा थडी, ह.मु.शिवाजीनगर, अमरावती, ता.जि.अमरावती**
२. सुधीर आप्पासाहेब उल्हे, **वय ६३ वर्षे, व्यवसाय - शेती**
**रा.ब्राम्हणवाडा थडी, ह.मु.शंकर नगर नाशिक, ता.जि.नाशिक**
३. प्रभाताई शंकरराव पाटील, **वय ७७ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
**रा.उमरी, अकोला, ता.जि.अकोला**
४. प्रतिभा मुरलीधर इंगळे, **वय ७७ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
**रा.कावली वसाड, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती**
५. शोभा योगेश्वर कदम, **वय ७१ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
**रा.साईनगर, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा**
६. सुलभा हरिश दळवी, **वय ७० वर्षे, व्यवसाय- घरकाम**
**रा.टिंगणे नगर, पुणे, ता.जि.पुणे**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.** मृतक अण्णासाहेब हरिभाऊ उल्हे **यांचा** मृत्यू दि.०२/०२/२०२२ **रोजी तसेच मृतक नलिनीबाई अण्णासाहेब उल्हे हिचा मृत्यू दि.१३/०६/२००६ रोजी अमरावती येथे झालेला आहे.त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

**अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.४१०/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.२५.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार**



दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१७१६/२०२६
Chandrashekhar Madhusudan Jagdale+ 1 Versus NIL
पुढील ता.०५.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants
1. Chandrashekhar Madhusudan Jagdale,
**Aged about 58 years. Occu.: Business**
**R/o. Near Lathebai School, Sharda Nagar, Amravati, Tq. & Dist. Amravati**
2. Aparna Gajanan Adwanikar
**Aged about 60 years, Occu.: Household**
**R/o. Shilangan Road, Ganesh Colony, Amravati Tq. & Dist. Amravati**

---- *Versus* ----

Non-Applicant - NIL

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत deceased Madhusudan Shrikrushna Jagdale **हे दिनांक २९.१२.२००६ रोजी अमरावती येथे व** deceased Saroj Madhusudan Jagdale **हया दि.१३.०२.२०१८ रोजी अमरावती येथे मयत झाले.** Chandrashekhar Madhusudan Jagdale+1 Versus NIL **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** Chandrashekhar Madhusudan Jagdale+1 Versus NIL **वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दिनांक** २०.०८.२०२६ **रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती


# राज्यातील ८ लाख हेक्टरवर पेरणीच नाही !

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात खरीप हंगाम २०२६-२७ मधील पेरणी ३१ ऑगस्टअखेर १ कोटी ३६ लाख ५६ हजार हेक्टरवर पोहोचली आहे. गेल्या पाच वर्षांच्या सरासरी खरीप क्षेत्राच्या तुलनेत यंदा ९५ टक्के पेरणी झाली आहे. अपु-या पावसामुळे आणि हंगामा दरम्यान पावसात खंड पडल्यामुळे पेरणी क्षेत्रात सरासरीच्या तुलनेत सुमारे आठ लाख हेक्टरने घट झाली आहे. विभागनिहाय पेरण्यांमध्ये मोठी तफावत असून कोकण, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पेरणी सरासरीपेक्षा कमी झाली आहे.कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात खरीप पिकांचे २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षांचे सरासरी क्षेत्र १ कोटी ४४ लाख ३६ हजार हेक्टर आहे. यंदा ३१ ऑगस्टपर्यंत १ कोटी ३६ लाख ५६ हजार हेक्टरवर प्रत्यक्ष पेरणी झाली आहे. मागील वर्षी २९ ऑगस्टपर्यंत १ कोटी ४२ लाख ७५ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. त्यामुळे यंदाचे पेरणी क्षेत्र मागील वर्षाच्या तुलनेतही कमी आहे. राज्यातील एकूण पेरणी ९५ टक्क्यांवर पोहोचली असली तरी जिल्हानिहाय चित्र समान नाही. काही जिल्ह्यांनी सरासरी क्षेत्र ओलांडले आहे, तर काही जिल्हे अद्याप सरासरीच्या ७० ते ८० टक्क्यांच्या आसपास आहेत.

यंदाच्या मोसमी पावसाच्या हंगामात जून महिना कोरडा गेला. जुलै महिन्याच्या सुरु वातीला समाधानकारक पाउस झाल्यामुळे पेरण्यांची टक्केवारी वाढली. मात्र, ऑगस्ट महिना बहुतांश कोरडा गेला त्यामुळे पेरण्याच्या टक्केवारीत वाढ होउ शकली नाही. ऑगस्ट महिन्यात प्रामुख्याने मराठवाड्यात पावसाने



ओढ दिल्यामुळे पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. आठवडाभरात पाउस न झाल्यास पिके जळून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**पुणे विभागात सरासरीपेक्षा जास्त पेरा-** पुणे विभागाने यंदा पेरणीत आघाडी घेतली असून, विभागातील पेरणी सरासरीच्या १०१ टक्क्यांवर पोहोचली आहे. विभागात १२ लाख ६६ हजार ८३६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. सोलापूरमध्ये सरासरीच्या १०४ टक्के तर अहिल्यानगरमध्ये ९९ टक्के पेरणी झाली आहे. नाशिक विभागात १९ लाख ८५ हजार ३५२ हेक्टरवर पेरणी झाली असून सरासरीच्या ९८ टक्के क्षेत्राची पूर्तता झाली आहे. नाशिक जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक, म्हणजे १०१ टक्के पेरणी झाली आहे. धुळे ९८, जळगाव ९७ आणि नंदुरबार ९० टक्क्यांवर आहे. अमरावती विभागात २९ लाख ८३ हजार ६०१ हेक्टरवर पेरणी झाली असून, सरासरीच्या ९४ टक्के क्षेत्राची पूर्तता झाली आहे. यवतमाळमध्ये ९३ टक्के, वाशिममध्ये ९३ आणि अमरावतीमध्ये ९४ टक्के पेरणी झाली आहे. नागपूर विभागात सरासरीच्या ९४ टक्के पेरणी झाली आहे. मात्र, गोंदिया जिल्ह्याने सरासरी ओलांडत ११३ टक्के पेरणी केली आहे. याउलट चंद्रपूरमध्ये ८८, नागपूर आणि भंडा-यात प्रत्येकी ९० टक्के पेरणी झाली आहे.

**कोकण विभाग सर्वाधिक पिछाडीवर-** कोकण विभागातील खरीप पेरणी सरासरीच्या केवळ ८३ टक्क्यांवर आहे. विभागात ३ लाख २३ हजार ८८५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. रायगडमध्ये सरासरीच्या ६७ टक्के तर रत्नागिरीत ७१, सिंधुदुर्गात ८४, तर ठाणे आणि पालघरमध्ये ९६ टक्के पेरणी झाली आहे.

**लातूर, हिंगोली पिछाडीवर**

छत्रपती संभाजीनगर विभागात सरासरीच्या ९३ टक्के, तर लातूर विभागात ९४ टक्के पेरणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात जालना जिल्ह्यात पेरणी ९० टक्क्यांवर आहे. लातूर विभागात हिंगोली सर्वाधिक पिछाडीवर असून, तेथे सरासरीच्या केवळ ८१ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. नांदेडमध्ये ९७ टक्के पेरणी झाली आहे.

# लाडकी बहीणमधील अपात्र बहिणींच्या असंतोषाला फोडणी?

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या पडताळणीनंतर तब्बल ९२ लाख ७० हजार लाडक्या बहिणींना अपात्र ठरविण्यात आल्याने राज्यात नव्या असंतोषाची मुहूर्तमेढ रोवली जात आहे. ऑगस्ट महिन्यात एक कोटी ६४ लाख ८२ हजार महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत.अनुदानापासून वंचित राहिलेल्या महिलांना एकत्र आणण्यासाठी काही सामाजिक संघटनांसह राजकीय पक्षांनीही हालचाली सुरू केल्या आहेत.विधानसभा निवडणुकीत महत्त्वाचा ठरलेला लाडकी बहीणचा मुद्दा आता अपात्र महिलांच्या असंतोषाला खतपाणी घालण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या असंतोषाला फुंकर घातली आहे. योजनेच्या लाभार्थ्यांची ई-केवायसी आणि विविध निकषांच्या आधारे पडताळणी करण्यात आली. उत्पन्नाची मर्यादा, कुटुंबातील आयकरदाते सदस्य, चारचाकी वाहन, एकाच कुटुंबातील लाभार्थ्यांची संख्या तसेच ई-केवायसीतील त्रु टी आदी कारणांमुळे मोठ्या प्रमाणावर महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे. ही संख्या आता ९२ लाखांपेक्षा जास्त झाली असून भविष्यात ही संख्या एक कोटीपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.अपात्र ठरलेल्या महिलांमध्ये तांत्रिक कारणांमुळे किंवा माहितीतील त्रु टींमुळे लाभ बंद झाल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.



विशेषतः ई-केवायसी पूर्ण न होणे, वेबसाईटवरील अडचणी आणि कागदपत्रांमधील विसंगती यामुळे आर्थिकदृष्ट्या पात्र असूनही लाभापासून वंचित राहिल्याचा दावा काही महिलांकडून करण्यात येत आहे. अपात्रतेचे नेमके कारण स्पष्ट करण्यात यावे आणि पात्र महिलांना पुन्हा संधी द्यावी, अशी मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर अपात्र महिलांच्या प्रश्नाला संघटित स्वरू प देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. कष्टकरी संघर्ष महासंघाने अपात्र ठरलेल्या लाडक्या बहिणींसाठी १ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलनाची हाक दिली आहे. ई-केवायसी किंवा तांत्रिक अडचणींमुळे वंचित राहिलेल्या महिलांना पुन्हा संधी देणे, अपात्रतेची कारणनिहाय माहिती जाहीर करणे आणि वृद्ध, विधवा, परित्यक्ता, कष्टकरी व निराधार महिलांसाठी विशेष मोहीम राबविणे या मागण्या करण्यात आल्या आहेत. अपात्र ठरलेल्या महिलांची संख्या ९२ लाखांहून अधिक असल्याने या प्रश्नाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. काही राजकीय पक्ष आणि संघटना या महिलांमधील असंतोषाला संघटित करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी त्यासाठी पुढाकार घेतला आहे.. सरकारने लाडक्या बहिणींची फसवणूक केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सर्व अपात्र महिला प्रत्यक्षात पात्र असल्याचा दावा करता येत नसला, तरी तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे वंचित राहिलेल्या महिलांचा प्रश्न सरकारसमोर आव्हान ठरू शकतो. राज्यात मराठा, ओबीसी आंदोलनाने पुन्हा डोके वर काढले आहे. सरकारच्या नेत्यांची या आंदोलनामुळे डोकेदुखी वाढली आहे.

# रस्ते अपघातातील मृत्यूंपैकी सुमारे 20 टक्के मृत्यू पादचा-यांचे-परिवहन मंत्री

**ठाणे :** राज्यात २०२३ मध्ये ३,११० पादचारी व सुमारे ७,७८२ दुचाकीस्वारांचा अपघाती मृत्यू झाला. राज्यात दररोज सरासरी ८ ते ९ पादचारी व २१ दुचाकीस्वार रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतात. एकूण रस्ते अपघाती मृत्यूंपैकी सुमारे २० टक्के मृत्यू पादचा-यांचे, तर जवळपास निम्मे मृत्यू दुचाकीस्वारांचे आहेत. त्यामुळे एकूण अपघाती मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू पादचारी व दुचाकीस्वारांचे असल्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. ठाणे पोलिस आयुक्तलयाच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या ट्रॅफिक स्कूल ऑन व्हील्स या उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. देशातील रस्ते अपघातांत पादचारी व दुचाकीस्वारांच्या मृत्यूचे प्रमाण चिंताजनक असल्याचे २०२३ मधील आकडेवारीवरू न स्पष्ट होते. देशात २०२३ मध्ये वर्षभरात ३५,२०३ पादचारी व ७७,५३९ दुचाकीस्वारांचा रस्ते अपघातांत मृत्यू झाला. दररोज सरासरी ९६ पादचारी व २१२ दुचाकीस्वारांना आपला जीव गमवावा लागतो. राज्यात २०२३मध्ये ३,११० पादचारी व सुमारे ७,७८२ दुचाकीस्वारांचा अपघाती मृत्यू झाला. राज्यात दररोज सरासरी ८ ते ९ पादचारी आणि २१ दुचाकीस्वार रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतात. राज्यातील एकूण रस्ते अपघाती मृत्यूंपैकी सुमारे २० टक्के मृत्यू पादचा-यांचे, तर जवळपास निम्मे मृत्यू दुचाकीस्वारांचे आहेत. त्यामुळे एकूण अपघाती मृत्यूंपैकी सुमारे ७० टक्के मृत्यू पादचारी आणि दुचाकीस्वारांचे असल्याचे प्रताप सरनाईक म्हणाले.

# सहाय्यक प्राध्यापक भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक करणार-मंत्री चंद्रकांत पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील सहाय्यक प्राध्यापक पदांची भरती प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि नियमबद्ध करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.भरती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्यात येणार असून, संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही रेकार्डिंग करणे तसेच अंतिम निवड यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले की, शासनाचे पदभरतीबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्था किंवा महाविद्यालयाने भरतीच्या जाहिरातीचा मसुदा संबंधित विद्यापीठाकडे मान्यतेसाठी सादर करावा. विद्यापीठाने जाहिरातीला मान्यता देताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) संबंधित नियमांनुसार शैक्षणिक पात्रता, सामाजिक आरक्षण तसेच समांतर आरक्षणाची अचूक नोंद झाली आहे की नाही, याची खातरजमा करावी. ही जबाबदारी विद्यापीठाच्या मागासवर्ग कक्षाची राहणार आहे.

**राष्ट्रीय व राज्यस्तरीय वृत्तपत्रांत जाहिरात-** भरतीची जाहिरात विद्यापीठाने मंजूर केलेल्या मसुद्यानुसारच प्रसिद्ध करावी लागणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रासह माहिती व जनसंपर्क विभागाने घोषित केलेल्या अ किंवा ब वर्गातील राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सर्व संस्था आणि महाविद्यालयांनी उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारणे आवश्यक आहे. मात्र, उमेदवारांना ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करायचा असल्यास तोही स्वीकारावा लागणार आहे. ऑनलाइन तसेच ऑफलाइन अर्ज करणा-या प्रत्येक उमेदवाराला अर्जाची पोहोच देण्याची जबाबदारी संबंधित संस्था किंवा महाविद्यालयाची राहणार आहे.

**यूजीसीच्या निकषांनुसार शार्टलिस्टिंग-** मुलाखतीसाठी उमेदवारांची निवड करताना यूजीसीच्या १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसूचनेतील Appendix-II मधील Table 3B चा वापर करावा. शार्टलिस्टिंग करताना महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (अध्यापक संवर्गातील आरक्षण) अधिनियम, २०२१ तसेच सामाजिक आणि समांतर आरक्षणाचे धोरण विचारात घेणे आवश्यक राहणार आहे.मुलाखतीसाठी किती उमेदवार शार्टलिस्ट करायचे, याचे प्रमाण संबंधित संस्था किंवा महाविद्यालयाने निश्चित करावे. शार्टलिस्टिंगसाठी वापरलेले निकष आणि निवडलेल्या उमेदवारांची यादी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक आहे. तसेच अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांची यादी आणि शार्टलिस्टिंग प्रक्रियेत त्यांना मिळालेले गुण संबंधित विद्यापीठाकडे ऑनलाइन सादर करावे लागणार आहेत. मुलाखतीसाठी निवड समिती यूजीसीच्या १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच शासन निर्णय १० मे २०१९ आणि १ जानेवारी २०२४ मधील तरतुदींनुसार गठित करावी. निवड समिती गठित करण्याचीजबाबदारी संबंधित संस्थेची राहणार आहे.मुलाखतीची प्रक्रिया यूजीसीने निर्धारित केलेल्या नियमांनुसार पार पाडावी. विद्यापीठांनी मुलाखतीतील गुणांकनाचे निकष निश्चित करून त्यानुसार गुणांकन पत्रक तयार करावे. अंतिम निवड यादीला मान्यता देताना प्रत्यक्ष मुलाखत प्रक्रिया निर्धारित गुणांकन पत्रकानुसार झाली आहे की नाही, याची खातरजमा संबंधित विद्यापीठाने करावी.

**मुलाखतींचे सीसीटीव्ही रेकार्डिंग बंधनकारक-** सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यासाठी संपूर्ण मुलाखत प्रक्रियेचे सीसीटीव्ही प्रणालीद्वारे रेकार्डिंग करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मुलाखतीच्या तारखेपासून किमान एक वर्ष हे रेकार्डिंग गोपनीय दस्तऐवज म्हणून सुरक्षित ठेवावे लागणार आहे.भरती प्रक्रियेबाबत तक्रार, आक्षेप, चौकशी, न्यायालयीन अथवा वैधानिक कार्यवाही सुरू असल्यास संबंधित रेकार्डिंग नष्ट करता येणार नाही. प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत ते सुरक्षित ठेवणे बंधनकारक राहणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांची पात्रता आणि संपूर्ण निवड प्रक्रिया नियमानुसार पार पडली आहे की नाही, याची खातरजमा केल्यानंतर संबंधित विद्यापीठाने अंतिम निवड यादीला मान्यता द्यावी.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## हरित अर्थव्यवस्थेच्या दिशेने..

देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासात रेल्वेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे; मात्र या विशाल यंत्रणेतील डिझेल इंजिनांमुळे होणारे कार्बन उत्सर्जन, वाढते वायुप्रदूषण आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व ही गंभीर आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत हायड्रोजन इंधनावर चालणाऱ्या रेल्वेगाड्या हा भारतासाठी केवळ पर्याय नसून भविष्यातील अपरिहार्य मार्ग ठरत आहे. हायड्रोजन ट्रेन पारंपरिक डिझेल इंजिनाप्रमाणे इंधन जाळत नाही. या ट्रेनमध्ये 'फ्यूएल सेल' तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. हायड्रोजन आणि वातावरणातील ऑक्सिजन यांच्या रासायनिक अभिक्रियेतून वीज तयार होते. ही वीज रेल्वेच्या मोटरी चालवते आणि या प्रक्रियेत उपउत्पादन म्हणून केवळ पाण्याची वाफ निर्माण होते. म्हणजेच धूर नाही, कार्बन डायऑक्साइड नाही, प्रदूषण नाही. म्हणूनच या तंत्रज्ञानाला 'शून्य उत्सर्जन तंत्रज्ञान' असेही संबोधले जाते. भारतीय रेल्वेने बहुतेक मार्गांचे विद्युतीकरण पूर्ण केले असले, तरी अजूनही काही डोंगराळ, दुर्गम किंवा कमी वाहतुकीच्या मार्गावर डिझेल इंजिनांचा वापर करावा लागतो. या मार्गावर विद्युत वाहिन्या उभारणे खर्चिक आणि वेळखाऊ आहे.अशा ठिकाणी हायड्रोजन ट्रेन अधिक उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे रेल्वेची कार्यक्षमता वाढेल आणि विद्युतीकरणावर होणारा अतिरिक्त खर्चही कमी होईल. हायड्रोजन ट्रेनमुळे पर्यावरणाला मोठा दिलासा मिळणार आहे. तापमान, अनियमित पाऊस, दुष्काळ, पूर आणि नैसर्गिक आपत्ती यामागे हरितगृह वायूंचे वाढते उत्सर्जन हे आज हवामानबदलामागील प्रमुख कारण मानले जाते. वाहतूक क्षेत्र हा कार्बन उत्सर्जनाचा मोठा स्त्रोत आहे. भारतीय रेल्वेने डिझेल इंजिनांच्या जागी हायड्रोजन ट्रेनचा मोठ्या प्रमाणावर स्वीकार केल्यास कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट होईल. भारताने २०७० पर्यंत 'नेट झिरो' कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट ठेवले असून त्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरेल. याशिवाय हायड्रोजन ट्रेन ध्वनिप्रदूषणही कमी करेल. डिझेल इंजिनांच्या तुलनेत 'फ्युएल सेल'वर चालणाऱ्या गाड्या अधिक शांत असतात. रेल्वेमार्गालगत राहणाऱ्या नागरिकांना याचा फायदा होईल. प्रवाशांनाही अधिक सुखद आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल. भारताच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही हायड्रोजन ट्रेन अत्यंत महत्त्वाची आहे. भारत मोठ्या प्रमाणावर कच्च्या तेलाची आयात करतो. जागतिक बाजारातील तेलाच्या किमती वाढल्या, की त्याचा थेट परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होतो. देशात मोठ्या प्रमाणावर हरित हायड्रोजनचे उत्पादन सुरू झाले, तर इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी होईल. यामुळे परकीय चलनाची बचत होईल आणि भारत ऊर्जा स्वावलंबनाकडे अधिक वेगाने वाटचाल करेल. हायड्रोजन ट्रेनमुळे देशात नवीन उद्योगांची निर्मिती होणार आहे. हरित हायड्रोजन उत्पादन,'फ्युएल सेल' निर्मिती, उच्च दाबाच्या टाक्या, सुरक्षा प्रणाली, सेन्सर तंत्रज्ञान, देखभाल सेवा आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होईल. हायड्रोजन 'फ्युएल सेल', विशेष टाक्या आणि सुरक्षा यंत्रणा यांची किंमत सध्या खूप जास्त आहे. हायड्रोजन निर्मिती, साठवण आणि वितरणासाठी स्वतंत्र पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. सुरुवातीच्या टप्प्यात मोठ्या प्रमाणावर सरकारी गुंतवणूक आणि दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. हरित हायड्रोजन उत्पादन हे दुसरे मोठे आव्हान आहे. आज उपलब्ध असलेल्या हायड्रोजनपैकी मोठा भाग नैसर्गिक वायूपासून तयार केला जातो. त्यामुळे कार्बन उत्सर्जन होते. पर्यावरणपूरक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सौर, पवन आणि जलविद्युत ऊर्जेच्या साहाय्याने तयार होणाऱ्या 'ग्रीन हायड्रोजन' चे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढवावे लागेल.अन्यथा,हायड्रोजन ट्रेनचा पर्यावरणीय लाभमर्यादित राहील. सुरक्षेचाही मुद्दा दुर्लक्षित करता येणार नाही. हायड्रोजन हा अत्यंत हलका आणि ज्वलनशील वायू आहे. त्यामुळे त्याची साठवण, वाहतूक आणि वापर यासाठी अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहे.आधुनिक सेन्सर, उच्च दर्जाच्या टाक्या, नियमित तपासणी आणि प्रशिक्षित कर्मचारी यांच्या साहाय्याने हे आव्हान प्रभावीपणे हाताळता येऊ शकते. भारतीय रेल्वेसमोर आणखी एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे तांत्रिक मनुष्यबळाची तयारी. अभियंते, चालक, तंत्रज्ञ आणि देखभाल कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण द्यावे लागेल. संशोधन संस्था,अभियांत्रिकी महाविद्यालये आणि औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांनीही या नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करणे आवश्यक आहे. इथे नमूद करण्याजोगा आणखी एक महत्त्वाचा सामाजिक परिणाम म्हणजे ग्रामीण आणि दुर्गम भागातील रेल्वे सेवा अधिक सक्षम होण्याची शक्यता. विद्युतीकरण करणे अवघड असलेल्या भागांमध्ये पर्यावरणपूरक रेल्वे सेवा उपलब्ध होऊ शकते. पर्यटनालाही चालना मिळेल. विशेषतः डोंगराळ आणि पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये प्रदूषणमुक्त रेल्वे ही मोठी देणगी ठरेल. भारतातील हायड्रोजन ट्रेन प्रकल्प हा केवळ रेल्वे मंत्रालयाचा उपक्रम नाही, तर भारताच्या हरित अर्थव्यवस्थेच्या भविष्यातील आराखड्याचा महत्त्वाचा भाग आहे. वाहतूक, ऊर्जा, उद्योग आणि पर्यावरण या चारही क्षेत्रांना जोडणारा हा प्रकल्प देशाच्या विकासाला नवी दिशा देऊ शकतो. सुरुवातीला खर्च जास्त वाटला,तरी दीर्घकालीन आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय लाभ लक्षात घेतल्यास ही गुंतवणूक अत्यंत मोलाची ठरेल. आज जग 'ग्रीन मोबिलिटी'कडे वाटचाल करत आहे. विद्युत वाहने, हरित ऊर्जा आणि स्वच्छ इंधन यांचा स्वीकार ही काळाची गरज बनली आहे. भारतानेही या शर्यतीत मागे न राहता स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे. भारतीय रेल्वेच्या इतिहासात वाफेच्या इंजिनानंतर, डिझेलनंतर आणि विजेनंतर आता हायड्रोजन हे चौथे मोठे परिवर्तन ठरण्याची चिन्हे आहेत. ही हरित क्रांती यशस्वी झाली, तर भारत रेल्वे क्षेत्रातच नव्हे, तर पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाच्या जागतिक नकाशावरही अग्रस्थानी पोहोचेल. म्हणूनच, भारताची हायड्रोजन ट्रेन ही केवळ भविष्याची कल्पना नसून शाश्वत, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या दिशेने धावणारी वास्तववादी आशा आहे. भारतीय रेल्वे ही देशाच्या अर्थव्यवस्थेची जीवनवाहिनी मानली जाते. दररोज कोट्यवधी प्रवाशांना सेवा देणारी आणि लाखो टन मालाची वाहतूक करणारी भारतीय रेल्वे आता केवळ प्रवासाचे साधन राहिलेली नाही, तर तंत्रज्ञान, पर्यावरण आणि शाश्वत विकास यांचा समतोल साधणारी आधुनिक व्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# विलीनीकरण की समन्वय?

**काँग्रेसला स्वीकारणारा प्रत्येक मतदार समाजवादी पक्षाला स्वीकारेल आणि समाजवादी पक्षाचा प्रत्येक पारंपरिक मतदार काँग्रेसशी सहज एकरूप होईल, असे मानणे म्हणजे भारतीय निवडणुकांच्या गुंतागुंतीकडे दुर्लक्ष करणे होय. पक्षांचे विलीनीकरण दिल्लीतील बैठकीत होऊ शकते. कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षांचे विलीनीकरण मात्र आदेशाने होत नाही.**



राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्यात गेल्या काही वर्षांत निर्माण झालेली राजकीय जवळीक लपून राहिलेली नाही. सामाजिक न्याय, जातनिहाय प्रतिनिधित्व, मागासवर्गीयांचे प्रश्न, दलित आणि अल्पसंख्याकांचा सहभाग अशा अनेक मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांची भाषा जवळ येत आहे. भारतीय जनता पक्षाविरोधात व्यापक सामाजिक आघाडी उभी करण्याचा प्रयत्नही दोघांकडून होत आहे. म्हणून दोन्ही पक्षांचे राजकीय अवकाश आता जवळपास एकच झाले असून त्यांचे विलीनीकरण झाले, तर राष्ट्रीय पातळीवर भाजपला अधिक सक्षम पर्याय निर्माण होईल, असा युक्तिवाद केला जातो; मात्र दोन पक्ष काही मुद्द्यांवर समान भूमिका घेत आहेत, याचा अर्थ त्यांची सामाजिक मुळेही समान आहेत, असे होत नाही.

काँग्रेसची उत्तर प्रदेशातील राजकीय परंपरा आणि समाजवादी पक्षाची जडणघडण मुळातच भिन्न आहे. एकेकाळी उत्तर प्रदेशात काँग्रेस हा व्यापक सामाजिक छत्र उभारणारा पक्ष होता. ब्राह्मण, दलित, मुस्लीम तसेच विविध सामाजिक घटकांना एकत्र ठेवणारी त्याची मतपेढी होती. मंडल राजकारण, राम मंदिर आंदोलन आणि प्रादेशिक पक्षांच्या उदयानंतर हे समीकरण मोडले. समाजवादी पक्षाचा जन्म मात्र राममनोहर लोहिया यांच्या समाजवादी विचारांच्या परंपरेतून, मागासवर्गीयांच्या राजकीय सक्षमीकरणातून आणि स्वतंत्र प्रादेशिक नेतृत्वाच्या आग्रहातून झाला. यादव, मुस्लीम आणि इतर मागासवर्गीय समूह हा त्याच्या राजकीय आधाराचा महत्त्वाचा भाग राहिला. अखिलेश यादव यांनी अलीकडे या सामाजिक चौकटीचा विस्तार करण्याचा प्रयत्न केला असला, तरी समाजवादी पक्ष आणि काँग्रेस हे एकमेकांचे राजकीय पर्याय झालेले नाहीत.

याच ठिकाणी विलीनीकरणाच्या कल्पनेची पहिली मर्यादा स्पष्ट होते. मतदार म्हणजे एका पक्षाच्या खात्यातून दुसऱ्या पक्षाच्या खात्यात सहज वर्ग करता येणारी संख्या नसते. अगदी 'मुस्लीम मतदार' असे एकसंध वर्णनही प्रत्यक्षात अपुरे ठरते. स्थानिक नेतृत्व, आर्थिक स्तर, उमेदवाराची प्रतिमा आणि मतदारसंघातील परिस्थिती यानुसार मतदान बदलते. दलित आणि मागासवर्गीय मतदारांच्या बाबतीतही हेच लागू होते. काँग्रेसला स्वीकारणारा प्रत्येक मतदार समाजवादी पक्षाला स्वीकारेल आणि समाजवादी पक्षाचा प्रत्येक पारंपरिक मतदार काँग्रेसशी सहज एकरूप होईल, असे मानणे म्हणजे भारतीय निवडणुकांच्या गुंतागुंतीकडे दुर्लक्ष करणे होय. याहून महत्त्वाचा प्रश्न कार्यकर्त्यांचा आहे. पक्षांचे विलीनीकरण दिल्लीतील बैठकीत होऊ शकते. कार्यकर्त्यांच्या महत्त्वाकांक्षांचे विलीनीकरण मात्र आदेशाने होत नाही. प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक मतदारसंघात वर्षानुवर्षे पक्षासाठी काम करणारे आणि उमेदवारीची अपेक्षा ठेवणारे नेते असतात. दोन पक्ष एक झाले, तर कार्यकर्त्यांची संख्या वाढते; पण विधानसभा आणि लोकसभेच्या जागा वाढत नाहीत. एका जागेसाठी दोन दावेदार असतील, तेथे विलीनीकरणानंतर चार होऊ शकतात. मग, बंडखोरी, अंतर्गत गटबाजी, प्रचारातील उदासीनता आणि पक्षांतर यांना खतपाणी मिळते. वरच्या पातळीवरील ऐक्य तळागाळातील संघर्ष अधिक तीव्र करणारेही ठरू शकते.

उत्तर प्रदेशाने अशा राजकीय बेरजेचे प्रयोग यापूर्वी पाहिले आहेत. २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने मोठ्या गाजावाजात हातमिळवणी केली. राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्या मैत्रीचे चित्र पुढे करण्यात आले; मात्र निकालात समाजवादी पक्षाला ४७ आणि काँग्रेसला अवघ्या ७ जागा मिळाल्या, तर भाजपने ३१२ जागा जिंकल्या. दोन नेत्यांची जवळीक म्हणजे त्यांच्या कार्यकर्त्यांची आणि मतदारांची आपोआप जवळीक होत नाही, हा त्या निवडणुकीचा महत्त्वाचा धडा होता. २०१९ मध्ये समाजवादी पक्ष आणि बहुजन समाज पक्षाने केलेल्या महाआघाडीनेही असेच गणित मांडले होते. दोन्ही पक्षांच्या आधीच्या मतांची बेरीज केली, तर भाजपसमोर प्रचंड आव्हान उभे राहील, असे वाटत होते. प्रत्यक्षात मतांचे हस्तांतरण अपेक्षेइतके सहज झाले नाही आणि आघाडीला १५ जागांवर समाधान मानावे लागले. उत्तर प्रदेशातील मतदारांनी वारंवार दाखवून दिले आहे की, निवडणूकपूर्व अंकगणित आणि मतदान केंद्रावरील वास्तव यात अंतर असते.

याच्या नेमका उलट अनुभव २०२४ च्या लोकसभा निवडणुकीने दिला. समाजवादी पक्षाने ३७ आणि काँग्रेसने ६ जागा जिंकल्या. इंडिया आघाडीने उत्तर प्रदेशातील ८० पैकी ४३ जागा मिळवून भाजपला मोठा धक्का दिला. हा निकाल काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या विलीनीकरणाच्या बाजूने पुरावा ठरत नाही. तो तर स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून केलेल्या समन्वयाच्या यशाचा दाखला आहे. दोन्ही पक्षांनी आपापली चिन्हे, नेतृत्व, संघटनात्मक रचना आणि स्वतंत्र राजकीय ओळख कायम ठेवली. जिथे एकमेकांशी संघर्ष टाळणे आवश्यक होते, तिथे जागावाटप केले आणि मतदारांसमोर समान राजकीय मुद्दे ठेवले. वेगळेपण नष्ट न करता त्याचा उपयोग परस्परपूरक शक्तीत करण्याची ही पद्धत होती. मग, यशस्वी आघाडीचे रूपांतर विलीनीकरणात करण्याची गरजच काय?

भारतीय राजकारणात त्याचे ऐतिहासिक उत्तरही उपलब्ध आहे. आणीबाणीनंतर १९७७ मध्ये इंदिरा गांधी यांना पराभूत करण्यासाठी काँग्रेस संघटना, भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ आणि विविध समाजवादी प्रवाह एकत्र आले. जनता पक्ष अस्तित्वात आला. इंदिराविरोधी जनमताच्या लाटेवर त्याने ऐतिहासिक विजय मिळवला आणि केंद्रात पहिले बिगरकाँग्रेसी सरकार स्थापन झाले; परंतु निवडणूक जिंकण्यासाठी पुरेसे ठरलेले ऐक्य टिकाऊ पक्ष उभारण्यासाठी अपुरे पडले. जुन्या वैचारिक मतभेदांनी पुन्हा डोके वर काढले. नेतृत्वाच्या स्पर्धा तीव्र झाल्या आणि मोरारजी देसाई सरकार १९७९ मध्ये कोसळले. या इतिहासाचा अर्थ विरोधी पक्षांनी एकत्र येऊ नये असा नाही. उलट समान राजकीय उद्दिष्टांसाठी एकत्र येणे अनेकदा आवश्यक असते; मात्र 'अमुक नेत्याला पराभूत करायचे' एवढाच आधार नव्या पक्षाच्या अस्तित्वासाठी पुरेसा नसतो. १९७७ मध्ये 'इंदिरा हटाव'च्या विरोधी भावनेने विविध प्रवाह एकत्र आले. आज 'मोदींना पराभूत करणे' हे विरोधकांच्या सहकार्याचे कारण असू शकते; पण ते नव्या राजकीय पक्षाचे तत्त्वज्ञान होऊ शकत नाही.

काँग्रेस आणि समाजवादी पक्षाच्या विलीनीकरणानंतर निर्माण होणारे प्रश्नही साधे नाहीत. उत्तर प्रदेशातील संघटनेवर नियंत्रण कोणाचे असेल? उमेदवार निश्चित करण्याचा अंतिम अधिकार कोणाकडे असेल? अखिलेश यादव यांचे नेतृत्व कोणत्या चौकटीत बसेल? काँग्रेसच्या राष्ट्रीय हितसंबंधांचा आणि समाजवादी पक्षाच्या उत्तर प्रदेशकेंद्री राजकीय गरजांचा संघर्ष झाला, तर निर्णय कोणाचा चालेल? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उत्तर प्रदेशात पुन्हा स्वतंत्रपणे उभे राहण्याची दीर्घकालीन आकांक्षा काँग्रेसने सोडायची का? आणि दुसऱ्या बाजूला अखिलेश यादव यांनी स्वतंत्र प्रादेशिक पक्षाचे प्रमुख म्हणून असलेली स्वायत्तता राष्ट्रीय पक्षाच्या व्यापक सत्ताकेंद्रासाठी गमवायची का, हे प्रश्न विलीनीकरण झाल्यानंतर सोडविण्याचे किरकोळ प्रशासकीय मुद्दे नाहीत. हेच विलीनीकरणाच्या व्यवहार्यतेचे मूळ प्रश्न आहेत.

यात भारतीय संघराज्याच्या राजकीय स्वरूपाचाही विचार करावा लागतो. प्रादेशिक पक्ष म्हणजे राष्ट्रीय राजकारणातील अडथळा किंवा काँग्रेसच्या ऱ्हासानंतर निर्माण झालेला तात्पुरता अवशेष नाही. तामिळनाडू, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, बिहार, महाराष्ट्र, तेलंगणा अशा अनेक राज्यांतील प्रादेशिक पक्षांचा उदय स्थानिक अस्मिता, सामाजिक सक्षमीकरण, भाषिक ओळख, जातीय प्रतिनिधित्व आणि राज्यांच्या स्वतंत्र राजकीय गरजांतून झाला आहे. भारताचे राजकारण राष्ट्रीय होत आहे म्हणून प्रादेशिक राजकारण संपत चालले आहे, असे समजणे धोकादायक ठरेल. लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय प्रश्न महत्त्वाचे असले, तरी मतदानाच्या निर्णयावर स्थानिक उमेदवार, जातीय समीकरण, राज्यातील नेतृत्व आणि प्रादेशिक प्रश्नांचा प्रभाव आजही मोठा आहे.

वास्तविक, विरोधी आघाडीसाठी अखिलेश यादव यांची उपयुक्तता ते काँग्रेसचे नेते नसण्यातच आहे. त्यांची स्वतंत्र राजकीय परंपरा आहे. स्वतंत्र कार्यकर्तावर्ग आहे आणि उत्तर प्रदेशातील काही सामाजिक समूहांमध्ये स्वतंत्र स्वीकारार्हता आहे. त्याचप्रमाणे समाजवादी पक्षाला मतदान करण्यास संकोच करणारे; पण भाजपला पर्याय शोधणारे काही मतदार काँग्रेसकडे वळू शकतात. या दोन वेगवेगळ्या प्रवेशद्वारांमधून येणारे मतदार एका मोठ्या राजकीय आघाडीत एकत्र आणणे शक्य आहे. प्रवेशद्वारेच तोडून एकच दार तयार केले, तर त्यातून अधिक लोक येतीलच, याची खात्री नाही.

उत्तर प्रदेशातील २०२४ च्या निकालाने विरोधकांसाठी एक व्यावहारिक सूत्र दिले आहे. पक्षांची स्वतंत्र ओळख टिकवायची, जिथे आवश्यक आहे तिथे जागावाटप करायचे, एकमेकांच्या प्रभावक्षेत्राचा आदर करायचा आणि मतदारांसमोर किमान समान राजकीय कार्यक्रम ठेवायचा. हे सूत्र विलीनीकरणापेक्षा अधिक अवघड आहे. प्रत्येक निवडणुकीत चर्चा करावी लागते, जागांसाठी घासाघीस होते, स्थानिक नेत्यांची नाराजी सहन करावी लागते; पण लोकशाहीतील आघाडीचे राजकारण मुळात असेच असते. त्याला शॉर्टकट नसतो.

भाजपचे आजचे राजकीय सामर्थ्य पाहता विरोधकांना व्यापक ऐक्याची आवश्यकता आहे, यात शंका नाही; मात्र ऐक्य आणि एकरूपता यात फरक आहे. भारतासारख्या बहुपदरी समाजात विरोधकांची ताकद त्यांच्या विविधतेतूनही निर्माण होऊ शकते. राष्ट्रीय पक्ष, प्रादेशिक पक्ष, वेगवेगळ्या सामाजिक आधारांचे नेतृत्व आणि स्वतंत्र राजकीय परंपरा यांना एका संघटनात्मक साच्यात कोंबण्याऐवजी त्यांच्यात परिणामकारक समन्वय निर्माण करणे अधिक व्यवहार्य आहे. दोघांनी आपापल्या राजकीय मर्यादा ओळखून आपली ताकद वाढविणे आणि गरजेच्या वेळी एकमेकांची ताकद पूरक ठरेल अशी व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे.

२०२४ मध्ये उत्तर प्रदेशात त्याचे परिणाम दिसले आहेत. त्या प्रयोगातील त्रुटी दुरुस्त करून तो अधिक सक्षम करण्याऐवजी पक्षांचे विलीनीकरण करण्याचा मोह म्हणजे चाललेले गणित सोडून नव्याने अनिश्चित प्रयोग सुरू करण्यासारखे ठरेल. राजकारण हे बेरीज-वजाबाकीचे कोरडे गणित नाही. प्रत्येक आकड्यामागे मतदार आहे, त्याची सामाजिक ओळख आहे, त्याचा राजकीय इतिहास आहे आणि त्याच्या अपेक्षाही आहेत. म्हणून दोन अधिक दोन चारच झाले पाहिजेत, हा आग्रह राजकारणाला चालत नाही. कधी स्वतंत्र राहिलेल्या दोन शक्ती एकत्र लढून अधिक मोठी बेरीज घडवू शकतात. काँग्रेस आणि समाजवादी पक्षासमोरही आज हाच पर्याय आहे.

**रशिद किडवई**

# राहुल गांधी यांची पत्रकार परिषद

८ ऑगस्ट रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांची सभा रामलीला मैदानावर (हल्द्वानी, उत्तराखंड) येथे झाली.१० ऑगस्ट रोजी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी सदर स्थळाचे 'शुद्धिकरण' केले. ही बाब भारतीय संविधानाच्या विरोधात आहे त्यामुळे 'शुद्धिकरण' करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात राज्य सरकारने गुन्हा दाखल करायला हवा अशी मागणी राहुल गांधी यांनी आजच्या पत्रकार परिषदेत केली. या मागणीला देशातील लाखो नागरिकांचा पाठिंबाच आहे. या मागणीचे स्वागत करायला हवे.

मात्र काँग्रेस पक्षाचे चारित्र्य, विशेषतः जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद यांचे वर्तन तपासायला हवे. लॅरी कॉलिन्स आणि डॉमनिक लॅपिए यांनी त्यांच्या फ्रीडम ॲट मिडनाइट या ग्रंथात केलेल्या नोंदीनुसार १४ ऑगस्ट १९४७ रोजी मध्यरात्री दोन दक्षिणी ब्राह्मण धर्मगुरू जवाहरलाल नेहरू यांच्या घरी आले. त्यांनी नेहरूंवर पवित्र जलाचा शिडकावा केला आणि नेहरूंच्या कपाळावर भस्म लावले, त्यांच्या हाती राजदंड दिला आणि पवित्र वस्त्राने (बहुधा रेशीम वस्त्र वा सोवळे) त्यांच्या भोवती गुंडाळले. नेहरूंनी या कर्मकांडाचा शालीनतेने स्वीकार केला.



भारताचे पहिले राष्ट्रपती आणि घटनापरिषदेचे अध्यक्ष, राजेंद्र प्रसाद यांच्या निवासस्थानी ब्राह्मण धर्मगुरुंनी यज्ञ केला होता. या प्रसंगी स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळात सहभागी होणारे स्त्री-पुरुष उपस्थित होते आणि त्यांच्यावर या ब्राह्मणांनी पवित्र पाण्याचे काही थेंब शिडकावले, असंही या ग्रंथात नमूद करण्यात आले आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी २ सप्टेंबर १९४६ ला हंगामी सरकार बनले तेव्हा जवाहरलाल नेहरूंनी राजेंद्र प्रसाद यांचा अन्न आणि कृषी मंत्री म्हणून आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला होता. मात्र राजेंद्र प्रसाद यांना मंत्रिमंडळात असताना घटना परिषदेचे अध्यक्षपदही हवे होते. त्याला नेहरूंचा विरोध होता. प्रकरण गांधीजींपर्यंत गेले. गांधीजींनी सांगितले की दोन्ही पदांवर राहाता येणार नाही. संदर्भ- 'फ्रॉम कर्झन टू नेहरू अँड आफ्टर' दुर्गा दास.

१९५० मध्ये राजेंद्र प्रसाद यांनी कच्छमध्ये ऐतिहासिक सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कार्यक्रमाला जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर नेहरू आणि राजेंद्र प्रसाद यांच्यातील दरी आणखी रुंदावली होती. १९५० मध्ये राजेंद्र प्रसाद यांनी कच्छमध्ये ऐतिहासिक सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कार्यक्रमाला जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर नेहरू आणि राजेंद्र प्रसाद यांच्यातील दरी आणखी रुंदावली होती.

दुर्गा दास लिहितात, 'एका धर्मनिरपेक्ष राष्ट्राच्या प्रमुखाने कोणत्याही धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे योग्य नाही ही राजेंद्र प्रसाद यांच्या सोमनाथला जाण्यास विरोध करण्यामागची नेहरूंची भूमिका होती. मात्र राजेंद्र प्रसाद नेहरूंच्या या विचारांशी सहमत नव्हते. ते म्हणाले की सोमनाथ हे एका आक्रमकाला केलेल्या राष्ट्रीय प्रतिकाराचे एक प्रतीक आहे. मी एक धार्मिक व्यक्ती आहे आणि मी या गोष्टीपासून स्वत:ला वेगळे करू शकत नाही.'

दुर्गा दास पुढे लिहितात, 'यामुळे नेहरू नाराज झाले आणि त्यांनी माहिती-प्रसारण मंत्रालयाला आदेश दिला की या प्रसंगी राजेंद्र प्रसाद यांनी दिलेले भाषण प्रसारण करण्यात येऊ नये.'१९५२ मध्ये काशी यात्रेच्या वेळेस राजेंद्र प्रसाद यांनी पंडितांचे पाय धुतले होते. ही गोष्ट देखील नेहरूंना आवडली नव्हती. राजेंद्र प्रसाद यांचा जाहीर निषेध समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांनी केला होता. अन्य कोणत्याही राजकीय पक्षाने यावर भूमिका घेतली नव्हती. यावर राजेंद्र प्रसादांनी उत्तर दिले होते की, 'देशातील सर्वात मोठी व्यक्तीदेखील विद्वानांच्या उपस्थित छोटी असते.'संसदेत हिंदू कोड बिलावर चर्चा झाली तेव्हा राजेंद्र प्रसादांनी खासदारांना सांगितले की ते या बिलाच्या विरोधात आहेत.

राजेंद्र प्रसाद हे घटना परिषदेचे अध्यक्ष होते आणि राष्ट्रपतीही होते. त्यामुळे त्यांच्या विरोधात भूमिका घेण्यास काँग्रेसचे खासदार अर्थातच नाखूष होते. त्यामुळे राहुल गांधी यांनी २०२६ साली घेतलेल्या भूमिकेचे स्वागत करताना, स्वातंत्र्याच्या उदयकाळी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांचे वर्तन निषेधार्ह होते याची पक्की खूणगाठ बाळगायला हवी.

**सुनील तांबे**

## संवाद

### पैठणी साडीवर बारकोड

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेची आणि कलात्मक वारशाची ओळख असलेली पैठणी ही केवळ साडी नसून महाराष्ट्राच्या वस्त्रकलेचा अभिमान आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचना, आकर्षक रंगसंगती, जर व रेशमी विणकामामुळे पैठणीला देशभरात मोठी मागणी आहे. मात्र, या वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत बाजारात बनावट, अर्धवट किंवा कमी दर्जाच्या साड्या 'पैठणी'च्या नावाखाली विकल्या जाण्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक रोखण्यासाठी पैठणीवर बारकोड आणि लोगो देण्याचा सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.खरी पैठणी तयार करण्यासाठी कारागिरांना मोठा वेळ, कौशल्य आणि मेहनत घ्यावी लागते. एका पैठणीच्या निर्मितीसाठी अनेक दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे अस्सल पैठणीची किंमतही तिच्या दर्जानुसार असते. परंतु ग्राहकाला खरी आणि बनावट पैठणी यातील फरक सहज ओळखता येत नसल्याने अनेकदा तो अधिक पैसे देऊनही निकृष्ट वस्तू खरेदी करतो. याचा थेट परिणाम ग्राहकांबरोबरच पारंपरिक पैठणी विणकरांवरही होतो.बारकोड आणि अधिकृत लोगोमुळे ग्राहकाला साडीची अस्सलता तपासणे सुलभ होईल, तसेच बनावट पैठणी विकणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे प्रशासनालाही शक्य होईल. या योजनेमुळे पैठणीच्या नावाचा गैरवापर रोखण्याबरोबरच महाराष्ट्राच्या पारंपरिक हस्तकलेला विश्वासार्ह बाजारपेठ मिळण्यास मदत होईल.

**श्याम ठाणेदार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# ‘एसआयआर’ची प्रारूप मतदार यादी जाहीर..!
# यवतमाळात 19.88 लाख मतदार

## ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकतींची संधी ४ नोव्हेंबरला अंतिम यादी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ३१ : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघांच्या मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) करण्यात येत असून, त्याअंतर्गत प्रारूप मतदार यादी सोमवारी, ३१ ऑगस्ट रोजी संबंधित मतदान केंद्रांवर प्रसिद्ध करण्यात आली.**

जिल्ह्यात तब्बल १९ लाख ८८ हजार २८८ मतदार असल्याचे या प्रारूप यादीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रत्येक मतदाराने आपले नाव, पत्ता आणि इतर तपशील तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी विकास मीना यांनी नागरिक आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना प्रारूप यादी तपासून मतदार नोंदणीतील त्रुटी दूर करण्याचे आवाहन केले आहे.

मतदार संघनिहाय आकडेवारीनुसार वणी मध्ये २ लाख ५६ हजार ३०५, राळेगाव मध्ये २ लाख ६१ हजार १००, यवतमाळमध्ये २ लाख ९३ हजार १३४, दिग्रस मध्ये सर्वाधिक ३ लाख १३ हजार ३६५, आर्णी त २ लाख ८५ हजार ९६४, पुसद मध्ये २ लाख ८७ हजार ८७६, तर उमरखेडमध्ये २ लाख ९० हजार ४६७ मतदारांची नोंद आहे. जिल्ह्यात १० लाख २२ हजार ९०६ पुरुष, ९ लाख ६५ हजार २५७ महिला आणि ४५ तृतीयपंथी मतदार आहेत. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. प्राप्त दावे-हरकतींचा निपटारा २९ ऑक्टोबरपर्यंत करण्यात येईल. त्यानंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी नमुना ६, नाव वगळण्यासाठी नमुना ७, तर नाव, पत्ता अथवा अन्य तपशीलातील दुरुस्तीसाठी नमुना ८ सादर करता येईल. प्राप्त दावे-हरकतींची माहिती दर आठवड्याला संबंधित कार्यालयांत तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादीत नाव अनावधानाने वगळले असल्यास किंवा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या निर्णयावर आक्षेप असल्यास नियमानुसार प्रथम अपील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडे आणि त्यानंतर मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडे द्वितीय अपील करता येणार आहे. त्यामुळे ‘यादीत नाव आहे’ या गृहितावर न राहता मतदारांनी प्रत्यक्ष तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

# अवैध रेती वाहतूक करणारा हायवा पकडला !

## उमरखेड महसूल विभाग पुन्हा सतर्क

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. ३१ :** उमरखेड ढाणकी रोडवरील गिरीधर मार्बल जवळ पिवळी रेतीचा हायवा अवैधरित्या वाहतूक करीत असताना दि . ३० ऑगस्ट रोजी उत्तररात्री १:४५ वाजता महसूल मंडळ अधिकाऱ्यांनी अंदाजे ८ ब्रास एचगी ( पिवळी) रेती वाहनसह जप्त करून पुढील दंडात्मक कारवाई करिता प्रस्तावित केले आहे

उमरखेड ढाणकी रोड वरील गिरीधर मार्बल या दुकान जवळील रस्त्यावर विलास घोरबांड यांच्या मालकीचा हायवा क्र एम एच २६ H ४३८६ या वाहनातून (एचगी ) पिवळी रेती वाहतूक करीत असताना महसूल मंडळ अधिकारी गजानन सुरोशे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पकडला असता चालक गोकुळ राठोड यास रॉयल्टी बाबत विचारणा केली असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगितले त्यावरून रेतीसह सदर जप्त करून दंडात्मक कारवाई करिता उमरखेड तहसीलदार यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात आला .

मागील रेती हंगामापासून महसूलचे बेपत्ता झालेले भरारी पथक रस्त्यावर आल्याने उमरखेड महसूल विभागाचे दबंग अधिकारी गजानन सुरोशे यांना रेती हंगामात तस्कराविरुद्ध कारवाई करण्यापासून दूर झाले होते . त्यामुळे मागील हंगामात रेती तस्करांनी तालुक्यात अक्षरशः नंगानाच केला . त्यामुळे शासनाच्या महसुलाचे प्रचंड नुकसान झाले असल्याची चर्चा आहे .मंडळ अधिकारी सुरोशे वेळेची पर्वा न करता कार्यवाही अग्रेसर असल्याने त्यांचा कारवाईचा धडाका सुरू होताच महसूलच्या तिजोरीत वाढ होते . त्यांची पुन्हा एन्ट्री होताच कारवाईचा श्री गणेशा झाल्याने रेती तस्करांचे धाबे दणाणले आहे .

# ३५ वर्षांनी रंगला मैत्रीचा अविस्मरणीय स्नेह सोहळा..!

## शहीद भगतसिंग विद्यालयाच्या १९८९-९० बॅचचा गुरुजनांच्या आठवणींसह सामाजिक बांधिलकीचा संदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. ३१ :** आयुष्याच्या प्रवासात तब्बल ३५ वर्षे सरली, जबाबदाऱ्या बदलल्या, काही जण सेवेतून निवृत्त झाले. मात्र बालपणीच्या मैत्रीचा धागा तुटला नाही. याच जिव्हाळ्याची प्रचिती शहीद भगतसिंग विद्यालय, महागाव कसबा येथील १९८९-९० बॅचच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या स्नेहमेळाव्यात आली.

वयाची पन्नाशी ओलांडलेल्या मित्र-मैत्रिणींनी पुन्हा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती लाभली. गुरुजन आणि माजी विद्यार्थी तब्बल ३५ वर्षांनंतर एकत्र आल्याने वातावरण भावनिक झाले. यावेळी बॅचमधील दिवंगत विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच दिवंगत कर्मचारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. स्नेहमेळाव्याला सामाजिक बांधिलकीची जोड देत वृक्षारोपण करण्यात आले. श्रावण महिन्याचे औचित्य साधून रक्षाबंधनाचा कार्यक्रमही घेण्यात आला. सासरी गेलेल्या माजी विद्यार्थिनींनी कुटुंबासह उपस्थित राहत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. जात, धर्म, पंथाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी एकत्र येत सामाजिक एकोपा आणि मैत्रीचा आदर्श निर्माण केला. त्यामुळे १९८९-९० ची बॅच ‘मैत्री, संस्कार आणि कृतज्ञता जपणारी आदर्श बॅच’ ठरली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरोज दुंगे यांनी केले. ज्ञानदेव बिहाडे यांनी प्रास्ताविक, तर मनोज दुधे यांनी आभार मानले. आयोजनासाठी दीपक वगारे, फिरोज दुंगे, प्रदीप इंगोले यांच्यासह सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. ‘शाळा संपते पण शाळेच्या आठवणी आणि मैत्री कधीच संपत नाही,’ याचीच जिवंत अनुभूती या स्नेहसोहळ्यात आली.

# ३६१ बी वर निवृत्त उपमुख्याध्यापक नारायण शेंदरे यांचा अपघाती मृत्यू..!

## रुंदीकरण, उड्डाणपूल किंवा बायपासची नागरिकांची आर्त मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**राळेगाव, दि. ३१ :** राळेगाव शहरातून जाणाऱ्या राज्य मार्ग क्रमांक ३६१ बीच्या अरुंदपणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या मार्गावरील अपघातात न्यू इंग्लिश हायस्कूलचे निवृत्त उपमुख्याध्यापक नारायण शेंदरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे. वारंवार अपघात होत असतानाही रस्त्याच्या सुरक्षिततेचा प्रश्न कायम राहिल्याने संबंधित यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

शहरातून जाणाऱ्या या मार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र अनेक ठिकाणी रस्ता अरुंद असून, रस्त्याच्या कडेला वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. विशेषतः हार्डवेअर दुकानांमध्ये माल उतरविण्यासाठी येणारी अवजड वाहने रस्त्यावरच उभी राहत असल्याने अपघाताचा धोका वाढत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. ३० ऑगस्ट रोजी शेंदरे सर दुचाकीने जात असताना हार्डवेअर दुकानासमोरील परिसरात अपघात झाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, राळेगावकडून हिंगणघाटकडे जाणाऱ्या बसची त्यांच्या दुचाकीला धडक झाली. या दुर्घटनेत शेंदरे यांचा मृत्यू झाला. रस्त्याच्या अरुंदपणासह अनियंत्रित पार्किंग आणि अवजड वाहनांमुळे निर्माण होणारी कोंडी तातडीने दूर करण्याची मागणी होत आहे. माल उतरविण्यासाठी येणारी वाहने रस्त्यावर न उभी करता स्वतंत्र जागेत उभी करण्याबाबत दुकानदारांना प्रशासनाने सक्त सूचना द्याव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अपघातानंतरच जागे होण्याऐवजी शासनाने आता कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. ३६१ बीचे रुंदीकरण, शहरातून उड्डाणपूल अथवा बायपास यापैकी योग्य पर्याय तातडीने मंजूर करून राळेगावकरांना सुरक्षित वाहतुकीचा मार्ग उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# थोडक्यात

## ‘इंग्रजी’ शिकवताना आयुष्याची शिस्त रुजवली..!

### संजय चामाटे सरांना माजी विद्यार्थ्यांचा भावपूर्ण सलाम



**झरी :** शेतकरी विकास विद्यालय, मांगली येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून प्रदीर्घ काळ सेवा बजावलेले संजय चामाटे सर सेवानिवृत्त होत असल्याने माजी विद्यार्थ्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. मांगली गावचे रहिवासी असलेल्या चामाटे सरांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाची भूमिका बजावत शिस्त, मेहनत आणि शिक्षणाची गोडी रुजवली. इयत्ता आठवी ते दहावीपर्यंत त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आजही त्यांचा शिस्तप्रिय स्वभाव ठळकपणे कायम आहे. इंग्रजी विषय अवघड वाटत असतानाही शब्दसंग्रह पाठांतरासह नियमित अभ्यासावर त्यांचा कटाक्ष असे. अभ्यासात कसूर झाल्यास कठोर शिस्त लावत असले तरी त्यामागे विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी व्हावे, हीच भावना होती. माजी विद्यार्थी तथा शिक्षक आरीफ कच्छी यांनी सांगितले की, “आज स्वतः शिक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांना शिस्त लावताना नकळत चामाटे सरांची आठवण येते. त्यांनी दिलेली शिस्त आणि मेहनतीची शिकवण आयुष्यभराची शिदोरी ठरली. चामाटे सरांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेला सलाम करत माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आनंद, आरोग्य व समाधानाच्या शुभेच्छा दिल्या.

## प्रभाग ११ मोतीनगर मातोश्री शाळेसमोरील प्लॉटच्या बोअरवेलचे साहित्य चोरीस!

**पुसद:** नगरपरिषद अंतर्गत प्रभाग क्रमांक ११ मधील मोती नगर येथील एका शाळेसमोरील प्लॉटवर खोदलेल्या बोअरवेल मधील ११ हजार रुपये किमतीचे इलेक्ट्रॉनिक साहित्य लंपास केले आहे. ही घटना नुकतीच मागिल आठवड्यात सकाळी ८:०० वाजताच्या दरम्यान उघडकीस आली. बांधकाम कंत्राटदार चंद्रशेखर मनोहर इंगोले वय ४७ वर्षे रा.पंचवटी हनुमान मंदिराजवळ श्रीरामपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्या विरोधात चौकशी अंती व पंचनामा केल्यानंतर दि.२८ ऑगस्ट २०२६ रोजीच्या रात्री ९:३० वाजता विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे अज्ञात चोरट्याने चंद्रशेखर यांच्या मोती नगर येथील मातोश्री शाळेसमोरील प्लॉटवर असलेल्या बोअर मधील एक एच.पी.ची ८ हजार रुपये किमतीची जुनी वापरती मोटर व १९० फूट ॲल्युमिनियम केबल किंमत ३ हजार रुपये होती तो केबल असा एकूण ११ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. पुढील तपास शहर पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी हे करत आहेत.

## काँग्रेसची दारव्हा आढावा बैठकीत संघटन विस्ताराचा निर्धार

**दारव्हा :** दारव्हा तालुका व शहर काँग्रेसची आढावा बैठक सोमवारी, दि. ३० ऑगस्ट रोजी काँग्रेस भवन येथे उत्साहात पार पडली. तालुका व शहर काँग्रेसचे पक्ष प्रभारी म्हणून प्रकाशजी जानकर यांची निवड झाल्यानंतर त्यांनी विविध विभागांच्या अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांकडून संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेतला. काँग्रेसची विचारधारा खेड्या-पाड्यांपासून सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी संघटना अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे प्रकाश जानकर यांनी सांगितले. तालुक्यासह जिल्हा परिषद सर्कल निहाय संघटनात्मक बांधणी करून सक्षम पदाधिकारी नियुक्त करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. आगामी काळात प्रत्येक गाव, सर्कल व तालुक्यात काँग्रेसची सक्रिय यंत्रणा उभी करण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला. यावेळी जिल्हा ओबीसी कार्याध्यक्ष जिनेंद्र ब्राह्मणकर, प्रकाश नवरंगे, गजानन बिबेकर, पंढरीनाथ सिहे, अतुल राऊत, रामधन जाधव यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## श्री समर्थ शिक्षण मंडळाच्या नेतृत्वात आकाश मारावार अध्यक्ष, विवस्वान धुर्वे सचिव

**घाटंजी :** जिल्ह्यातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था असलेल्या श्री समर्थ शिक्षण मंडळ, घाटंजीच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच करण्यात आली. अध्यक्षपदी आकाश मारावार, उपाध्यक्षपदी माजी आमदार डॉ. संदीप धुर्वे, तर सचिवपदाची जबाबदारी विवस्वान धुर्वे यांनी स्वीकारली आहे. युवा नेतृत्वासोबत अनुभवी नेतृत्वाचा मेळ संस्थेला मिळाल्याने शिक्षण क्षेत्रात नव्या पर्वाची अपेक्षा व्यक्त होत आहे. नवीन कार्यकारिणीकडून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला अधिक बळ देणे, आधुनिक शिक्षणपद्धतींचा अवलंब करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याचे संकेत देण्यात आले आहेत. पदभार स्वीकारल्यानंतर सचिव विवस्वान धुर्वे यांनी, “ही केवळ पदाची जबाबदारी नसून विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्याची संधी आहे,” असे सांगत संस्थेच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे शिक्षक, नागरिक, हितचिंतक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

# ‘आदिवासींच्या प्रश्नांवर केवळ आश्वासने नको, ठोस निर्णय द्या’..!

## फेडरेशनचा सरकारला इशारा, आदिवासी विकासमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ३१ :** ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनच्या वतीने यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. अध्यक्ष मधुकर उईके यांनी पत्रकार परिषदेला संबोधित करताना आदिवासी विद्यार्थी, नोकरभरती, आरक्षण व शैक्षणिक सुविधांबाबत शासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

गेल्या १७ दिवसांपासून आदिवासी विद्यार्थ्यांचे आमरण उपोषण सुरू असून, २९ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आदिवासी विकासमंत्री अशोक उईके व विद्यार्थी प्रतिनिधींची वर्षा निवासस्थानी बैठक झाली. मात्र ठोस निर्णय न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष कायम असल्याचे फेडरेशनने सांगितले. फेडरेशनने १२ हजार ५०० पदांची प्रलंबित भरती तातडीने पूर्ण करावी, PESA अंतर्गत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घ्यावे, २०१९ पासून बदललेल्या छोट्या संवर्गाच्या बिंदूनामावलीमुळे वंचित राहिलेल्या आदिवासी उमेदवारांना न्याय द्यावा, अशी मागणी केली. तसेच आरक्षित जागांवरील बिगरआदिवासी नियुक्त्यांनंतर रिक्त झालेली पदे भरावीत, बोगस जात प्रमाणपत्रांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या दुर्घटनेतील मृत्यूला एक कोटी, कायमस्वरूपी अपंगत्वास ६० लाख व गंभीर दुखापतीस ४० लाख रुपये भरपाई देण्याची मागणी करण्यात आली. DBT रद्द करून भोजन व्यवस्था पूर्ववत करावी, पवित्र पोर्टलवरील १७ हजार ३३ शिक्षक पदे भरावीत व TETची अट शिथिल करावी, अशीही मागणी आहे. वसतिगृहात रुग्णवाहिका, वाहतूक व्यवस्था व लोखंडी पलंग, खासगी रुग्णालयातील उपचाराचा खर्च शासनाकडून, जंगलातील आश्रमशाळा तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतरित करणे, फी वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई, परदेशी शिष्यवृत्तीची उत्पन्न अट रद्द करणे, न्यूक्लिअस बजेट प्रभावीपणे राबवणे आणि आदिवासी प्राध्यापकांची १९२ रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली. यावेळी यशवंत मलये यांनी सरकारवर आरक्षणविरोधी भूमिका घेत असल्याचा आरोप करत आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. पत्रकार परिषदेला मधुकर उईके, सुरेश कन्नाके, विजय कोकडे, पवन आत्राम, श्रीकांत माळवी, गुलाब कुडमते, शैलेश गाडेकर यांच्यासह फेडरेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जयश्री नरवाडे कडे महागाव महिला काँग्रेसची धुरा..!

## संघटन बळकटीची जबाबदारी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. ३१ :** महागाव नगरपंचायतीच्या नगरसेविका जयश्री संजय नरवाडे यांची महागाव तालुका महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व समाजहिताच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र महिला काँग्रेस कमिटीच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षा वंदना पुरुषोत्तम आवारी यांनी ही नियुक्ती केली. नवनियुक्त तालुकाध्यक्षांवर काँग्रेसची ध्येय-धोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासह महिला संघटन मजबूत करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आगामी काळात पक्षाला अधिकाधिक जनाधार मिळवून देण्यासाठी प्रभावीपणे काम करण्याच्या सूचना नियुक्तीपत्रातून देण्यात आल्या. जयश्री नरवाडे यांनी आपल्या निवडीचे श्रेय काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक, अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र कावळे, तालुकाध्यक्ष सुनील राठोड, माजी तालुकाध्यक्ष शिवाजीराव देशमुख सवणेकर तसेच जिल्हा सरचिटणीस आरिफ सुरय्या यांना दिले. त्यांच्या निवडीबद्दल काँग्रेस कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले.

# शिक्षक पदभरतीसाठी पवित्र पोर्टलद्वारे ५१० उमेदवारांची निवड

## शिक्षण विभागाला यादी प्राप्त,बुधवारपासून उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी

**यवतमाळ, दि. ३१ :** शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-२०२५ नुसार शिक्षण विभाग, प्राथमिक, जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत मुलाखतीशिवाय पदनिवडीचा विकल्प दिलेल्या उमेदवारांमधून पवित्र पोर्टलद्वारे शासनाने शिफारस केलेल्या शिक्षक पदभरतीतील एकूण ५१० उमेदवारांची निवड यादी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागास प्राप्त झाली आहे.

निवड झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी २ ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे. उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर स्व-प्रमाणित स्वरूपात नोंदविलेल्या माहितीची सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. ही कागदपत्र पडताळणी वसंतराव नाईक सभागृह, जिल्हा परिषद, यवतमाळ येथे सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. संबंधित उमेदवारांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहून कागदपत्र पडताळणीची कार्यवाही पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. कागदपत्र पडताळणीच्या कालावधीत संबंधित उमेदवार अनुपस्थित राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीची नोंद राज्य स्तरावर कळविण्यात येणार असून अनुपस्थितीबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यवतमाळ यांनी स्पष्ट केले आहे.

**निवड यादीतील अनुक्रमांकानुसार वेळापत्रक**

**दिनांक : २ सप्टेंबर २०२६**
**वेळ : स. १० ते सायं. ६ वा.**
**अनुक्रमांक : १ ते २००**
**दिनांक : ३ सप्टेंबर २०२६**
**वेळ : स. १० ते सायं. ६ वा.**
**अनुक्रमांक : २०१ ते ४००**
**दिनांक : ४ सप्टेंबर २०२६**
**वेळ : स. १० ते सायं. ६ वा.**
**अनुक्रमांक : ४०१ ते ५१०**

# निंबी, पार्डी,भोजला बिटमध्ये अवैध धंदे खुलेआम मुकसंमतीने सुरू!

## कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ३१ :** वसंत नगर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्रामीण भागातील निंबी पार्डी, भोजला, वालतुर (रेल्वे) धनकेश्वर या बीट मध्येअवैध धंदे खुलेआम मुक संमतीने सुरू असून पोलीस प्रशासनाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. हे अवैध धंदे सदर बीट जमादाराच्या आशिर्वादाने मोठ्या प्रमाणात सुरु असुन पोलीस कर्मचारी हप्ते घेत असल्याचीही नागरिकांमध्ये खमंग चर्चा सुरू आहे.

ग्रामीण भागातील अनेक परीसरा मध्ये अवैध धंदे दारू, मटका, जुगार या अवैध धंद्याचा सुळसुळाट जोमाने चालु आहे. एवढे असतांनाही निंबी,पार्डी, भोजला, वालतुर या खेड्यामध्ये अवैध धंद्यांवर ठाणेदाराचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. काही ठिकाणी राजरोसपणे दारु विक्री तसेच खुलेआम मटका आणि जुगार स्थानिक बिट जमादाराच्या आशिर्वादाने सुरु असल्याचे सादिक नागरिकाकडून सांगण्यात येत आहे. हे अवैध धंदे रोखण्याची स्थानिक पोलिसांसह वरिष्ठ अधिका-यांचीही मानसिकता दिसून येत नाही. यामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक चिंता हे लक्ष घालतील का अशी ग्रामीण भागातील जनतेत उघड चर्चा होत आहे. सदर विषयी जनतेतून होत असलेल्या अवैध धंद्या बाबत निंबी,पार्डी, भोजला, वालतुर बीट जमादार यांना प्रतिक्रिया घेण्यासाठी भ्रमणध्वनी वरुन फोन केला असता त्यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे या परिसरातील अवैध धंदे जिल्हापोलीस अधीक्षक चिंता हे लक्ष घालून या अवैध धंद्यावर आळा घालतील का याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

कंत्राटदाराच्या विळख्यात विश्रामगृहे

# कर्मचारीअभावी धारणी-चिखलदरा विश्रामगृहांची दुरवस्था

## मनुष्यबळाची तातडीने नियुक्ती करण्याची मागणी

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहांची व्यवस्था सध्या ठेकेदारी पद्धतीवर सोपविण्यात आली असली, तरी आवश्यक मनुष्यबळाअभावी या विश्रामगृहांच्या देखभालीवर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. पूर्वी विभागीय स्तरावरील कर्मचारी, बाबू, कक्षसेवक व इतर सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून विश्रामगृहांची निगा राखली जात होती. मात्र, सध्या कंत्राटी पद्धतीने व्यवस्था देण्यात आल्यानंतर अनेक ठिकाणी स्वच्छता, पाणीपुरवठा, पाहुणचार आणि परिसराची निगा याकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

विश्रामगृह म्हणजे केवळ निवासाची जागा नसून शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांसाठी शासनाची प्रतिमा दर्शविणारे महत्त्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे विश्रामगृहात पुरेसा पाणीसाठा, नियमित स्वच्छता, बेडिंग व कपड्यांची स्वच्छता, पाहुण्यांची योग्य सेवा तसेच परिसरातील बाग-बगीच्यांची निगा राखणे अत्यावश्यक आहे.चिखलदरा हे मेळघाटातील सर्वात महत्त्वाच्या विश्रामगृहांपैकी एक असून येथे राज्याचे मुख्यमंत्री, राज्यपाल, सचिवस्तरावरील वरिष्ठ अधिकारी, जिल्हा धिकारी, विभागीय आयुक्त तसेच इतर उच्चपदस्थ अधिकारी मुक्कामी येत असतात. त्यामुळे या विश्रामगृहाची व्यवस्था आणि देखभाल उच्च दर्जाची असणे अपेक्षित आहे.चिखलदरा येथे मोठे विश्रामगृह असून दोन विश्रामगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. एवढ्या मोठ्या परिसरासाठी केवळ नाममात्र कर्मचारी ठेवून व्यवस्था सुरळीत चालविणे शक्य नसल्याचे चित्र आहे. येथे किमान दहा कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये स्वच्छता कर्मचारी, कक्षसेवक, कपडे धुणारे कर्मचारी, बागेची देखभाल करणारे कर्मचारी तसेच आवश्यक सहाय्यक मनुष्यबळाचा समावेश असणे गरजेचे आहे.विश्रामगृह कंत्राटी पद्धतीने चालविले जात असले तरी त्यांची गुणवत्ता, स्वच्छता, पाहुण्यांना मिळणारी सेवा आणि परिसराची निगा यामध्ये कोणतीही तडजोड होऊ नये. आवश्यकतेनुसार पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करून कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे वेतन व सुविधा मिळतात की नाही, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे शासकीय विश्रामगृहांची पूर्वीची प्रतिष्ठा आणि दर्जा पुन्हा निर्माण करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून ठोस कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**धारणी विश्रामगृहासाठी किमान सहा कर्मचाऱ्यांची गरज**

धारणी येथील विश्राम गृहासमोर मोठ्या प्रमाणात बाग व हिरवळ असून परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले आहे. मात्र, आवश्यक माळी अथवा बागकाम करणारे कर्मचारी उपलब्ध नसल्याने गेल्या काही काळात या बागेची अवस्था खराब होत असल्याचे दिसून येत आहे.विश्रामगृहाची नियमित देखभाल, स्वच्छता, पाहुण्यांची सेवा, पाणीपुरवठा तसेच बागेची निगा राखण्यासाठी किमान सहा कर्मचाऱ्यांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

**लहान विश्रामगृहांना कमी, मात्र चिखलदऱ्याला मोठ्या मनुष्यबळाची गरज**

हरिसाल , सेमाडोह आणि घटांग यांसारख्या तुलनेने लहान विश्रामगृहांसाठी आवश्यकतेनुसार कमी मनुष्यबळ ठेवता येऊ शकते. मात्र, चिखलदरा येथील विश्रामगृहाची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे.

**मोठ्या गार्डनसाठी स्वतंत्र देखभाल यंत्रणा आवश्यक**

चिखलदरा विश्रामगृहाच्या समोर मोठे गार्डन असून मागील बाजूसही मोठा हिरवळयुक्त परिसर आहे. या परिसराची नियमित देखभाल करण्यासाठी माळी तसेच आवश्यक साधने आणि वाहनाचीही गरज भासते. मात्र, प्रत्यक्षात आवश्यक मनुष्यबळ व सुविधा उपलब्ध आहेत का, याची तपासणी होणे गरजेचे आहे.

**कंत्राटी कर्मचारी असतील तर नियमांनुसार वेतन मिळते का?**

विश्रामगृहांची व्यवस्था कंत्राटी पद्धतीने देण्यात आली असल्यास त्याला हरकत नसली, तरी कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक तेवढे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत का, त्यांना शासनाच्या लागू नियमांनुसार योग्य वेतन मिळते का आणि कंत्राटदाराकडून करारातील सर्व अटींचे पालन केले जाते का, याची काटेकोर तपासणी होणे आवश्यक आहे.विश्रामगृहासाठी आवश्यक स्वच्छता कर्मचारी, कक्षसेवक, कपडे धुणारे कर्मचारी, माळी आणि इतर सहाय्यक कर्मचारी उपलब्ध करून देणे ही संबंधित यंत्रणेची जबाबदारी आहे. केवळ कंत्राट देऊन विश्रामगृहाची जबाबदारी संपत नाही, तर प्रत्यक्ष ठिकाणी सेवा व्यवस्थित सुरू आहे की नाही, याची पाहणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी**

सध्या आवश्यक कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे अनेक विश्रामगृहांमध्ये सामसूम वातावरण दिसत असून पूर्वीची शिस्तबद्ध व्यवस्था राहिलेली नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे अचलपूरचे कार्यकारी अभियंता, अमरावतीचे मुख्य अभियंता आणि संबंधित अधीक्षक अभियंता यांनी धारणी व चिखलदरा येथील विश्रामगृहांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी, अशी मागणी होत आहे.

# मेंढपाळांच्या उपोषणाला रविराज देशमुख यांची भेट

## मागण्या शासन दरबारी मांडण्याचे आश्वासन



**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील मेंढपाळांच्या विविध मागण्यांसाठी सुरू असलेल्या उपोषणाला भाजपा नेते रविराज देशमुख यांनी भेट देऊन आंदोलक मेंढपाळांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मेंढपाळांच्या समस्या जाणून घेत त्यांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली.

शासनाने २४ ऑगस्ट २०२६ रोजी मेंढपाळांच्या चराईसंदर्भात शासन निर्णय जारी केला असून, या निर्णयाची राज्यभर प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी मेंढपाळांकडून करण्यात येत आहे. वनक्षेत्र, गायरान, ई-क्लास, झुडपी व पडीक जमीन चराईसाठी उपलब्ध करून देणे, तसेच मेंढपाळांना चराईसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. यावेळी रविराज देशमुख यांनी उपोषणकर्त्यांच्या मागण्या व समस्या जाणून घेत मेंढपाळांच्या सर्व रास्त मागण्या शासन दरबारी मांडून त्यासाठी योग्य तो पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.मेंढपाळांच्या प्रश्नांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# अ. भा. माळी महासंघाचे प्रदेश प्रवक्ते मनोज अंबाडकर तर महानगर अध्यक्षपदी प्रा. रुपेश फसाटे



**अमरावती/का.प्र.**

अखिल भारतीय माळी महासंघाचे प्रदेश प्रवक्ते म्हणून मनोज अंबाडकर तर महानगर अध्यक्षपदी प्रा. रुपेश फसाटे यांची निवड करण्यात आली आहे. विदर्भ अध्यक्ष प्रवीण पेटकर यांनी आयोजित केलेली.अखिल भारतीय माळी मेहासंघाची अमरावती जिल्हा कार्यकारणी निवड सभा नुकताच जि.प. विश्रामगृह येथे घेण्यात आली.

ज्येष्ठ नागरिक प्रभाकर झगडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुभाष सातव, प्रदेश .महासचिव राजेंद्र मांदाडे, प्रदेश कार्याध्यक्ष अमोल गुरणुले, प्रदेश कार्याध्यक्ष गणेश काळपांडे आदी उपस्थित होते.सभेत ज्यांच्यावर पदांची जबाबदारी सुपविण्यात आली आहे.त्यांच्या माध्यमातून अखिल भारतीय माळी महासंघाच्या सामाजिक कार्याला व्यापक स्वरूप तथा विविध उपक्रमांना निश्चितपणे चालना मिळेल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रदेश प्रवक्ते म्हणून मनोज अंबाडकर, अमरावती शहर प्रमुख प्रा. रुपेश फसाटे, ज्येष्ठ मार्गदर्शक प्रमुख म्हणून प्रभाकर झगडे, अमरावती महानगरपालिका उपाध्यक्ष सुधीर नवले, व संतोष मालधूरे, महानगर अमरावती अध्यक्ष हेमंत भगत, अमरावती महानगर प्रसिद्धी प्रमुख एड. प्रभाकर वानखडे, अमरावती महानगर उपाध्यक्ष संजय राऊत, युवा महानगर अध्यक्ष शुभम व-हेकर, युवा महानगर उपाध्यक्ष पंकज जांभळे व शैलेंद्र भोपळे, प्रशांत पाटील, अमरावती तालुका उपाध्यक्ष हरीश यावले, चंद्रशेखर देशमुख, सुरज पवार, भोजराज अंबाडकर, अमरावती जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय वाघुळे यांची निवड करण्यात आली.

# रेल्वे रूळाजवळ अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला

## ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन



**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

मंगरूळ दस्तगीर ग्राम झाडगाव शिवारातील रेल्वे कटिंग परिसरात ३० ऑगस्ट २०२६ रोजी एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सदर मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नसून, मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशन, जिल्हा अमरावती ग्रामीण यांच्या वतीने शोधपत्रिका प्रसिद्ध करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,मृत इसमाचे वय अंदाजे २८ ते ३० वर्षे, उंची अंदाजे ५ फूट ६ इंच, शरीरयष्टी सडपातळ, रंग सावळा असून त्याचे केस काळे व दाट आहेत.मृत इसमाने अंगात फुल बाह्याचा बारीक चेक्स निळसर कलरचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट परिधान केलेली होती.

तसेच त्याच्या शरीरावर काही जखमांच्या खुणा असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

सदर इसमाबाबत कोणत्याही नागरिकास माहिती असल्यास किंवा त्याची ओळख पटत असल्यास तात्काळ मंगरूळ दस्तगीर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

# अंबा नाल्यात कचरा टाकणाऱ्यांवर महापौरांचा दणका



**अमरावती/का.प्र.**

शहरातील नाले, सार्वजनिक ठिकाणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेने आता कडक भूमिका घेण्यास सुरुवात केली आहे. शहरातील राजकमल चौक ते राजापेठ या मार्गादरम्यान मध्यभागी असलेल्या अंबा नाल्याची अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली. पाहणीदरम्यान नाल्यामध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली असून संबंधितांकडून दोन दंड आकारण्यात आले.

महापौरांच्या अचानक पाहणीमुळे नाल्यांमध्ये बेकायदेशीरपणे कचरा टाकणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. शहरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा टाकला जात असल्याने पावसाळ्यात नाल्यांमध्ये अडथळे निर्माण होऊन पाणी साचण्याची तसेच दुर्गंधी आणि विविध आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे नाल्यांमध्ये कचरा टाकणाऱ्यांवर कोणतीही दया दाखवू नये, अशा स्पष्ट सूचना महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.पाहणीदरम्यान नागरिकांशी संवाद साधताना महापौर श्रीचंद तेजवानी यांनी अमरावतीकरांना महत्त्वाचे आवाहन केले. घरातील तसेच परिसरातील कचरा नाल्यात, रस्त्यावर किंवा इतर सार्वजनिक ठिकाणी टाकू नये. महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या घंटागाडीमध्येच नागरिकांनी आपला कचरा द्यावा, असे त्यांनी सांगितले.

महानगरपालिकेच्या घंटागाडीची सुविधा उपलब्ध असताना नागरिकांनी नाल्यात अथवा रस्त्याच्या कडेला कचरा टाकू नये. तसेच हॉस्पिटल, व्यावसायिक आस्थापना आणि इतर संस्थांनी आपल्या कचऱ्याची विल्हेवाट संबंधित नियमांनुसारच लावावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.'स्वच्छ अमरावतीसाठी महानगरपालिकेसोबत नागरिकांनीही जबाबदारी स्वीकारावी. नाल्यात कचरा टाकू नका, इतरांनाही टाकू देऊ नका आणि कचरा घंटागाडीतच द्या,' असे आवाहन महापौर श्रीचंद तेजवानी यांनी अमरावतीकरांना केले.या पाहणी दरम्यान नगरसेवक ॲड.प्रशांत देशपांडे, झोन क्र. २ चे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर, स्वास्थ निरीक्षक प्रशांत गावनेर उपस्थित होते.

# श्री हव्याप्र मंडळाच्या रॅलीतून क्रीडाशक्तीचा जागर... व्यसनमुक्तीचा हुंकार!

## पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, पो. आयुक्त राकेश ओला यांच्याहस्ते हिरवी झेंडी , राजकमल चौकात थरारक प्रात्यक्षिकांनी वेधले लक्ष



**अमरावती/का.प्र.**

हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि अमरावती पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात काढण्यात आलेल्या भव्य क्रीडा रॅलीने अमरावतीकरांचे लक्ष वेधून घेतले.

क्रीडाशक्ती, निरोगी जीवनशैली आणि व्यसनमुक्तीचा संदेश देणाऱ्या या रॅलीत मंडळाच्या विविध क्रीडा विभागांतील हजारो विद्यार्थी, खेळाडू, प्रशिक्षक, प्राध्यापक, विभागप्रमुख व पदाधिकारी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकररावजी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस आयुक्त डॉ. राकेश ओला, डीसीपी प्रांजली सोनोने, मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके आणि सचिव प्रा. डॉ. माधुरी चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे , प्रा.दीपा कान्हेगावकर यांच्या पुढाकाराने या रॅलीचे आयोजन करण्यात आले. मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य आणि पोलीस आयुक्त डॉ. राकेश ओला यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रॅलीला प्रारंभ करण्यात आला.हव्याप्र मंडळाच्या परिसरातून निघालेली रॅली गांधी चौक, जवाहर गेटजयस्तंभ चौक मार्गे राजकमल चौक येथे पोहोचली. विविध क्रीडा विभागांच्या सहभागामुळे रॅलीला विशेष आकर्षण प्राप्त झाले होते. मेजर ध्यानचंद तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंचे छायाचित्र असलेले फलक, व्यसनमुक्तीचे संदेश देणारे फलक आणि राष्ट्रप्रेम जागविणाऱ्या घोषणांनी संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला.

राजकमल चौक येथे रॅलीचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मंडळाच्या खेळाडूंनी मल्लखांब, बॉक्सिंग, जिम्नॅस्टिक आणि विविध भारतीय पारंपरिक खेळांचे थरारक प्रात्यक्षिक सादर केले. अवघड कसरती, चित्तथरारक हालचाली आणि खेळाडूंचे विलक्षण कौशल्य पाहून राजकमल चौकात उपस्थित नागरिक व युवक मंत्रमुग्ध झाले. भारतीय पारंपरिक खेळांच्या प्रात्यक्षिकांनी आपल्या मातीत रुजलेल्या क्रीडा संस्कृतीचे दर्शन घडविले. तरुणांनी मैदानी खेळांकडे वळावे, मोबाईल आणि व्यसनांच्या विळख्यातून बाहेर पडून शरीर व मन सुदृढ ठेवावे, असा प्रभावी संदेश या प्रदर्शनातून देण्यात आला.

रॅलीतील हजारो विद्यार्थी, पोलीस अधिकारी व कर्मचारी आणि खेळाडूंची शिस्तबद्ध उपस्थिती, विविध क्रीडा प्रकारांचे प्रदर्शन आणि व्यसनमुक्तीचा जागर यामुळे अमरावती शहरात खऱ्या अर्थाने क्रीडामय वातावरण निर्माण झाले. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित हा उपक्रम युवकांना प्रेरणा देणारा आणि समाजाला सकारात्मक दिशा देणारा ठरला. कार्यक्रमाचा समारोप यावेळी वंदे मातरम्चे, राष्ट्र गीत सामूहिक गायन करण्यात आला.

रॅली यशस्वी करण्यासाठी डॉ. दीनानाथ नवाथे, डॉ. संजय तिरथकर, डॉ. महेंद्र लोणकर, डॉ. प्रमोद भालेराव, डॉ. देवानंद सावरकर, डॉ. मधुकर बुरणासे, प्रा. दीपा कान्हेगावकर, डॉ. मनोज कोहळे, डॉ. केनेडी सिंग, देवेंद्र भुयार, अनिल नागपुरे,डॉ ललित शर्मा आणि प्रा. आशिष हटेकर यांनी मोलाचे मार्गदर्शन व अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रा. आशिष हटेकर यांनी केले.

# संक्षिप्त

## नारायणराव राणा महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन



**अमरावती-** स्थानिक नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा येथे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमप्रकाश मुंदे तसेच प्रमुख अतिथी प्रा. डॉ. नितीन सराफ यांच्या उपस्थितीत मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ. ओमप्रकाश मुंदे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या शुभेच्छा देत क्रीडाक्षेत्राचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व विशद केले. नियमित खेळामुळे शारीरिक व मानसिक विकास होण्यास मदत होत असून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.प्रमुख अतिथी प्रा. डॉ. नितीन सराफ यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर व भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला प्रा. डॉ. संगीता मालाणी, प्रा. डॉ. एस. पी. बनसोड, प्रा. डॉ. के. टी. मेहरे, प्रा. डॉ. सतीश खोडे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ. खुशाल अळसपुरे यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविल्याबद्दल सर्व विद्यार्थी व खेळाडूंचे कौतुक केले.

## हेमंत निखाडे यांचा सन्मान



**गुरुकुंज मोझरी-** येथील पत्रकार हेमंत निखाडे यांना नुकताच महाराष्ट्र शासनाच्या वतीने शेतकरी मित्र पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्या अनुषंगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम जयंती महोत्सव समिती श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रमचे वतीने त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल नुकताच सामुदायिक प्रार्थनेनंतर वं. राष्ट्रसंताच्या महासमाधीस्थळी सन्मान करण्यात आला.याप्रसंगी महोत्सव समितीचे सचिव उद्धव वानखेडे, डॉ.सदगुण ठोसर, डॉ. सुरेश चौधरी,अनिल चिखलकर, आशिष देशमुख, सागर रावणकर, अमोल खारोडे, गणेशराव बायस्कर, संजय डीक्कर, गुरुदेवनगर ग्रामपंचायतच्या माजी सरपंचां अर्चना खारोडे,लता ठोसर,रेखा खारोडे,अर्चना चौधरी,उद्धव वानखडे,गावंडे ताई इत्यादी ग्रामजयंती महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र कौंडण्यपूर ते कुऱ्हा कावडयात्रा



**कुऱ्हा-** शिव तांडव कावड यात्रा मित्र मंडळाच्या वतीने श्रीक्षेत्र कौंडण्यपूर ते कुऱ्हा दरम्यान कावड यात्रा उत्साहात पार पडली. यामध्ये शिवभक्त मोठया संख्येने सहभागी झाले होते. त्यामुळे कुऱ्हा नगरी दुमदुमून गेली होती.शिवभक्त कावडधारी रविवारी सायंकाळी कुऱ्हा येथील शिव मंदिरामध्ये पूजा पाठ करून गावातून यात्रा काढून रात्री कौंडण्यपूर येथे गेले. त्यानंतर सोमवारी सकाळी सात वाजता वर्धा नदीचे जल पूजन व आरती करण्यात आली. शिवभक्तांनी वर्धा नदीत स्नान करून कावड बांधायला सुरुवात केली. त्यानंतर वर्धा नदीतून जलाभिषेकसाठी पाणी भरल्या गेले. तेथून कावड यात्रेला सुरुवात झाली. शिवभक्त व कावडधारकांना कुऱ्हा येथील कार्यकर्त्यांकडून ठिकठिकाणी जलपान, फळे, मिठाई, उसळ, प्रसादाचे वाटप करण्यात आले. कुऱ्हा परिसरातील शिव तांडव कावडयात्रा पाहण्यासाठी महिला, पुरुष, तरुणांनी चौकाचौकांत प्रचंड गर्दी केली होती. श्रीक्षेत्र कौंडण्यपूर ते कुऱ्हा मार्ग पायदळ वारी पूर्ण करून कावडयात्रा प्राचीन शिवकालीन शिवमंदिरात पोहोचली. कौंडण्यपूरच्या वर्धा नदी पात्रातून आणलेले जल महादेवाच्या पिंडीवर टाकून पूजन करून जलाभिषेक करण्यात आला. यावेळी निसर्ग संवर्धनसाठी महादेवाला साकडे घालण्यात आले.

## नेपाळमधील पुरग्रस्तांना श्रद्धांजली



**अमरावती-** नेपाळ येथे आलेल्या भीषण पुरामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली असून, या नैसर्गिक आपत्तीमध्ये मरण पावलेल्या व्यक्ती तसेच त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी आज महाविद्यालयात भावपूर्ण श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. श्रद्धांजली सभेच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना नेपाळमध्ये घडलेल्या या दुर्दैवी घटनेची तीव्रता आणि भयावह परिस्थिती याबाबत माहिती दिली. या पुरामुळे नेपाळमध्ये हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून, सुमारे ४ हजार नागरिक बेपत्ता असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. बेपत्ता असलेल्या नागरिकांमध्ये सुमारे ४०० भारतीय नागरिकांचा समावेश असल्याचेही त्यांनी सांगितले.या दुर्दैवी घटनेतील मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी दोन मिनिटे मौन पाळले. यावेळी संपूर्ण प्रांगनात शांततेचे वातावरण निर्माण झाले होते. उपस्थितांनी मृतात्म्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळावी, अशी प्रार्थना केली.

## आझाद समाज पार्टी शाखेची स्थापना

**खल्लार-** रामतीर्थ येथे आझाद समाज पार्टी (कांशीराम) शाखेची स्थापना करण्यात आली. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला वेग देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

आझाद समाज पार्टी विधानसभा दर्यापूरचे अध्यक्ष शैलेश आठवले, प्रमुख मार्गदर्शक डॉ. हर्षद हिवराळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शाखा गठन कार्यक्रम पार पडला.यावेळी बळवंत जामनिक, श्रावण सुभेदार, दिलीप माकोडे, नवनीत निष्कर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘सीजेपी’ चा दणका; अखेर सरकारला आली जाग!

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळांची दुरवस्था काही आजची नाही.वर्षानुवर्षे मुलांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह,वीज, पुरेशा वर्गखोल्या आणि बसण्यासाठी बाक यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी झगडावे लागत आहे. शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी वेळोवेळी हे प्रश्न मांडले, प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले; पण सरकारी यंत्रणेच्या कानावर त्याचा फारसा परिणाम झाल्याचे दिसले नाही. मात्र अभिजीत दिपके आणि सीजेपीने ‘स्कूल ठीक करो’ अभियानाच्या माध्यमातून शाळांची वस्तुस्थिती थेट जनतेसमोर मांडण्यास सुरुवात केली आणि अचानक सरकारच्या यंत्रणेला कुंभकर्णीय जाग आली! २४ ऑगस्ट रोजी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद शाळांच्या प्रश्नावर बैठक झाली, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शाळांची माहिती मागवण्यात आली, प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आणि मूलभूत सुविधांच्या प्रश्नावर कार्यवाही करण्याचे सांगण्यात आले. हे स्वागतार्ह आहे; पण प्रश्न एवढाच ही जाग इतकी वर्षे का आली नाही?

शाळांमध्ये पाणी नाही, स्वच्छतागृहांची दुरवस्था आहे, इमारतींचे प्रश्न आहेत, विद्यार्थ्यांना बाक नाहीत, वीज आणि इतर मूलभूत सुविधांची कमतरता आहे, हे शोधण्यासाठी एव्ढ्या अभियानाची वाट का पाहावी लागली? ग्रामविकास विभागाकडे अधिकारी आहेत, जिल्हा परिषदांकडे यंत्रणा आहे, शालेय शिक्षण विभागाकडे प्रशासकीय व्यवस्था आहे, मग एवढ्या वर्षांत या शाळांची खरी परिस्थिती सरकारला कळलीच नाही का? की कळत असूनही प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची सवय झाली होती? सीजेपीने आरसा दाखवला आणि सरकारला आपलाच चेहरा दिसला, एवढे मात्र नक्की!

राजस्थानमध्येही शाळांच्या प्रश्नावर आवाज उठवणाऱ्या सीजेपी कार्यकर्त्यांना दडपण्याचा प्रयत्न झाल्याचे सांगितले जाते. कार्यकर्त्यांवर मारहाणीची घटना घडली, तरी आवाज थांबला नाही. उलट प्रश्न अधिक मोठा झाला. आवाज उठवणाऱ्यांना दाबून शाळांची अवस्था बदलणार आहे का? कार्यकर्त्यांना गप्प करण्यापेक्षा ज्या शाळांसाठी ते रस्त्यावर उतरले आहेत, त्या शाळा ठीक करणे हाच सरकारचा योग्य मार्ग आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही सरकारने एक गोष्ट लक्षात ठेवावी. प्रश्न



**सीजेपीने ‘स्कूल ठीक करो’ अभियानाच्या माध्यमातून शाळांची वस्तुस्थिती थेट जनतेसमोर मांडण्यास सुरुवात केली आणि अचानक सरकारच्या यंत्रणेला जाग आली!**

विचारणाऱ्यांना थांबवून प्रश्न थांबत नाहीत. आता सरकारने अहवाल मागवला आहे, पण खरी परीक्षा अहवाल मागवल्यानंतर सुरू होते. मंत्री जयकुमार गोरे यांनी दिलेल्या मुदतीत किती जिल्ह्यांनी अहवाल दिला, किती शाळांचे अहवाल आले, कोणत्या जिल्ह्यात किती शाळांची अवस्था गंभीर आहे, किती शाळांना तातडीने निधीची आवश्यकता आहे, किती शाळांमध्ये पाणी नाही, किती शाळांमध्ये स्वच्छतागृह नाही, किती शाळांच्या इमारतींची दुरुस्ती आवश्यक आहे, याची जिल्हानिहाय आणि शाळानिहाय माहिती जनतेसमोर आली पाहिजे.

शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी या प्रश्नांची दखल घेतली असेल तर आता त्या दखलीचे रूपांतर प्रत्यक्ष कामात झाले पाहिजे. कारण बैठक घेणे सोपे आहे, आदेश काढणे सोपे आहे, अहवाल मागवणे त्याहून सोपे आहे; पण एखाद्या दुर्गम गावातील शाळेत प्रत्यक्ष पाणी पोहोचवणे, मुलांना व्यवस्थित स्वच्छतागृह देणे, वर्गखोली दुरुस्त करणे आणि विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाक उपलब्ध करून देणे, हेच सरकारच्या कामाचे खरे मोजमाप आहे. सरकारच्या फाईलमध्ये शाळा सुधारली म्हणून उपयोग नाही; विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर त्याचा परिणाम दिसला पाहिजे. आणि आता या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आहे. किती अहवाल आले, कोणत्या जिल्ह्यांनी अहवाल दिला, कोणत्या शाळांची अवस्था काय आहे, अहवालानंतर किती निधी मंजूर झाला, प्रत्यक्ष काम कुठे सुरू झाले, किती काम पूर्ण झाले आणि कुठे अजूनही परिस्थिती ‘जैसे थे’ आहे.याचा माध्यमांनी हात धुऊन पाठपुरावा केला पाहिजे. फक्त ‘मंत्र्यांची बैठक’ अशी बातमी देऊन विषय संपवणे पुरेसे नाही; बैठकीचा परिणाम शाळेच्या दारापर्यंत पोहोचला की नाही, हा खरा प्रश्न आहे. अभिजीत दिपके आणि सीजेपीने प्रश्न विचारला, सरकारने त्याची दखल घेतली, आता जनतेला उत्तर हवे आहे. कारण हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा संस्थेचा प्रश्न नाही; हा महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. गरीब, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य कुटुंबातील मुले जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकतात. त्यांच्या शिक्षणाला दर्जेदार सुविधा मिळणे ही कृपा नाही, तर शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे आता अहवालांच्या नावाखाली पुन्हा कागदोपत्री खेळ सुरू होऊ नये. किती अहवाल आले, कोणत्या शाळा धोक्यात आहेत, कुठे काय कमतरता आहे आणि सरकारने त्यावर काय केले. याचा हिशोब महाराष्ट्राला मिळालाच पाहिजे. सीजेपीने या अभियानाने सरकारला जागे केले असेल, तर आता माध्यमांनी सरकारला झोपू देऊ नये. कारण कुंभकर्णीय जाग आली आहे हे चांगले; पण आता सरकार पुन्हा झोपले तर महाराष्ट्र त्याला जागे करण्यासाठी पुन्हा प्रश्न विचारेल! बैठका नकोत, फक्त घोषणा नकोत, अहवालांच्या फाईली नकोत आता शाळा प्रत्यक्षात ठीक झाल्या पाहिजेत आणि त्याचा हिशोब जनतेसमोर आला पाहिजे.

**धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# एनसीएलटीवर प्रकरण

सुभाषचंद्र गोयल वर कमी एनसीएलटी नावाचा कॉर्पोरेट/ आणि त्याच्या प्रवर्तकांकडे पैसे ट्रान्सफर करण्याचा जो महाशक्तिशाली सक्शन पम्प बसवण्यात आला आहे त्यावर अधिक चर्चा करुया!व्यक्तीवर कमी, सिस्टीमवर अधिक चर्चा करुया;परवा झी समूहाच्या सुभाषचंद्र गोयल,एनसीएलटी यांच्याबद्दल पोस्ट केल्यानंतर काहींनी गोयल यांचे काही स्पष्टीकरणात्मक व्हिडिओ पाठवले. त्यावर भाष्य करण्याची गरज मला वाटत नाही. कारण सुभाषचंद्र यांना मिळू शकणारे हेयर कट हे फक्त निमित्त होते.चर्चा एनसीएलटीवर अधिक व्हावयास हवी.

सुभाषचंद्र यांच्या प्रकरणात व्यक्तिगत हमी, पर्सनल ग्यारंटी होती. त्यांना तूर्तास बाजूला ठेवूया आणि पर्सनल ग्यारंटीची मॅक्रो आकडेवारी बघूया. गेल्या सहा वर्षात पर्सनल ग्यारंटीची ४,२०३ प्रकरणे फाइल केली गेली, ज्यात २,७८,००० कोटी रुपयांचे क्लेम गुंतलेले आहेत, या ४,२०३ प्रकरणात फक्त १,८३२ केसेस मध्ये Resolution Professional ची नेमणूक झाली होती. ( हे निर्णय कोण घेते? असा प्रश्न मनात येणे म्हणजे सिस्टीम केंद्री विचार करणे)

या १,८३२ पैकी ६६४ प्रकरणे सुनावणीसाठी घेतली गेली. या ६६४ प्रकरणात ५१,८०० कोटी रुपयांचे क्लेम गुंतलेले होते.या ६६४ प्रकरणांपैकी फक्त ३९ प्रकरणात पर्सनल ग्यारंटी देणाऱ्यांना १२९ कोटी रुपये भरायला





सांगण्यात आले आहेत. म्हणजे ५१,८०० कोटी रुपयांच्या तुलनेत फक्त २.४९ टक्के. (आकडेवारी संदर्भ बिझिनेस लाइन ऑगस्ट २९, पान क्रमांक २)

आता सुभाषचंद्र यांच्या केसकडे येऊया. एनसीएलटीकडे ज्यावेळी थकीत कर्ज/पर्सनल ग्यारंटी यांचे प्रकरण येते त्यावेळी सर्व संबंधित क्रेडिटर्सची Committee of Creditors बसवली जाते. त्याला COC म्हणतात. कारण त्यांना हेयर कट सहन करायचे असतात. NCLT ला नाही. एका कर्जसंस्थेला एक मत नसते तर कोणत्या क्रेडिटरचे किती कर्ज दिले त्याप्रमाणात त्याच्या मताला वेटेज असते.

२२,००० कोटींमध्ये HDFC Bank, LIC Housing, IDBI Trusteeship या सार्वजनिक संस्था आहेत. यापैकी अनेक संस्था आता हेयर कट विरुद्ध अपील करणार आहेत अशा बातम्या आहेत. त्यांनी क्रेडिटर या नात्याने अर्थातच सुभाषचंद्र यांच्यासाठी गठित केलेल्या COC मध्ये भाग घेतला होता आणि प्रस्तावित हेयर कटला विरोध केला होता.

सुभाषचंद्र म्हणतात माझ्या हेयर कट मंजुरीच्या प्रस्तावाला ८०.८ टक्के क्रेडिटरनी पाठिंबा दिला तर १९.२ टक्के क्रेडिटरनी विरोध केला. या १९.२ टक्यांमध्ये अर्थात वर उल्लेख केलेल्या सार्वजनिक संस्था आहेत.



नियमाप्रमाणे क्लेम पैकी सर्व १०० टक्के क्रेडिटरमध्ये सहमती होण्याची गरज नाही. एकूण कर्जामध्ये ६६ टक्के वेटेज असणाऱ्या क्रेडिटरनी हेयर कट मान्य केले तरी तो प्रस्ताव मंजूर होतो. (६६ टक्के का ? जास्त का नाही? असे प्रश्न मनात येऊद्यात) दुसऱ्या शब्दात विरोध करणाऱ्या क्रेडिटरना विरोध केलेला असून देखील त्यांना तो हेयर कट मान्य करावा लागतो.

सुभाषचंद्र यांची पर्सनल ग्यारंटी ९९.९७ हेयर कट घेऊन सेटल करण्याचा हा प्रस्ताव ज्या ८०.८ टक्के क्रेडिटरनी मंजूर केला ते कर्जदार कोण आहेत?

त्या सर्व खाजगी संस्था आहेत. कंसात त्यांचा कर्जातील हिस्सा : World Crest (28), Lemonades capital (17), Corpcall capital (10), Veena Investment (5), CINDA (12).... इत्यादी..

खरी स्टोरी तर पुढेच आहे. NCLT नियमाप्रमाणे त्या क्रेडिटरच्या ग्रुपमध्ये मध्ये ज्या कंपनी किंवा प्रवर्तकाला हेयर कट मंजूर करायचा आहे त्याच्याशी संबंधित कर्जसंस्था असतील, ज्याला त्या परिभाषेत Associate असे म्हटले गेले आहे, तर त्याचे वेटेज जमेस धरता कामा नये. वर उल्लेख केलेल्या सार्वजनिक संस्था असा दावा करत आहेत की वरील खाजगी कर्जदार संस्थांपैकी काही संस्था सुभाषचंद्र यांच्या Associate आहेत.

(संदर्भ इकॉनॉमिक टाइम्स २८ ऑगस्ट पान क्रमांक १२)

हे सगळे का समजून घ्यायचे

१. आपल्या देशात बँकिंग, वित्त क्षेत्रात structural बदल घडत आहेत. प्रायव्हेट क्रेडिट हे क्षेत्र तूफान वेगाने वाढत आहे. त्यातील अनेक कॉर्पोरेट क्षेत्राला कर्जे देतात. (यांचे भांडवल कोठून येते?). हेयर कट मंजूर करतांना खाजगी पैशातून दिले गेलेले कर्ज आणि जनतेच्या ठेवी घेऊन कर्ज देणाऱ्या सार्वजनिक संस्था यात फरक केला गेला पाहिजे ही राजकीय मागणी असली पाहिजे.

२. शाळांना प्राथमिक सुविधा मिळाव्यात म्हणून देशात चिमुकल्या मुले / मुली रस्त्यावर येत आहेत , त्याला अंदाजे किती पैसे लागतील त्याची या आकड्यांची तुलना किमान मनातल्या मनात नक्कीच करू शकता.


३. कॉर्पोरेट आणि बँकिंग, वित्त क्षेत्रातील कायदे, नियम, रेग्युलेशनष्ठकॉर्पोरेट आणि वित्त क्षेत्राला कसे वाट्टेल तेवढे accommodate करत असते. सगळच प्रचलित कायद्याला धरून असते. कारण मुळात कायदे / नियम तसे बनलेले असतात. ( ते कोण बनवते? तसेच का बनवते?) आपल्या सारख्या टीका करणाऱ्यांच्या तोंडावर ते औपचारिक निर्णय फेकून मारले जातात. हे लोक शासकीय यंत्रणांच्या कायदेशील निर्णयाला आव्हान देतात म्हणजे ते राष्ट्रद्रोही आहेत..इथपर्यंत narrative सेट केले जाते. याला काउंटर नॅरेटिव्ह तयार केले पाहिजे.

(तरुणांसाठी: जगातील, भारतातील कोट्यवधींच्या मानवी वेदनांवर एनजीओ टाईप उत्तरे नाहीत. कधीच नसतील. त्यांची मुळे मानव निर्मित पॉलिटिकल इकॉनॉमी मध्ये आहेत. सतत त्याचा अभ्यास करा. प्रश्न विचारा. पॉलिटिकल इकॉनॉमी मानव निर्मित आहे तर ही माणसे कोण आहेत? ती असेच कायदे,नियम का बनवतात?)

**-संजीव चांदोरकर**

# ‘बिलॉंगिंगः अ जर्नी ऑफ लव्ह’

‘बिलॉंगिंगः अ जर्नी ऑफ लव्ह’ ह्या पुस्तकाच्या बाबतीत पेंग्विनने पुन्हा शेपूट घातले आहे. फेब्रुवारीतच जेव्हा त्यांनी जनरल नरवणेंचे ‘फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी’ मागे घेतले तेव्हाच प्रकर्षाने वाटले होते की त्यांनी आपल्या लोगोमध्ये बदल करणे आवश्यक आहे. पेंग्विनऐवजी तिथे उंदीर अधिक योग्य राहील.



पुस्तकांवर जितकी बंदी घातली जाईल, तितकी ती अट्टल वाचकांपर्यंत आणि वाचू इच्छिणाऱ्यांपर्यंत पोहचतातच. औंधाच्या पंतप्रधिनिधींचे अत्यंत रोचक आत्मचरित्र उगाचच स्वातंत्र्यपूर्व काळापासून महाराष्ट्रात बॅन केले आहे. खरे तर ते सरकारनंच छापायला हवे. पण सरकारांच्या कण्यात कॅल्शिअमचा अभाव असतो. गेल्या दहा-बारा वर्षांत इतकी पुस्तके, इतके लेखक, इतके लेख आणि साहित्य एकतर बंदी घालून, दडपशाहीनं सार्वजनिक अवकाशातून बाद करण्याचा प्रयत्न झाला आहे की असे केवळ फाशिष्ट राजवटीतच घडू शकते.

अगदी २०१४ सालीच परॉंजोय गुहा ठाकुर्ता (आणि सुबीर घोष, ज्योतिर्मयी चौधरी) यांचे ‘गॅस वॉर्सः क्रोनी कॅपिटलिझम अँड द अंबानीज’ ह्या पुस्तकाची तर गळचेपीच करण्यात आली. लेखकांवर एक कोटीचा दावा अंबानींनी ठोकला. बाजारातल्या सगळ्या प्रती कुठे गेल्या, त्या कशा पल्प केल्या गेल्या कुणाला काही कळले नाही. एम एम बशीर, मुरुगन ह्याची पुस्तके दडपशाहीने दाबली गेली. वेंडी डॉनिगरचे ‘हिंदूजः अॅन ऑल्टनेटिव हिस्टरी’च्या बाबतीतही पेंग्विनने हेच केले. ‘द आदिवासीज विल नॉट डान्स’ ह्या हंसदा सोवेन्द्र शेखरच्या पुस्तकावर बंदी घातली गेली. कश्मिरमधल्या मानवी हक्क उल्लंघनावरच्या पुस्तकावरही बंदी घातली गेली. ‘आय ॲम नॉट ऑन द हिट लिस्ट’ हे गौरी लंकेशच्या खूनावरचे रॉलो रॉमिग ह्यांचे पुस्तक पेंग्विनने भारतात छापायला नकार दिला.अशी बरीच उदाहरणे आहेत.

ऑलिगार्क्सकडून, सरकारकडून किंवा व्यवस्थांकडून पुस्तकांचे अस्तित्व धोक्यात येते तेव्हा पुस्तके तात्पुरती अनुपलब्ध होणे हा तात्कालिक तोटा असेल, पण ती तेव्हाच्या राजकीय-सामाजिक पर्यावरणाची लक्षणे वेशीवर टांगतात. त्यांच्यावर बंदी घालणाऱ्यांविरुद्धचे ते धडधडीत पुरावे असतात. कोणतीही पुस्तके दुर्मीळ नसतात. ती कुठे ना कुठे सापडतातच. वाचणाऱ्याला ती भेटतातच. सुमेरियन संस्कृतीतले साहित्य कुठल्या ना कुठल्या स्वरूपात आज उपलब्ध होतेच. बंदी घालून काही होत नाही. ती तरीही मिळतातच वाचायला.पुस्तक ही अविनाशी गोष्ट आहे. दृश्य स्वरूपात असेल किंवा अदृश्य स्वरूपात.

**-गणेश विसपुते**

# ‘पंचतारांकित कारागृहे’

‘कारागृहाचा’अर्थ ‘सुधारगृह’ असा लावला जातो, पण प्रत्यक्षात तिथे जाऊन कोण सुधारते? पैशांची उब असलेले धन लांडगे, राजकीय पाठिंबा असलेले सराईत गुन्हेगार आणि बलात्कारी यांच्यासाठी ही कारागृह म्हणजे शासकीय खर्चावर चालणारी आलिशान पंचतारांकित हॉटेल्स बनली आहे. दुसरीकडे ज्यांच्याकडे पैसे नाहीत अशा गरीब आणि किरकोळ आरोपींच्या ताटातील जेवणाची चोरी करून,खानावळीचे साहित्य वळवून तिथे काळाबाजार चालतो.शिक्षेचा धाकच उरला नसेल आणि कारागृहातही बाहेरच्या जगापेक्षा अधिक ऐषोआराम मिळत असेल तर गुन्हेगारांचे मतपरिवर्तन होणे ही एक केवळ निव्वळ भाकडकथा ठरते.

कर्नाटकातील हिंडलगा असो किंवा बेंगलोर मधील परप्पाना अग्रहारा असो किंवा गोव्यातील कोलबाळ मध्यवर्ती कारागृह असो,देशातील कारागृहांच्या उंच भिंतीआड भक्कम लोखंडी गजामागे काय चालते?याचा जो सूर सध्या बाहेर येत आहे तो म्हणजे भारतीय न्यायव्यवस्था आणि कायदा सुव्यवस्था यांचे वस्त्रहरण करणार आहे.हिंडलगा कारागृहातून बाहेर पडलेला साई कुमार नावाचा बंदिवान जेव्हा उघडपणे सांगतो पैसा फेका आणि कारागृहात दारू, मोबाईल काय किंवा वेश्या व्यवसायाची सोय काय सगळे मिळते,तेव्हा राज्यकर्ते आणि प्रशासन यांची उरली सुरली अब्रूही देशीवर टांगली जाते. गोव्यातील कोळवाड कारागृहात पाचशे रुपयांना कोथिंबिरीची जुडी आणि सात हजार रुपयात कोंबडीचे तंदुरी मास विकले जाणे किंवा परप्पाना अग्रहाराच्या बॅरेक मध्ये प्रज्वल रेवण्णा सारखा लैंगिक शोषणाच्या आरोपी मोबाईल आणि पेन ड्राईव्ह वापरताना रंगेहात पकडला जाणे ह्या केवळ एकाकी घडलेल्या घटना नाहीत.

आजारपणाचे नाटक करून कारागृहातून रुग्णालयात भरती होणारे अनेक सरकारी अधिकारी असतात. मांड्या (कर्नाटक) येथील भ्रष्ट सरकारी अधिकारी मोहम्मद हुसेन आजारी असल्याचे भासवून सरकारी रुग्णालयाच्या विशेष वार्ड मध्ये केवळ आरामातच राहत नव्हता तर त्याने तिथे त्याच्या प्रेयसीलाही समावेश ठेवले होते.ही आपल्या गंजलेल्या,कुजलेल्या आणि वरपासून खालपर्यंत भ्रष्टाचाराने बरबटलेल्या कारागृह व्यवस्थेची नग्न वास्तविकता आहे.सर्वात हास्यास्पद आणि तितकाच चिडणारा प्रकार म्हणजे रेवण्णाकडे मोबाईल सापडल्यावर पोलीस महासंचालक अलोक कुमार यांनी संतापून तुझ्यामुळे संपूर्ण पोलीस खात्याची लाज गेली असे विधान केले.लाज त्या आरोपींनी घालवली नाही तर पोलीस खात्याने आणि लाचखोर सुरक्षारक्षकांनी घालवली आहे.तो मोबाईल काही थेट रेवण्णा किंवा इतर बंदीवान यांच्या हातात येऊन पडला नाही. पोलिसांचे खिसे गरम झाले म्हणूनच तो सुरक्षेच्या सात भिंती भेदून आत पोहोचला.जेव्हा निरापराध हिंदू नेत्यांना डांबतांना, सणांच्या वेळी ध्वनीक्षेपकांवर कारवाई करताना किंवा गोतस्करांकडे दुर्लक्ष करताना पोलिसांची स्वाभिमान देवता जागी होत नाही,तेव्हाच कारागृहात विकल्या जाणाऱ्या प्रामाणिकपणावर बोलण्याचा नैतिक अधिकार प्रशासनाला कुठे उरतो.

राजकीय वर्ग या सगळ्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करतो, कारण आज जे सत्तेत आहेत किंवा विरोधात आहेत, त्यातील अनेकांची पावले कधी ना कधी कारागृहाच्या दिशेने पडलेली असतात.उद्या स्वतःवर वेळ आली तर कारागृहात सर्व सोयी सुविधा तयार असाव्यात म्हणून राजकीय यंत्रणा या व्यवस्थेत कायमस्वरूपी सुधारणा करू इच्छित नाही. एखादा व्हिडिओ प्रसारित झाला किंवा वाद निर्माण झाला की दोन-तीन महिन्यासाठी निलंबनाचे नाटक करायचे आणि प्रकरण शांत झाल्यावर त्याच भ्रष्ट कर्मचाऱ्याला पुन्हा त्याच पदावर आणून बसवायचे ही वरवरची कारवाई म्हणजे ‘फार्स’ वर्षानुवर्षे चालू आहे.

परदेशातील परिस्थिती या उलट आहे. युरोपीय देशात पुनर्वसन पद्धतीवर भर दिला जातो. बंदीवानांना मानवी हक्क दिले जातात पण तिथे भ्रष्टाचाराला शून्य वाव असतो. कोणतीही अवैध वस्तू आत जाणे अशक्य असते. कर्मचाऱ्यांनी लाज घेतल्यास त्याला कठोर करावासाची शिक्षा होते.अमेरिकेत किंवा सिंगापूर मध्ये कारागृहाची सुरक्षा ही मानवी हस्तक्षेपाऐवजी ५ जी जॅमर ( मोबाईलच्या लहरी रोखणे), बायोमेट्रिक स्कॅनर (जैव ओळख) आणि अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता



तंत्रज्ञानावर आधारित असते. तिथे व्ही. आय. पी संस्कृतीला स्थान नसते आणि सुरक्षेत किंवा लाचखोरीत सहभाग आढळल्यास कर्मचाऱ्यांची रवानगी थेट कारागृहातच केली जाते. तिथे केवळ निलंबनाची मलमपट्टी केली जात नाही. आपल्याकडे जर ही दुरावस्था कायमस्वरूपी थांबवायचे असेल तर टोकाची कठोर पावले उचलावे लागतील.

कारागृहात मोबाईल, अन्न किंवा अमली पदार्थ पुरवणाऱ्या कर्मचाऱ्याला केवळ निलंबीत न करता त्याला सेवेतून कायमचे हाकलून त्याच्यावर गुन्हाच्या सहआरोपी म्हणून खटला चालवला पाहिजे. सर्व मध्यवर्ती कारागृहांमध्ये उच्च क्षमतेचे नेटवर्क जामर्स आणि कर्मचाऱ्यांच्या पूर्ण पडताळणीसाठी फुल बॉडी एक्स रे स्कॅनर अनिवार्य केले पाहिजे.पोलीस आणि कारागृह प्रशासन यावर देखरेख ठेवण्यासाठी उच्च न्यायालयाच्या थेट नियंत्रणाखाली स्वतंत्र दक्षता पथक तैनात हव. बड्या प्रस्थाना विशेष वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याचे प्रावधान कायद्यात केले गेले पाहिजे .

जोपर्यंत लाचखोर यंत्रणेचे दात घशात घातले जात नाहीत आणि राजकीय इच्छाशक्ती दाखवली जात नाही, तोपर्यंत पोलीस खात्याची लाज गेली असा टाहो फोडणे म्हणजे भ्रष्टाचाराच्या पापावर पांघरून घालण्याचे एक केविलवाणे नाटकच ठरेल. सध्याच्या सर्वपक्षीय शासनकर्त्यांकडून काही केले जाईल याची शक्यता नाही. कारागृहातील बंदीवानांना सुधारण्यासाठी प्रथम तेथील भ्रष्टाचारी व्यवस्था सुधारणे आवश्यक आहे.

**लीना गाडगीळ**

## बाल मनातील श्रावणमास

श्रावण मास येता चैतन्य फुलतो
आमच्या चेह-यावर आनंद झळतो
पावसाच्या सरी अंगावर बरसतो
चिखलात आम्ही झिम्मा खेळतो

ऊन-पावसाचा खेळ चालतो
आकाशात इंद्रधनुष्य खुलतो
सप्तरंगाची उधळण करतो
आईच्या साडीची उपमा देतो

तान्हा पोळ्याची रेस लावतो
नंदीबैल जणू डौलात सजतो
पुरणपोळीचा मुखी नैवद्य भरतो
बोजा-याच्या नाणींनी खिसा फुगतो

दुकानात आम्ही रेलचेल करतो
खाऊंच्या खरेदीत गोंधळ उडतो
चॉकलेट कुरकु-यांचा स्वाद जडतो
जेवनाकडे आम्ही पाठ फिरवतो

लिपिकासम सुनील कलम चालवितो
लहान सहानांची अबोल प्रित रेखाटतो
शब्दशब्दांची माला हा गुंफतो
बाल मनातील कविता साकारतो

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

# मनरेगा कामात अनियमिततेचे आरोप; ग्राम रोजगार सेवकाच्या निलंबनाची मागणी

## लामकाणी ग्रामस्थांचे अकोट गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोट ■

तालुक्यातील लामकाणी येथील ग्राम रोजगार सेवक सुशील गोपाल मालठाणकर यांच्यावर मनरेगा कामकाजात कथित अनियमितता, कर्तव्यात कसूर तसेच गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप करीत ग्रामस्थांनी त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. यासंदर्भात असंख्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन अकोटचे गटविकास अधिकारी रमाकांत माळी यांना देण्यात आले.



ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांवर संबंधित ग्राम रोजगार सेवकाकडून योग्यप्रकारे देखरेख केली जात नसल्याचा आरोप आहे.

तसेच मजुरांच्या मस्टरमध्ये फेरफार करणे, खोटी नावे नोंदविणे, कामाच्या ठिकाणी वारंवार अनुपस्थित राहणे आणि मजुरांना वेळेवर रोजगार उपलब्ध करून न देणे, असे आरोपही निवेदनातून करण्यात आले आहेत.

### चौकशी करून कारवाईची मागणी

या सर्व आरोपांची प्रशासनाने तातडीने चौकशी करून दोष आढळल्यास संबंधित ग्राम रोजगार सेवकावर नियमानुसार कठोर कारवाई करावी, तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबित करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

निवेदनावर गौरव बायस्कर, गजानन भराटे, ओम म्हसाळ, ज्ञानेश्वर कडु, अजय भोंगे, उमा नंदकिशोर येवले, राजेश भोंगे, दीपक म्हसाळ, निलेश कडु, ज्ञानेश्वर रोडे, दशरथ म्हसाळ, कुणाल हरणे, अभिजित कडु, अनिल म्हसाळ, डिगांबर गावंडे, उमेश कडु, अभिषेक कोठे, आकाश भिसे, प्रविण हागोणे, जयश्री गावडे, ऋषिकेश भिसे, सुरेंद्र गावंडे यांच्यासह असंख्य ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, ग्रामस्थांच्या या गंभीर आरोपांवर अकोट पंचायत समिती प्रशासनाकडून कोणती चौकशी केली जाते आणि संबंधित रोजगार सेवकाविरुद्ध काय कारवाई होते, याकडे लामकाणी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### जॉब कार्डसाठी पैसे घेतल्याचा आरोप

जॉब कार्ड काढण्यासाठी तसेच त्यावर मजुरीची नोंद करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीकडून २०० ते ५०० रुपयांपर्यंत पैसे घेतले जात असल्याचा गंभीर आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. याशिवाय शासकीय योजनांच्या कामात गैरव्यवहार तसेच नागरिकांशी गैरवर्तन केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. घरकुल योजनेबाबतही ग्रामस्थांनी गंभीर आरोप केले असून, दोन घरकुले मंजूर करून त्यापैकी एका घरकुलाची रक्कम स्वतःकडे ठेवल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे. या सर्व प्रकारांमुळे गावातील विकासकामांवर परिणाम होत असून सर्वसामान्य मजुरांची कथित हेळसांड होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# ९०० किमी अनवाणी पायी प्रवास; 'भोळा'चीही शिवभक्तांना अखेरपर्यंत साथ!

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

महादेवाच्या भक्तीने प्रेरित होऊन घृष्णेश्वर येथून पवित्र जल घेऊन तेल्हारा येथील श्री गौतमीश्वर संस्थानच्या दिशेने निघालेल्या कावड यात्रेने तब्बल ९०० किलोमीटरचा अनवाणी पायी प्रवास पूर्ण केला. अनेक दिवसांचा खडतर प्रवास पार करून कावड यात्रा तेल्हारा नगरीत दाखल होताच 'हर हर महादेव', 'बम बम भोले'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्या पवित्र स्थळावरून कावडीत जल घेऊन शिवभक्तांनी अनवाणी पायी प्रवासाला सुरुवात केली. उन्हाचा तडाखा, पावसाची शक्यता आणि रस्त्यातील विविध अडचणींची पर्वा न करता श्रद्धेच्या बळावर यात्रेकरूंचा प्रवास सुरू राहिला. या कावड यात्रेतील सर्वाधिक लक्षवेधी बाब ठरली ती 'भोळा' नावाच्या कुत्र्याची साथ. यात्रा सुरू झाल्यापासून भोळा शिवभक्तांसोबत चालत राहिला.



तब्बल ९०० किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून तोही यात्रेसोबत तेल्हारा नगरीत दाखल झाला. त्यामुळे शिवभक्तांसह नागरिकांमध्येही भोळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

### राठी परिवाराकडून शिवभक्तांचे स्वागत

तेल्हारा शहरात कावड यात्रा दाखल होताच सरिता मेडिकलसमोर नगरसेवक जितेंद्र राठी यांनी शिवभक्तांसाठी फराळ व फळांचे वाटप करून स्वागत केले. माजी नगराध्यक्ष सुशीला ताई मूलचंद राठी तसेच अंबिका अर्बन बँकेचे अध्यक्ष व माजी नगरसेवक मुलचंदजी राठी यांनीही यात्रेकरूंचे स्वागत केले. शिवभक्तांच्या सेवेसाठी राठी परिवाराने केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

### गौतमीश्वर मंदिरात पवित्र जलाने अभिषेक

९०० किलोमीटरचा अनवाणी प्रवास पूर्ण करून तेल्हारा नगरीत दाखल झालेल्या कावड यात्रेतील पवित्र जल श्री गौतमीश्वर संस्थान येथे नेण्यात आले. या जलाने भगवान महादेवाचा अभिषेक करण्यात येणार आहे. यात्रेच्या आगमनावेळी दर्शनासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली. श्रद्धा, संयम, निष्ठा आणि सेवाभावाचा संदेश देणारी ही कावड यात्रा ठरली. विशेषतः सुरुवातीपासून अखेरपर्यंत शिवभक्तांसोबत चालणाऱ्या 'भोळा'ची साथ या यात्रेची भावनिक आठवण ठरली.

# रुईखेड शिवारात काळविटाची शिकार; शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण

## वन्यप्राण्याच्या हल्ल्याची शक्यता; वनविभागाने पिंजरा लावून गस्त वाढविण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोट ■

सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या रुईखेड येथील शेतशिवारात मोठ्या काळविटाची शिकार झाल्याची घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. डॉ. ज्ञानेश्वर मानकर यांच्या महागाव शिवारातील गट क्रमांक ४३ मधील संत्रा बागेत शिकारीचे अवशेष आढळून आले. परिसरात मोठ्या वन्यप्राण्याच्या पायांचे ठसेही दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडल्याचा अंदाज आहे. सकाळी शेतात गेलेल्या शेतमजुरांना काळविटाच्या शिकारीचे अवशेष आढळले. तसेच शेताच्या परिसरात मोठ्या प्राण्याच्या पायांचे ठसे आढळून आले. त्यामुळे काळविटावर बिबट्या किंवा अन्य हिंस्त्र वन्यप्राण्याने हल्ला केला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, हल्ला नेमक्या कोणत्या वन्यप्राण्याने केला, हे वनविभागाच्या पाहणीनंतरच स्पष्ट होणार आहे.



**शेतात जाण्यासही शेतकरी धास्तावले :** रुईखेड तसेच महागाव परिसरातील शेतशिवारात वन्यप्राण्यांचा वावर असल्याच्या चर्चेमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. सध्या शेतीची कामे सुरू असल्याने पिकांना पाणी देणे, जनावरांसाठी चारा आणणे यासाठी शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. मात्र, वन्यप्राण्याच्या संभाव्य वावरामुळे अनेक शेतकरी एकट्याने शेतात जाण्यास टाळाटाळ करीत आहेत.

**वनविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह :** परिसरात यापूर्वीही वन्यप्राण्यांशी संबंधित घटना घडल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत वनविभागाकडे तक्रारी करूनही अपेक्षित उपाययोजना झाल्या नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. वनविभागाने घटनास्थळी पाहणी करून वन्यप्राण्याच्या हालचालींचा मागोवा घ्यावा, आवश्यक असल्यास पिंजरा लावावा तसेच परिसरात गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

**'शेतातच सुरक्षितता नसेल तर जगायचे कसे?' :** 'माझ्या गट क्रमांक ४३ मधील संत्रा पिकात मोठ्या काळविटाची शिकार झाल्याचे आढळून आले आहे. शेत हेच आमचे जीवन आहे. जर शेतातच सुरक्षितता नसेल तर आम्ही जगायचे कसे? वनविभागाने तातडीने लक्ष देऊन उपाययोजना कराव्यात,' अशी मागणी शेतकरी डॉ. ज्ञानेश्वर मानकर यांनी केली. दरम्यान, या घटनेची वनविभागाने तातडीने दखल घेऊन घटनास्थळी पाहणी करावी आणि वन्यप्राण्याचा वावर असल्यास त्याचा बंदोबस्त करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

# पीकविमा, सरसकट कर्जमाफी द्या; अन्यथा 'काळा पोळा'!

## मुख्यमंत्र्यांना निवेदन; १० सप्टेंबरला शेकडो बैलजोड्यांसह आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

सन २०२५ च्या खरीप हंगामासाठी मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेला हेक्टरी १७ हजार ५०० रुपयांचा पीकविमा पोळ्यापूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, तसेच निकृष्ट सोयाबीन बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एकरी १० हजार रुपयांची भरपाई द्यावी, अशा विविध मागण्या शेतकरी संघटनांनी केल्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास १० सप्टेंबर रोजी मूर्तिजापूर तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसरात शेकडो बैलजोड्यांसह 'काळा पोळा' साजरा करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकारी, मूर्तिजापूर यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना पाठविण्यात आले. निवेदनात २०१९ पूर्वीचे थकीत कर्ज तसेच शेतकऱ्यांची संमती न घेता कर्जाचे पुनर्गठन करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीपासून वगळण्याची अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे. एकही शेतकरी थकीत कर्जदार राहू नये, यासाठी सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणीही करण्यात आली.



निकृष्ट सोयाबीन बियाण्यांमुळे अनेक शेतकऱ्यांची पिके बाधित होऊन शेतीच्या मशागतीवर झालेला खर्च वाया गेला आहे. त्यामुळे शासन आणि संबंधित बियाणे कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना रब्बी हंगामापूर्वी एकरी १० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर केलेली ५० हजार रुपयांची प्रोत्साहनपर मदतही पोळ्यापूर्वी देण्याची मागणी आहे. दरम्यान, विदर्भात गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पीकविमा योजनेतील जुन्या तीन ट्रिगरनुसार विदर्भ व मराठवाड्यातील पात्र शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रिम पीकविमा तातडीने जाहीर करावा, तसेच विदर्भात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास १० सप्टेंबर रोजी मूर्तिजापूर तालुक्यातील शेतकरी तहसील व एसडीओ कार्यालय परिसरात शेकडो बैलजोड्या आणून 'काळा पोळा' आंदोलन करतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदनावर प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ वानखडे, जनमंच नागपूरचे तालुकाध्यक्ष प्रा. सुधाकर गौरखेडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कैलास साबळे, युवा सेनेचे अवि पोळकट, आंतरभारती पुणेचे तालुका सचिव प्रमोद राजंदेकर यांच्यासह डॉ. संजय उमाळे, श्रीकृष्ण गुल्हाने, बाळासाहेब खांडेकर, प्रफुल्ल मालधुरे, जगदीश जोगळे, योगेश सोळंके, इरफान खान, अरुण गावंडे, गोपाल तायडे, सचिन पवार, स्वप्निल मेहरे, राहुल वानखडे, अंकुश भगत, अजय हांडे, शंकर ठाकरे, साहेबराव बांबल, मनोहर ताकतोडे, विनायक खंडारे, संजय बांबल, राजाभाऊ भारंबे, वैभव गुल्हाने, गणेश भोसले, अंकुश गाडेकर, मुन्ना नाईकनवरे, पंजाबराव गावंडे, बाळू भगत, जीवन देशमुख, अरुण बोंडे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पूज्य सिंधी जनरल पंचायतच्या अध्यक्षपदी कन्हैयालाल रंगवानी

**अकोला :** पूज्य सिंधी जनरल पंचायत अकोलाच्या मुखिया पदासाठी रविवार ३० ऑगस्ट रोजी झालेल्या निवडणुकीने मागील २५-३० वर्षांच्या पंचायत कार्यकाळात एक नवा इतिहास निर्माण केला. या निवडणुकीबाबत सिंधी समाजातील युवकांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत मोठा उत्साह पाहायला मिळाला. निवडणुकीच्या एक दिवस आधी उमेदवार दौलतराम चंदवानी यांनी कन्हैयालाल रंगवानी यांना पाठिंबा जाहीर केला. याबद्दल समाजबांधवांनी त्यांचे आभार मानले.या निवडणुकीत एकूण २५१७ मतदारांपैकी २१५० मतदारांनी मतदान केले, म्हणजेच सुमारे ८५.४० टक्के मतदान झाले.मुखिया पदासाठी कन्हैयालाल रंगवानी, विनोदभाई मनवाणी व दौलतराम चंदवानी हे तीन उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

**जगप्रसिद्ध प्रभू सावरीया सेठ दर्शन झाकी :** महानगरात लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या गंगानगर परिसरातील श्री सालासार बालाजी मंदिरात सालाबादप्रमाणे या वर्षी ही भव्य कृष्ण जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.


**तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय अकोला, जि. अकोला..**

जा.क./ तह/प्रस्तु-१/कावि- ९६१/२०२६ — दिनांक २५.०८.२०२६

**जाहीर नोटीस**

१. रा.मा.क्र. LND-31/चांदुर/04/2025-26

गजानन नथ्थु डाबेराव व इतर, रा. चांदुर, ता. जि. अकोला विरुध्द राजेंद्रसिंह बिहारीसिंग ठाकुर, रा.अकोला, ता. जि. अकोला व इतर मौजे चांदुर, ता. जि. अकोला येथील गट क्र.१५४/१, मधील क्षेत्र ०.९० हे. आर या आदिवासी शेतीबाबत वर नमुद करण्यात आलेले प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. उक्त प्रकरण मध्ये गैरअर्जदार क्र. १ राजेंद्रसिंग बिहारीसिंग ठाकुर, रा. हरीहर पेठ, अकोला, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. २ रुखमिनीबाई विठ्ठलराव देशमुख, रा. शिवाजी नगर, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. ३ जयप्रकाश शालिग्राम पाटील, रा. प्रकाश बाग, शिवणी, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. ४ सत्यनारायण रामनिहोर यादव, रा. चाँद खां प्लॉट, अकोला, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. ५ मनिष नंदलाल टकरानी, रा. निमवाडी कॅम्प, नानक नगर, अकोला, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. ६ कुतुबूद्दीन फजले हुसेन मशीनवाला, रा. खिडकी पुरा, अकोला, ता. जि. अकोला गैरअर्जदार क्र. ७ मुनीरा शब्बीर शाहमलक, रा.हमजा प्लॉट, जश्न पॅलेस, शादी हॉल जवळ, अकोला, ता.जि. अकोला गैरअर्जदार क्र. ८ शब्बीर शाहमलक जाहिद हुसेन, रा. हमजा प्लॉट, जश्न पॅलेस, शादी हॉल जवळ, अकोला, ता.जि. अकोला गैरअर्जदार क्र. ९ कन्हैयालाल हकीकतराय मोटवाणी, रा. कच्ची खोली, सिंधी कॅम्प, अकोला, ता. जि. अकोला

वरील अर्जदार यांनी सर्व गैरअर्जदार यांना पार्टी करुन प्रकरण दाखल करण्यात आले आहे. त्याअर्थी आपण दिनांक ०३.०९.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अगर वकीलामार्फत वि न्यायालयामध्ये हजर होवुन आपले म्हणणे सादर करावे. अन्यथा आपले काही म्हणणे / हरकत नाही असे गृहीत धरुन प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

करीता नोटीस आज दिनांक २५.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — (कुणाल झाल्टे) तहसिलदार, अकोला

**Change In Name** Passport no K1745578I have change my Name From **SANTOSHKUMAR VIJAYKUMAR SOMANI** --TO-- **SANTOSH VIJAYKUMAR SOMANI** MY RESIDENTIAL ADDRESS IS - BIRLA ROAD NEAR JANTA BANK AKOLA 444005

**Change In Name** I have change my name From **Mohd Hussain ghulam Ayyub** - To - **MOHAMMAD HUSAIN GULAM AYYUB** Address - CHOTA MOMINPURA Balapur Dist AKOLA Maharashtra 444302 Passport No :- J6012344

**CHANGE OF NAME** I have Changed My Name From Haridas Bhikhulal Jobanputra to Haridas Bhikulal Jobanputra Address : Near Amrutwadi New Radhakisan Plot, Akola - 444001 (M.S.)

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४७२/२०२६ — प्रोसेस नं.११०५६/२०२६
चौ.ता. १३/१०/२०२६ — दिनांक : २९/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती पुष्पा शालिग्राम गावंडे २. अमोल शालिग्राम गावंडे ३. प्रविण शालिग्राम गावंडे ४. अभय शालिग्राम गावंडे सर्व रा. संतोष नगर, खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९९२१८२३०४२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शालिग्राम पुर्णाजी गावंडे
**पत्ता :-** रा. संतोष नगर, खडकी बु, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालिग्राम पुर्णाजी गावंडे यांचे दि. १३/०५/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४१७/२०२६ — प्रोसेस नं.१०९५४/२०२६
चौ.ता. १४/१०/२०२६ — दिनांक : २७/०८/२०२६

**अर्जदार :** १. शेख जहिर कुरेशी शेख चाँद कुरेशी मो. क्र. ८०१०१४८८४२ २. आशा अंजुम शेख जहीर कुरेशी रा. गौसीया मस्जिद जवळ, संजय नगर, नायगाव, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मालन बी शेख जहीर कुरेशी
**पत्ता :-** रा. गौसीया मस्जिद जवळ, संजय नगर, नायगाव, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मालन बी शेख जहीर कुरेशी यांचे दि. ३०/०१/२०२२ रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १४/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७१४/२०२६ — प्रोसेस नं.१०९८८/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ — दिनांक : २७/०८/२०२६

**अर्जदार :** १. निलेश पांडुरंग मोपारी रा. उत्सव मंगल कार्यालयाजवळ, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. सध्या रा. ई-११०२, ७ प्लुमेरिया, ड्राईव्ह, सि. नं. ७/८, ब्लू वॉटर हॉटेल जवळ, पुनावाले, पुणे शहर, जि. पुणे. २. वृषाली महेश फुंडकर रा. फ्लॅट नं बी/२२, बिल्डिंग ई-२, न्यू फ्रेंडस सोसायटी, पौड रोड, वनाझ कॉर्नर जवळ, कोथरूड, पुणे शहर, पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. पांडुरंग पंढरी मोपारी २. सुनंदा पांडुरंग मोपारी
**पत्ता :-** रा. उत्सव मंगल कार्यालयाजवळ, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पांडुरंग पंढरी मोपारी यांचे दि. ०२/०८/२०२५ रोजी निधन झाले आहे व मयत सुनंदा पांडुरंग मोपारी यांचे दि. ०५/१०/२०२३ रोजी पुणे येथे निधन झाले.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू दोन्ही मयत पांडुरंग पंढरी मोपारी व सुनंदा पांडुरंग मोपारी यांच्या नावावर काही रक्कमा जमा आहेत. ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. १. महाराष्ट्र ग्रामीण बॅंक जठारपेठ, अकोला येथील बचत खाते क्र. ६६२०१०१७०३० मध्ये दिनांक २९.१२.२०२५ रोजी प्रलंबित असलेली रक्कम ५,१८,८९६.४१ /- अक्षरी रूपये पाच लाख अठरा हजार आठशे नव्याण्णव आणि एकेचाळीस पैसे मात्र २. पोस्ट विभाग, रामदासपेठ पी. ओ. अकोला येथील बचत खाते क्र. २८२०९४५००४ मध्ये दिनांक ३१.०३.२०२५ रोजी प्रलंबित असलेली रक्कम १४,००,७१७.००/- अक्षरी रूपये चौदा लाख सातशे सतरा मात्र

एकूण रक्कम १९,१९,६१३.४१ /- अक्षरी रूपये एकोणवीस लाख एकोणवीस हजार सहाशे तेरा.. आणि एकेचाळीस पैसे मात्र. सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४५७/२०२६ — प्रोसेस नं.१०८८८/२०२६
चौ.ता. ०९/१०/२०२६ — दिनांक : २५/०८/२०२६

**अर्जदार :** १. नरेंद्र विनायकराव देशमुख (दानडे) २. बाबुराव विनायकराव देशमुख दोघेही रा. शिवार्पण कॉलनी, डॉ. लव्हाळे क्लिनीक बाजुला, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ३. जयश्री अरूणराव विंचुरकर रा. मु. पो. बोहरे, ता अमलनेर, जि. जळगाव.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विनायक महादेवराव देशमुख २. इंदुबाई विनायकराव देशमुख
**पत्ता :-** रा. शिवार्पण कॉलनी, डॉ. लव्हाळे क्लिनीक बाजुला, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विनायक महादेवराव देशमुख यांचे दि. २५/०८/२०१६ रोजी उमरी प्र. बा. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत इंदुबाई विनायकराव देशमुख यांचे दि. १६/०२/२०१९ रोजी शिवार्पण कॉलनी, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार प्र. अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २३१/२०२६ — प्रोसेस नं.३२१४/२०२६
चौ.ता. ०३/१०/२०२६ — दिनांक : २०/०८/२०२६

**अर्जदार :** १. रामराव लक्ष्मण वानखडे, वय ६२ वर्ष २. गजानन लक्ष्मण वानखडे, वय ६० वर्ष, दोघेही रा. किनखेड ता. अकोट जि. अकोला ३. बेबीताई रमेश नंदाने, वय - ६३ वर्ष, रा. वैराट राजापूर, ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवासी आहेत. लक्ष्मण महादेव वानखडे हे दि. १४/०६/२०२५ रोजी किनखेड ता. अकोट जि. अकोला येथे मरण पावले. मयत लक्ष्मण महादेव वानखडे हे किनखेड ता. अकोट जि. अकोला येथील कायमचे रहिवासी होते. अर्जदार क. १ व २ हे मुले तर अर्जदार क्र. ३ हि मयताची विवाहीत मुलगी आहे. मयत लक्ष्मण महादेव वानखडे यांची पत्नी नामे सरस्वताबाई लक्ष्मण वानखडे हि सन २०२२ मध्ये तर मयताची आई ह्या खूप अगोदर मरण पावल्या आहेत. मयत लक्ष्मण महादेव वानखडे यांना अर्जदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २०/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४७३/२०२६ — प्रोसेस नं.११०३०/२०२६
चौ.ता. १२/१०/२०२६ — दिनांक : २८/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. शोभा प्रभाकर पोफळकर २. प्रशांत प्रभाकर पोफळकर ३. गिरीष प्रभाकर पोफळकर व्दारा पोफळकर हॉस्पिटल, बारा ज्योर्तिलिंग मंदिराच्या मागे, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. ४. सौ. मनिषा चंद्रप्रकाश आगळे रा. ए-१६, ग्रीन ॲकेक्रेस बंगलो, डिन क्वॉरी रोड, पंजारापोल, चेंबूर, मुंबई. ४०००८८

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रभाकर विश्वनाथ पोफळकर
**पत्ता :-** रा. व्दारा पोफळकर हॉस्पिटल, बारा ज्योर्तिलिंग मंदिराच्या मागे, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर विश्वनाथ पोफळकर यांचे दि. १७/१२/२०२५ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २८/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# पालिकेच्या 'समान बक्षिसा'च्या धोरणाने बैलपोळ्याची शर्यतच संपवली

## सिंदी रेल्वेत पोळ्याची रंगत ओसरली; मान-सन्मानासाठीची चुरस गेली, शेतकऱ्यांच्या उत्साहावर प्रशासनाची उदासीनता

**सिंदी रेल्वे/मोहन सुरकार**

तान्हा पोळ्यासाठी महाराष्ट्रात विशेष प्रसिद्ध असलेल्या आणि सुमारे ८० टक्के कृषीप्रधान सिंदी रेल्वे शहरातील बैलपोळ्याची पारंपरिक रंगत यंदा पुन्हा फिकी पडल्याची भावना शेतकरी आणि बैलजोडी मालकांमध्ये आहे. एकेकाळी शहरातील सर्वोत्कृष्ट बैलजोडीचा मान पटकावण्यासाठी मैदानात रंगणारी चुरस आता नगरपालिकेच्या बदललेल्या बक्षीस धोरणामुळे जवळपास संपुष्टात आली आहे. 'सर्वांना समान' या धोरणाने स्पर्धेची धारच बोथट केली, अशी चर्चा शहरात रंगली आहे.



शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून वर्षभर राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण. सिंदी रेल्वेत बैलपोळ्यासोबत दुसऱ्या दिवशी साजरा होणारा तान्हा पोळाही मोठ्या उत्साहात पार पडतो. मात्र बैलपोळ्यातील स्पर्धेचा थरार आता पूर्वीसारखा राहिलेला नाही.

पूर्वी नगरपालिकेकडून सहभागी बैलजोड्यांची 'शरीरसौष्ठव' आणि 'साजश्रृंगार' अशा दोन गटांत विभागणी केली जात असे. निवड समिती प्रत्यक्ष पाहणी करून प्रत्येक गटातील पाच उत्कृष्ट जोड्या निवडत असे. समिती सदस्यांनी दिलेल्या गुणांची बेरीज करून गुणवत्तेनुसार क्रमांक जाहीर केले जात आणि त्यानुसार बक्षिसे दिली जात. त्यामुळे 'शहरातील नंबर वन बैलजोडी' ठरण्याची प्रतिष्ठेची लढाई मैदानात पाहायला मिळत होती.

मात्र निवड प्रक्रियेवरून वाद, पक्षपात आणि वशिलेबाजीचे आरोप होऊ लागल्यानंतर परिस्थिती बदलली. पोळ्याच्या मैदानात निवड समितीविरोधात 'झडत्या'च्या माध्यमातून नाराजी व्यक्त होऊ लागली. अखेर वाद टाळण्यासाठी पालिका प्रशासनाने बक्षिसांची संख्या वाढवून गुणवत्तेनुसार अनुक्रमांक देण्याची पद्धत बंद केली. दोन्ही गटांत प्रत्येकी नऊ बैलजोड्यांना समान स्वरूपाची बक्षिसे देण्याची पद्धत सुरू झाली.

पण वाद थांबवताना पालिकेने स्पर्धेचाच जीव घेतला, अशी टीका आता शेतकरी करीत आहेत.

पूर्वी पहिला क्रमांक मिळविण्यासाठी बैलजोडी मालक वर्षभर तयारी करीत. दोन-तीन लाख रुपये खर्च करून स्वतंत्र जोडी खरेदी केली जात असे. वर्षभर बैलांना विशेष आहार, अतिरिक्त खुराक आणि आरोग्याची काळजी घेतली जाई. पोळ्याच्या काही महिन्यांपूर्वी तर त्यांच्या खानपानापासून व्यायामापर्यंत विशेष नियोजन केले जाई.

पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या देखरेखीखाली बैलांची निगा राखली जात असे. पोळ्याच्या दिवशी मैदानात उतरलेली जोडी पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत असे.

आज मात्र पहिला क्रमांक, मान-सन्मान आणि प्रतिष्ठेची चुरसच उरली नसल्याने त्या मेहनतीला प्रेरणा काय असा प्रश्न बैलजोडी मालक उपस्थित करीत आहेत. परंपरा जिवंत ठेवायची असेल तर केवळ बक्षिसांची संख्या वाढवून उपयोग नाही, तर पारदर्शक आणि गुणवत्ताधारित स्पर्धा पुन्हा सुरू करणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

वाद टाळण्यासाठी घेतलेला निर्णय पोळ्याच्याच उत्साहावर भारी पडला आहे. पालिकेने बक्षिसांची संख्या नव्हे, तर बैलपोळ्याची हरवलेली 'चुरस' परत आणावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



# बहिणींच्या स्नेहबंधाला पालकमंत्र्यांची अनोखी 'राखी'

## रक्षाबंधन सोहळ्याला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा/जनमाध्यम**

रक्षाबंधन म्हणजे भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा अतूट बंध. याच स्नेहबंधाला सामाजिक आणि सांस्कृतिक रंग देत जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या वतीने आरती चौक येथील युरीच मॉलमध्ये दिमाखदार रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. महिला भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर आनंद आणि जल्लोषाने भारून गेला.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, नागपूरच्या महापौर नीता ठाकरे, केतकी गडकरी आणि प्रियदर्शिनी महिला विकास संस्थेच्या अध्यक्षा शितल भोयर यांनी महिलांसोबत सहभागी होत कार्यक्रमाची रंगत वाढविली. डॉ. किरण खडसे यांच्या साक्षी कथक नृत्य चॅरिटेबल अकॅडमीच्या विद्यार्थिनींनी गणेश वंदना आणि वारकरी नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. स्पंदन इन्स्टिट्यूटच्या माधवी पवार यांच्या माध्यमातून महिलांसाठी मनोरंजक खेळ आणि स्पर्धा घेण्यात आल्या. 'रेणुका ग्रुप'च्या मंगळागौरीच्या सादरीकरणाने महाराष्ट्राच्या लोकपरंपरेची रंगत खुलली. वर्ध्याची स्थानिक कलाकार श्रेया मोटघरे यांच्या 'महाराष्ट्राची लोकधारा' या लावणीने कार्यक्रमाचा उत्साह शिगेला पोहोचला. महापौर नीता ठाकरे यांनी गीत सादर करून विशेष दाद मिळविली.महिला सक्षमीकरणासोबत संस्कृती, मनोरंजन आणि स्नेहाचा सुंदर संगम या सोहळ्यात पाहायला मिळाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वंदना भुते, संचालन पल्लवी पुरोहित यांनी केले. आभार सुनीता ढवळे यांनी मानले. सरपंच, आजी-माजी नगरसेविका आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## संक्षिप्त

### ६५.६८ लाखांचा दारूसाठा जप्त

**वर्धा-** जिल्ह्यात अवैध दारूविक्री आणि तस्करीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलिसांकडून सुरू असलेल्या वॉशआऊट मोहिमेला वेग आला आहे. जिल्ह्यातील १९ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत पोलिसांनी केलेल्या विविध कारवायांमध्ये तब्बल ६५ लाख ६८ हजार ८७५ रुपयांचा दारूसाठा जप्त केला. अवैध दारूची वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतली असून, एकाच दिवशी ७८ प्रकरणे नोंदविण्यात आली. या कारवाईत ७९ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलिसांनी दारूसाठ्यासह वाहने आणि इतर साहित्यही जप्त केले. जिल्ह्यात अवैध दारूविक्रीचे जाळे उखडून काढण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने छापेमारी सुरू आहे. आगामी काळातही अशाच प्रकारच्या कारवाया तीव्र करण्याचे संकेत पोलिस विभागाने दिले आहेत.

### सट्टापट्टीचा डाव पोलिसांनी उधळला

**वर्धा-** शहरातील सिद्धार्थनगर परिसरात सुरू असलेला सट्टापट्टीचा जुगार पोलिसांनी छापा टाकून उधळून लावला. सिद्धार्थनगर येथील पाण्याच्या टाकीजवळ ही कारवाई करण्यात आली. अंकुश तपन रॉय (३५, रा. चितोडा, बारा खोली) हा परिसरात सट्टापट्टीचा जुगार भरवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात पाळत ठेवून अचानक छापा टाकला. यावेळी अंकुश रॉय याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून रोख रक्कम तसेच सट्टापट्टीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील अवैध जुगार अड्ड्यांविरोधात पोलिसांनी मोहीम सुरू केल्याने जुगार चालकांचे धाबे दणाणले आहेत.

### वरली-मटका भरविणाऱ्यास अटक

**तळेगाव (श्या. पंत)-** सारवाडी परिसरात सुरू असलेल्या वरली-मटका जुगारावर पोलिसांनी छापा टाकून एका वृद्धाला ताब्यात घेतले. मोहम्मद सलीम मोहम्मद युसुफ (७५, रा. गौरक्षण वॉर्ड, आर्वी) हा सारवाडी परिसरात वरली-मटका जुगार भरवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी माहितीची खातरजमा करून परिसरात अचानक कारवाई केली. यावेळी संशयिताला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून जुगाराशी संबंधित साहित्य जप्त करण्यात आले असून, त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरात सुरू असलेल्या अवैध जुगाराला आळा घालण्यासाठी पोलिसांकडून कारवाया वाढविण्यात आल्या आहेत. त्यामुळे वरली-मटका चालकांमध्ये खळबळ उडाली आहे.

### पुतण्याला काकाकडून मारहाण

**आवी-** किरकोळ कारणावरून काकाने पुतण्याला मारहाण केल्याची घटना वाढोणा वॉर्डात घडली. याप्रकरणी शुभम प्रवीण डहाके (२०, रा. वाढोणा वॉर्ड) यांनी आर्वी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, शुभम यांचा त्यांचे काका संजय डहाके यांच्यासोबत काही कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर मारहाणीत झाले. संजय डहाके यांनी शुभम यांना मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. घटनेनंतर शुभम यांनी आर्वी पोलिस ठाणे गाठून पोलिसांना माहिती दिली.

# संविधानाची गळचेपी, राजकारणाचे शुद्धीकरण जनतेलाच करावे लागेल-अजित नवले

## ईडी-सीबीआयचा गैरवापर, पक्षफोडी आणि वाढती महागाईवर माकपचा हल्लाबोल

**वर्धा/जनमाध्यम**

देश स्वतंत्र होऊन आठ दशके उलटण्याच्या उंबरठ्यावर असताना संविधानाच्या मूल्यांनुसार देश आणि संसद चालत नसल्याचा घणाघाती आरोप करीत राजकारणाचे शुद्धीकरण जनसहभागातूनच शक्य आहे, असा निर्धार मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या विदर्भस्तरीय संमेलनातून व्यक्त करण्यात आला. ईडी, सीबीआयसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा पक्षीय राजकारणासाठी गैरवापर होत असल्याचा आरोप करीत माकपच्या नेत्यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला.

शिववैभव मंगल कार्यालय, बॅचलर रोड, वर्धा येथे झालेल्या या विदर्भव्यापी संमेलनाला विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा आणि अकोला या जिल्ह्यांतून दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते उपस्थित होते.

संमेलनाचे उद्घाटन डॉ. अशोक ढवळे यांनी केले. देशातील विद्यमान राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेबाबत गंभीर चिंता व्यक्त केली.



निवडणुकीत जनतेने एका विचाराला कौल दिल्यानंतर निवडून आलेले लोकप्रतिनिधी पक्षांतर करून सत्ताधारी पक्षात प्रवेश करीत असतील, तर हा मतदारांच्या विश्वासाचा अपमान असल्याचे त्यांनी म्हटले. माकपचे राज्य सचिव डॉ. अजित नवले यांनी आपल्या भाषणातून महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचा हमीभाव, शिक्षणाचा वाढता खर्च आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावर सरकारला धारेवर धरले. देशातील कोट्यवधी नागरिकांना अद्याप मोफत धान्यावर अवलंबून राहावे लागत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

रस्ते गुळगुळीत झाले म्हणजे विकास झाला असे सरकार सांगते; मात्र जिवंत माणसाच्या समस्या आजही तशाच आहेत. महागाईने सामान्य जनता होरपळत आहे, शेतकऱ्याला हमीभाव मिळत नाही, तरुण बेरोजगारीने त्रस्त आहेत.अशा परिस्थितीत जनतेनेच आपला खरा राजकीय पर्याय शोधून न्यायासाठी संघर्ष केला पाहिजे, असे डॉ. नवले यांनी सांगितले. संसदीय लोकशाहीत सत्ताधारी पक्षासोबत मजबूत विरोधी पक्षही आवश्यक असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. जनमताचा आदर होत नसल्याचा आरोप करीत लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी जनआंदोलन उभे करण्याचे आवाहन करण्यात आले.

संमेलनाला डॉ. अशोक ढवळे, मरियम ढवळे, आ.विनोद निकोले, डॉ. डी.एल. कराड, डॉ. अजित नवले, अरुण लाटकर, कुमार मोहरमपुरी, राजेश पिंजरकर, रमेशचंद्र दहीवडे, सुभाष पांडे, रमेश सोनुले, अनिल गायकवाड, अमोल मारकवार, राजन गावंडे आणि सचिन रंगारी यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण लाटकर यांनी केले.संचालन व आभार यशवंत झाडे यांनी मानले. राष्ट्रगीताने संमेलनाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणपत मेंढे, रविंद्र हटकर, जगन चांभारे, पंकज पिसुड्डे, शिलानंद बुरबुरे, शंकर पार्लेवार, देवेंद्र शिनगारे, अनंत झाडे, अविनाश जरीले, विनोद तडस, सुरेश अनकर, विनोद अवथळे, अशोक चौधरी, चुडामण घवघवे आदींनी परिश्रम घेतले.

# स्मार्ट' सोलर योजनेला प्रतिसाद; २८ हजार ८८४ ग्राहकांचे अर्ज

## अंदाजपत्रक तयार झालेल्या ग्राहकांनी शुल्क त्वरित भरण्याचे महावितरणचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

घरगुती वीजबिलाचा खर्च कमी करण्याबरोबरच स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देणाऱ्या महावितरणच्या 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप' अर्थात 'स्मार्ट' रूफटॉप सोलर योजनेला नागपूर परिमंडळात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. नागपूर व वर्धा जिल्ह्यांतील एकूण २८ हजार ८८४ ग्राहकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज केले आहेत.

यामध्ये नागपूर जिल्ह्यातील १८ हजार ७ तर वर्धा जिल्ह्यातील १० हजार ८७७ ग्राहकांचा समावेश आहे. प्राप्त अर्जांपैकी १६ हजार ९३२ ग्राहकांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यात नागपूर जिल्ह्यातील ११ हजार २२९ आणि वर्धा जिल्ह्यातील ५ हजार ७०१ ग्राहकांचा समावेश आहे.

या योजनेत ठराविक संख्येपर्यंतच लाभ दिला जाणार असून, प्रथम डिमांड भरणाऱ्या ग्राहकाला प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे अंदाजपत्रक तयार झालेल्या पात्र ग्राहकांनी शुल्क भरण्यास विलंब करू नये, असे आवाहन महावितरणने केले आहे.

निर्धारित संख्या पूर्ण झाल्यानंतर अंदाजपत्रक तयार असूनही शुल्क भरण्याची संधी मिळणार नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले.

सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील सरासरी वीज वापर १०० युनिटपर्यंत असणे या योजनेसाठी आवश्यक आहे. केंद्र व राज्य शासनाच्या ८० ते ९५ टक्क्यांपर्यंतच्या अनुदानामुळे १ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प अत्यल्प खर्चात बसविता येणार आहे.३० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांसाठी २ हजार ५०० रुपये, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी ५ हजार रुपये, तर इतर मागासवर्गीय व सर्वसाधारण प्रवर्गासाठी १० हजार रुपये लाभार्थी हिस्सा निश्चित करण्यात आला आहे.

रूफटॉप सोलरमुळे घरगुती वीज वापराचा खर्च कमी होण्यास मदत होणार असून पर्यावरणपूरक ऊर्जेलाही चालना मिळणार आहे. त्यामुळे पात्र ग्राहकांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी आवश्यक शुल्क त्वरित भरावे, असे महावितरणने आवाहन केले आहे.

# संशयास्पदरीत्या लपून बसल्याने गुन्हा दाखल

**समुद्रपूर-** संशयास्पदरीत्या अंधारात लपून बसलेल्या तरुणाविरुद्ध पोलिसांनी कारवाई करीत गुन्हा दाखल केला. विकास गणवीर (२६, रा. इंदिरानगर झोपडपट्टी) असे संबंधित तरुणाचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, विकास गणवीर हा परिसरात अंधाराचा फायदा घेत लपून बसला होता. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याची चौकशी केली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये कारवाई केली. या प्रकरणी समुद्रपूर पोलिस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. संशयास्पद हालचालींवर पोलिसांकडून लक्ष ठेवले जात असून, रात्रीच्या वेळी गस्त वाढविण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील संशयितांमध्ये खळबळ उडाली आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# कर्तव्याच्या रस्त्यावर ३५ वर्षांची अविरत सेवा

## एएसआय विजय कोपरकर यांना निरोप




**वर्धा/जनमाध्यम**

पोलीस दलातील प्रदीर्घ आणि कर्तव्यनिष्ठ सेवेनंतर सहाय्यक फौजदार विजय कोपरकर हे सोमवार,३१ ऑगस्ट रोजी सेवानिवृत्त झाले. वाहतूक नियंत्रण शाखेत अनेक वर्षे कार्यरत राहून शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी त्यांनी बजावलेल्या सेवेला यावेळी भावपूर्ण निरोप देण्यात आला.पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या हस्ते विजय कोपरकर यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रदीर्घ सेवाकाळात विविध जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांनी शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठेला नेहमीच प्राधान्य दिले. कार्यरत असताना समन्वय साधत वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.सेवानिवृत्ती हा सेवेला पूर्णविराम नसून आयुष्याच्या नव्या पर्वाची सुरुवात असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. सहकाऱ्यांनी त्यांच्या सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. दीर्घकाळ वर्दीत राहून शहराच्या वाहतुकीला शिस्त लावणाऱ्या कोपरकर यांच्या सेवानिवृत्तीने सहकाऱ्यांच्या डोळ्यांत आठवणींचा ओलावा दाटला.

# ज्ञानेश्वरी दीदींच्या भक्तिरसात रंगणार महाराष्ट्र

## श्रीमद् भागवत कथेचा 'झी टॉकीज'वरून जागर

**आर्वी/जनमाध्यम**

आर्वीची कन्या आणि प्रसिद्ध कथा प्रवक्त्या श्री. ज्ञानेश्वरी दीदी यांच्या ओघवत्या वाणीतून साकारलेली श्रीमद् भागवत कथा आता 'झी टॉकीज' वाहिनीवरून महाराष्ट्रभरातील भाविकांना अनुभवता येणार आहे. 'गजर कीर्तनाचा, सोहळा आनंदाचा' या कार्यक्रमांतर्गत आज १ सप्टेंबर ते १० सप्टेंबर २०२६ दरम्यान दररोज सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत या भक्तिमय कथेचे प्रसारण होणार आहे.



ज्ञानेश्वरी दीदी यांच्या प्रभावी कथनातून श्रीमद् भागवताचा आध्यात्मिक संदेश भाविकांपर्यंत पोहोचणार असून, आर्वीचे गायक दिनेशदास महाराज यादव यांची संगीत साथ या कथेला लाभणार आहे. परमपूज्य आत्मा मालिक संत ब्रह्मानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र अंबवडे-सं. वाघोली, जि. सातारा यांच्या वतीने या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.आर्वीच्या लेकीच्या मुखातून उमटणारी भागवताची अमृतवाणी दूरचित्रवाणीच्या माध्यमातून घराघरांत पोहोचणार असल्याने आर्वीकरांसह भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या ज्ञानमय आणि भक्तिमय कथेचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वैज्ञानिक दृष्टिकोन नाकारला; प्रश्नांचा भडका

## राज्यकर्त्यांच्या नियोजनशून्य धोरणांवर गजेंद्र सुरकार यांचा घणाघात

**वर्धा/जनमाध्यम**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात सर्व साधने उपलब्ध असतानाही आरोग्य, शिक्षण, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या, पर्यावरण, पाणी आणि कचरा व्यवस्थापन यांसारख्या समस्या सुटलेल्या नाहीत. योग्य नियोजनाचा अभाव आणि वैज्ञानिक दृष्टिकोन न स्वीकारल्यामुळेच या प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केले आहे, असा घणाघात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केला.



संत तुकडोजी महाराज माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी वैज्ञानिक दृष्टिकोनावर मार्गदर्शन आणि चमत्कार सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सुरकार म्हणाले, प्रत्येक घटनेमागे कार्यकारणभाव असतो. निरीक्षण, तर्क, अनुमान आणि प्रयोगाच्या आधारे सत्य तपासूनच ते स्वीकारले पाहिजे. 'जेवढा पुरावा, तेवढाच विश्वास' हा वैज्ञानिक दृष्टिकोनाचा मूलमंत्र आहे.

पावसाचे पाणी योग्य पद्धतीने साठविले आणि जमिनीत मुरविले तर पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो. मात्र नियोजनाअभावी अतिवृष्टीचे पाणी समुद्रात वाहून जाते आणि दुसरीकडे दुष्काळात पावसासाठी पूजा, यज्ञ, कर्मकांड केले जातात, ही विसंगती त्यांनी अधोरेखित केली. आरोग्य व शिक्षण व्यवस्थेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. रुग्णालये असून डॉक्टर नाहीत, डॉक्टर असून यंत्रसामग्री व औषधे नाहीत, अशी परिस्थिती अनेक ठिकाणी आहे. बेरोजगारी वाढत असताना मराठी शाळाही बंद पडत आहेत. मूलभूत प्रश्नांऐवजी अनुत्पादक कामांवर कोट्यवधी रुपये खर्च होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.यानंतर विविध चमत्कारांचे सादरीकरण करून बुवाबाजीमागील हातचलाखी आणि फसवणुकीचे तंत्र विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविण्यात आले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक अजय उमरकर, दिपाली मालपे, दिलीप गुळघाणे, राजेश कांबळे, कोरडे आदी उपस्थित होते. संचालन दिपाली मालपे यांनी तर आभार दिलीप गुळघाणे यांनी मानले.

# पिलियाने व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू

**वर्धा-** पिलिया आजारावर उपचार सुरू असताना एका व्यक्तीचा रुग्णालयात मृत्यू झाला. ही घटना कस्तुरबा रुग्णालयात घडली. मंगेश मधुकर निवल (४७, रा. भिवापूर) असे मृताचे नाव आहे. काही दिवसांपासून मंगेश निवल यांच्यावर कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान प्रकृती खालावल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी रुग्णालयात जाऊन आवश्यक माहिती घेतली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)


**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७५**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पावसाने दडी मारल्याने दर्यापूरातील बाजारपेठा पडल्या ओस

## आर्थिक मंदीचे सावट, शेतकऱ्यांच्या खरेदीला ब्रेक,व्यापाऱ्यांची चिंता वाढली.

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील बाजारपेठांवर सध्या पावसाच्या खंडाचे सावट स्पष्टपणे जाणवत असून, बाजारपेठेतील नेहमीची रेलचेल हरविली आहे.एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याचा थेट परिणाम दर्यापूर शहरातील व्यापार-व्यवसायावर होत आहे.



यंदाच्या पावसाळ्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप पिकांची वाढ खुंटली आहे. अनेक भागातील शेतकरी पिकांच्या भवितव्याबाबत चिंतेत असून, शेतीवरील खर्च वाढत असतानाच उत्पन्नाची शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांकडून दैनंदिन गरजेच्या वस्तू व इतर खरेदीवरही मोठ्या प्रमाणात काटकसर केली जात आहे.

दर्यापूर शहरातील कपडे, किराणा, कृषी साहित्य, इलेक्ट्रॉनिक्स, हॉटेल व्यवसाय तसेच विविध छोट्या-मोठ्या दुकानदारांच्या उलाढालीवर त्याचा परिणाम जाणवत आहे. पूर्वी सकाळपासून गजबजलेल्या बाजारपेठांमध्ये आता ग्राहकांची संख्या कमी झाल्याचे चित्र दिसत आहे. सण-उत्सवांच्या काळातही अपेक्षित ग्राहकवर्ग बाजारात फिरकत नसल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला तरच बाजारपेठेला चालना मिळते, मात्र पावसाने पाठ फिरवल्याने शेतीचे अर्थचक्रच विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामिण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असलेल्या दर्यापूरच्या बाजारपेठेलाही आर्थिक मंदीचा फटका बसत आहे.

पावसाची प्रतिक्षा आता केवळ शेतकऱ्यांनाच नाही, तर व्यापारी, दुकानदार, छोटे व्यावसायिक आणि बाजारपेठेशी निगडित प्रत्येक घटकाला लागली आहे. दमदार पाऊस होऊन पिकांना जिवदान मिळावे आणि पुन्हा बाजारपेठेत ग्राहकांची गर्दी वाढावी, अशी अपेक्षा व्यापारीवर्गाकडून व्यक्त होत आहे.

# ग्रामीण भागात कलम ३७ (१) व (३) लागू

अमरावती : जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. १ सप्टेंबर २०२६ ते १५ सप्टेंबर २०२६ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

सक्सेशन क्र.१६७२/२०२६ चौ.ता.२८.०९.२०२६

**अर्जदार ः**
1. Gajanan S/o Achyut Patkar, Aged about 81 Yrs. Occu.: Retired R/o 49, Rushikesh, Ganediwal Layout, Near Commissioner Gate, Camp, Amravati
2. Vijaya Madhukar Purohit, Aged about 84 Yrs. Occu.:Household R/o Mangalmurti Co-op Society Ltd.Old Agra Road Kalyan Dist.Thane
3. Sujata Shashikant Wakankar, Aged 78 Yrs. Occu.: Household R/o Atharva Ganga Nagar, Sur.No.51, A/p Neral Tq.Karjat, Dist.Raigad
4. Vandana Vilas Katre, Aged 74 Yrs. Occu.: Household R/o Atharva Ganga Nagar, Sur.No.51, A/p Neral Tq.Karjat, Dist.Raigad
5. Namrata Mohan Purohit, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Vanashri Vishram Bagh, Opp.Open Natya Hall A/p Sangli Tq.Dist.Sangli

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालायात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **अच्युत रामकृष्ण पाटकर** यांचे निधन दिनांक **२६.०१.१९९६** रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, ह्याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७४३/२०२६
**छाया व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Smt.Chaya Devidas Isokar, Age 74 Yrs. Occu.: Household
2. Ravikant Devidas Isokar, Age 38 Yrs. Occu.: Service Both R/o Gadge Nagar, Behind the Poonam Photo Studio, Amravati.
3. Sau.Shubhangi Kirtikumar Wane, Age 43 Yrs. Occu.: Household R/o Plot No.39-B, B.S.28/2 Line No.1, Gajraj Nagar, Besides Vidarbha Premium Old Bye-pass Road, Amravati.
4. Shashikant Devidas Isokar, Age 49 Yrs. Occu.: Service
5. Shivkant Devidas Isokar, Age 45 Yrs. Occu.: Service Both 4 & 5 R/o Flat No.705, 7th Floor, B-Wing 26/1 Yashodapuram Sainath Nagar, Pimpale Gurav Haveli, Dist.Pune
6. Shrikant Devidas Isokar, (Now Deceased Hence through his Lrs.)
   6a) Smt.Pallavi Shrikant Isokar, Age 42 Yrs. Occu.: Household
   6b) Sanket Shrikant Isokar, Age 20 Yrs. Occu.: Education
   Both R/o Gadge Nagar, Behind Poonam Photo Studio, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत देविदासराव तोताराम इसोकार व विजया देविदास इसोकार** हे अनुकमे दिनांक 28.07.2011 व 28.06.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **छाया व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **छाया व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७६६/२०२६
Shalini Nareshrao Dhole+2 **-वि- निरंक**
पुढील ता.०९.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Shalini Nareshrao Dhole, Age 56 Yrs. Occu.: Household R/o Near School No.1, Jumi Kotwali, Amravati.
2. Bharti Atulrao Jaware, Age 37 Yrs. Occu.: Household R/o Shivaji Chowk, Ward No.2, Mahuli Jahangir, Tq.Dist.Amravati.
3. Pragati Dinesh Shirbhate, Age 38 Yrs. Occu.: Household R/o Mahatma Fule Chowk, Near Khandelwal Petrol Pump, Mu.Po.Warud, Tq.Warud Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Naresh Shriramji Dhole हे दिनांक 30.06.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shalini Nareshrao Dhole + 2 Versus Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shalini Nareshrao Dhole + 2 Versus Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२३८/२०२६** **ने.ता.०१.१०.२०२६**

**१. दामोधर नागोराव चव्हाण**
**२. विजय दामोधर चव्हाण**
दोन्ही रा.सावंगा गुरव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
**३. संध्या विष्णु कदम**
रा.वाघापुर रोड, चितीकर लेआउट, यवतमाळ, जि.यवतमाळ
**४. मिना शरद खंडागळे**
रा.जुना बायपास लॉर्डस हॉटेल जवळ, अमरावती, जि.अमरावती
**५. रजनी सुनील घुले**
रा.आशीर्वाद कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं. १४, चिंचवडगांव, पुणे, जि.पुणे
**६. उमेश दामोधर चव्हाण**
रा.सावंगा गुरव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत निर्मला दामोधर चव्हाण** यांचा **मृत्यू दि.१४.०५.२०२१** मध्ये **झेनिथ हॉस्पिटल, अमरावती, जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ हा पती असून अर्जदार क्र.२ व ६ ही मुले व अर्जदार क्र.३ ते ५ ह्या मुली आहेत.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि. २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक २९ ऑगस्ट, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६३५/२०२६
**प्रेमा व ईतर -वि- पद्मा व ईतर**
पुढील ता.१७.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Sau.Prema Vinod Tiwari, Age 60 Yrs. Occu.: Housewife R/o Gitanagar Near Gajanan Vatika Akola, Tq.Dist.Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः**
1. Padma Mahesh Tiwari, Age 68 Yrs. Occu.: Household R/o Professor Colony, Behind Ziri Mandir, New Town, Badnera, Dist.Amt.
2. Mohan Madanlal Joshi, Age 65 Yrs. Occu.: Agriculturist R/o Mehadiya Chowk Dhantoli Nagpur, Tq.Dist.Nagpur
3. Prakash Madanlal Joshi, Age 63 Yrs. Occu.: Agriculturist
4. Jagdish Madanlal JOshi, Age 58 Yrs. Occu.: Agriculturist
5. Narendra Madanlal Joshi, Age 56 Yrs. Occu.: Agriculturist All 3 to 5 R/o Joshi Provisions Opp.Co-operative Bank, New Town Badnera, Tq.Dist.Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मदनलाल रामदेवजी जोशी आणि उमा मदनलाल जोशी** हे अनुकमे दिनांक 10.09.2022 व 05.10.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रेमा विरुध्द पद्मा व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रेमा विरुध्द पद्मा व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७६०/२०२६
**राजकुमार रविशंकर तिवारी -वि- निरंक**
पुढील ता.०८.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः** १. राजकुमार रविशंकर तिवारी, वय ५९ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.व्ही.एम.व्ही.रोड, पाध्ये गार्डन जवळ, हॉलीवूड कॉलनी, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रविशंकर प्रभुदयाल तिवारी** यांचे दिनांक **२१.०६.२०१८** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार राजकुमार रविशंकर तिवारी विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजकुमार रविशंकर तिवारी विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७७८/२०२६**
**Lilabai Bharatlalji Gupta + 4 Versus NIL**
**पुढील ता.१२.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**Applicants**
1. **Lilabai Bharatlalji Gupta,** Aged 67 years. Occu.: Household, R/o. Behind Kadbi Bazar, Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
2. **Nitesh Bharatlalji Gupta,** Aged 52 years. Occu.: Business R/o. Behind Kadbi Bazar, Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
3. **Arvind Bharatlalji Gupta,** Aged 47 years. Occu.: Business R/o.Behind Kadbi Bazar,Gawallipura,Amravati, Tq. & Dist.Amravati
4. **Shelendra Bharatlalji Gupta,** Aged 49 years, Occu.: Business R/o.Behind Kadbi Bazar,Gawallipura, Amravati, Tq. & Dist.Amravati
5. **Roshni Shivkumar Sahu,** Aged 51 years, Occu.: Household R/o. Chetandas Bagicha, Ratanganj, Tq. & Dist.Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Bharatlal Ambadas Gupta** हे दि. १९.०५.२०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Bharatlal Ambadas Gupta+4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Bharatlal Ambadas Gupta+4 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**जाहीर नोटीस**

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.४०२/२०२६ ने.ता.०१.१०.२०२६

**अर्जदार ः**
१. छाया देवकुमार खांडेकर, वय ४९ धंदा - मजुरी
रा.दाताळा, पो.भटोरी, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला
२. संध्या रमेशराव सदांशिव उर्फ संध्या रविंद्र धंदर (लग्नानंतरचे नांव) वय ४४ धंदा - नोकरी
रा.गोखले लेआऊट पवन नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३. नंदकिशोर रमेशराव सदांशिव, वय ४२ धंदा - मजुरी
रा.आसेगांव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. हर्षवर्धन रमेश सदांशिव, वय ४० धंदा - मजुरी
रा.आसेगांव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक रमेशराव आकारामजी सदांशिव** यांचा मृत्यू दिनांक **३०.११.२००७** रोजी आसेगांव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच **मृतक सुमित्रा रमेशराव सदांशिव** ही दि.०८.११.२०१५ रोजी जयसियाराम नगर, अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४०२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२५.०८.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**.डी.बी.गुल्हाने**
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/.../येवती/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

ज्याअर्थी मौजा येवती शेत सर्व्हे नं.१०/२ क्षेत्र १.२१ हे.आर आकार रु.५.६१ या शेताचे ७/१२ वरील इतर अधिकारातील वहिवाटदार यांचे नांवे कमी करणेबाबत अर्जदार **शारदा राजेंद्र कातडे,** रा.इत्तमगांव, ता.वरुड यांनी या कार्यालयात प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी या प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत गैरअर्जदार किंवा त्यांचे वतीने उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे. अन्यथा सदर प्रकरणात एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक ३१.०८.२०२६

शिक्का
**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५४/२०२६
Mr.Swapnil Prakash Jagtap+3 **-वि- निरंक**
पुढील ता.०७.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Mr.Swapnil Prakash Jagtap, Age 49 Yrs. Occu.: Service R/o Flat No.502, Building-D, Bhansali Campus, Shrihagad Road, Near Shrihagad Institute, Wadgaon Bk.Pune
2. Smt.Kanchan Prakash Jagtap, Age 75 Yrs. Occu.: Nil R/o Bypass Road Near Church Old Biyani Square Camp, Amravati
3. Mrs.Shweta Uday Tekade, Age 47 Yrs. Occu.: Service R/o 15, Appaswami Colony, Akola Road, Akot, Dist.Akola
4. Mrs.Kirti Prashant Nerkar, Age 50 Yrs. Occu.: Service R/o Near Jagtap Public School, 301, Sarju Appt. No.3, Sarju Town Wathoda Ring Road, Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Prakash Khushalrao Jagtap हे दिनांक 14.01.1988 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Mr.Swapnil Prakash Jagtap + 3 Versus Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Mr.Swapnil Prakash Jagtap + 3 Versus Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१७१६/२०२६**
**Chandrashekhar Madhusudan Jagdale+ 1 Versus NIL**
**पुढील ता.०५.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. **Mira Sitaramsingh Chavhan** Aged 76 years. Occu.: Household, R/o. Sujata Kale, Moti Nagar, Near Moti Bag, Amravati Tq. & Dist.Amravati
2. **Udaysingh Sitaramsingh Chavhan** Aged 50 years. Occu.: Service, Near Moti Bag, Amravati, Tq. & Dist.Amravati
3. **Nirmala Pramodsing Gahlod** Aged 48 years, Occu.: Household Near Moti Bag, Amravati, Tq. & Dist.Amravati
4. **Umaben Jashavatbhai Gehalot,** Aged 47 years, Occu.: Household R/o. 29/2. Sai Flat, Near Navrang School, Ambika Nagar Road, Odhav, Ahmedabad, Dist. Ahmedabad, State Gujrat
5. **Shobha Ashoksingh Gujar,** Aged 46 years, Occu.: Household R/o. Near Mahajan Garage, 277, Itwari Nehru Putla, Nagpur Tq. & Dist. Nagpur
6. **Usha Mahesh Nalwade,** Aged 44 years, Occu.: Service R/o. Tanaji Square, Hamalpura, Yash Dhanya Bhandar, Amravati, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सीताराम सिंग भुरा सिंग चव्हाण** हे ०८.०५.२०२१ रोजी रहाटगांव, ता.जि. अमरावती येथे मयत झाले. **मिरा अधिक पाच विरुध्द निरंक यांनी** वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मिरा अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**प्रो.नं. /२०२६**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**
**दि.२९.०८.२०२६**

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
ए.एम.जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांचे न्यायालयात
किरकोळ अर्ज क्र./३५७/२०२६ दिनांक ०३.१०.२०२६

**जाहीर नोटीस**

**अर्जदार -**
१. प्रशांत नारायण जांगळे (जांगडे), वय ५० वर्षे, धंदा - नोकरी
२. रुद्र प्रशांत जांगळे, वय १३ वर्षे, धंदा - अज्ञान
३. आदित्य प्रशांत जांगळे, वय ०८ वर्षे, धंदा - अज्ञान
अ.नं.२ व ३ अज्ञान अ.पा.क.वडील प्रशांत नारायण जांगळे
सर्व रा.उदासा, ता.उमरेड, जि.नागपूर

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **उमा प्रशांत जांगळे** हे दिनांक **२७.११.२०२४** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **उमा प्रशांत जांगळे** यांचे नांवे मौजा दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन क.१२८५, शिट नं.४३, क्षेत्र १७०.७० व मौजा दर्यापूर ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नगर भूमापन क.१२८८, शिट नं.४३, प्लॉट नं.१२८८, क्षेत्र १५९.५० व चौ.मी. यामध्ये सामाईकात हिस्सा आहे. त्यांच्या हिश्याची बाजारभाव किंमत रु.१०,०००/- आहे.

आज दि.**२९.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८१९/२०२६
**शांताबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०७.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Shantabai Ramesh Killewale, Age 63 Yrs. Occu.: Household
2. Pankaj Rameshji Killewale, Age 40 Yrs. Occu.: Labour Both R/o Near 14 No.A.M.C.School, Wadali, Amravati.
3. Kundan Ramesh Killewale, Age 37 Yrs. Occu.: Labour R/o Wadali Naka Near Devi Nagar, Amravati
4. Rekha Raoji Dhote, Age 48 Yrs. Occu.: Household R/o Near Amar Shumar Kooku Factory, Gaulipura, Amravati.
5. Aruna Sanjay Bhawarekar, Age 44 Yrs. Occu.: Household R/o Lane No.8, Near Hanuman Temple, Kalyan Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश हिरालालजी किल्लेवाले** हे दिनांक 21.04.2005 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शांताबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शांताबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७३१/२०२६
Punam Kundan Ghoyar+1 Versus Nil
पुढील ता.०६.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार ः**
1. Punam Kundan Goyar, Age 50 Yrs. Occu.: Home maker
2. Dipali Kundan Goyar, Age 28 Yrs. Occu.: Labour Both R/o Near Meherbaba Colony, Jevad Nagar, Rukhmini Nagar, Amt.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार ः** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Kundan Bhaulal Goyar हे दिनांक 15.04.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Punam Kundan Goyar + 1 Versus Nil यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Punam Kundan Goyar + 1 Versus Nil वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**जाहीर नोटीस**

माझी पक्षकार ः- **सोनाली अरविंद मिश्रा, गल्ली नं. ७,यशोदा नगरी २ अमरावती** यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आम जनतेस जाहीर नोटीस प्रेषित करतो ती येणेप्रमाणे ः- **माझे पक्षकाराने विश्वभारती रोशन कांबळे** यांच्याशी खालील वर्णन केलेला ज्याचे **वर्णन खालीलप्रमाणे**

नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरी क्र.२ च्या कक्षेतील व मनपा अमरावतीच्या हददीतील **मौजे -बेनोडा, प्रगणे- नांदगाव पेठ,** ता.जि.अमरावती येथील **शेत सर्वे नं.२२** मधील **७.०० एकर** जमिनीतील ज्याचा **रे.के.नं.एन.ए.पी-३४/बेनोडा-२४/१९८२-८३ नि.ता. ०३/१२/१९८२** नुसार लेआउट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील **प्लॉट क्र.५६ (छपन्न)** याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे क्षेत्रफळ **२४३.९५ चौ.मी. (२६२५ चौ.फुट)** आहे.या पैकी विक्रेताच्या ताब्यातील उत्तर दक्षिण-वाटणीचा पश्चिमेकडील भाग भाग याची साईज **उत्तर-दक्षिण-बाजू १९ फुट, पूर्व-पश्चिम बाजू ५१.५ फुट असून याचे क्षेत्रफळ ९०.९३ चौ.मी. (९७८.५ चौ.फुट) आहे.** या प्लॉटची **चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.**

**पुर्वेस - हयाच प्लॉट मधला उर्वरित भाग**
**पश्चिमेस - प्लॉट नं.५६ मधील श्री जलान यांचा भाग**
**उत्तरेस - प्लॉट नं.५६ चा उर्वरित भाग**
**दक्षिणेस - लेआउट मधील डी.पी. रोड**

**येणेप्रमाणे** वरील वर्णन केलेला **चर्तुसिमेच्या** आतील खुला प्लॉट चा सौदा माझे पक्षकाराने केला असून रितसर ईसारचिठ्ठी करुन घेतली आहे. विकत घेण्याचा करार केलेला असून याबाबत लवकरच माझे खरेदीखत नोंदविणार आहे. याबाबत कोणाचाही हक्क अधिकार गहाण कर्ज, बोजा, बक्षिस, इजमेंट्री हक्क ताबा सौदा चिठ्ठी इसारचिठ्ठी करारनामा किंवा कोणतेही बॅक व वित्तीय संस्थेचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष घेतलेली रक्कम सावकारी कर्ज नाही तसेच वरील वर्णन केलेल्या खुल्या प्लॉट चा कोणत्या कोर्टात वाद प्रलंबित नाही. तसेच वारसाची भानगड नाही. ही सूचना प्रसिध्दी झाल्याच्या तारखेपासून **७** दिवसाच्या आत कळविण्यात यावे खालील पत्यावर कागदपत्रांसह संपर्क साधावा करीता सदरची जाहीर नोटीस सादर.

अमरावती आज दिनांक ३०.०८.२०२६

**सही/-**
**(ॲड.एस.एस.श्रीखंडे )**
**जिवन छाया कॉलनी, अमरावती**
**मो.९४०३३१०८९९**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३५५**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

संक्षिप्त



## टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

**अंजनगाव बारी-**बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलमध्ये मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.प्राचार्य अजय चौबे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी विद्यार्थ्यांना ध्यानचंद यांच्या क्रीडा कारकिर्दीची व योगदानाची माहिती देण्यात आली.विद्यार्थ्यांसाठी धावणे, ?थलेटिक्स रिले, कोन बॅलन्स व क्रिकेट आदी विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. खेळामुळे शारीरिक आरोग्यासोबतच शिस्त, मानसिक विकास व सांघिक भावना विकसित होते,असे प्राचार्यांनी सांगितले.विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमासाठी शारीरिक शिक्षक निलेश फुलउंबरकर,जफर खान यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामसभा चटवाबोडचा श्रमदानातून वृक्ष लागवडीचा उपक्रम

**धारणी-**सामूहिक वनहक्क व्यवस्थापनांतर्गत ग्रामसभा चटवाबोड यांच्या पुढाकारातून सामूहिक वनहक्क प्राप्त वनखंड क्रमांक ७०५ मध्ये श्रमदानातून ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. वनसंवर्धन आणि वनसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.या उपक्रमाची प्रेरणा ग्रामसभा रंगबेली येथून मिळाली. सामूहिक वनहक्क व्यवस्थापनांतर्गत ग्रामसभा रंगुबेलीने मागील वर्षी वनखंड वापर क्रमांक ५६६ मधून बांबूची कापणी (हार्वेस्टिंग) केली होती. वनसंपत्तीचा करण्याबरोबरच तिचे संवर्धन, पुनर्लागवड आणि शाश्वत व्यवस्थापन करणे आवश्यक आहे, असा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामसभेने घेतला.या निर्णयाची अंमलबजावणी करत ग्रामसभा रंगुबेलीने सोसोखेडा ग्रामसभेकडून ५०० बांबूची रोपे उपलब्ध करून घेत श्रमदानातून बांबूची लागवड केली होती. या उपक्रमातून प्रेरणा घेत ग्रामसभा चटवाबोडनेही आपल्या सामूहिक वनहक्क क्षेत्रात वृक्ष लागवडीचा उपक्रम हाती घेतला.वृक्ष लागवड कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांनी सामूहिक श्रमदान करत वनक्षेत्रात ५०० रोपांची लागवड केली. या उपक्रमातून वनसंपत्तीचा वापर आणि संवर्धन यांचा समतोल राखत सामूहिक वनहक्क क्षेत्राचे शाश्वत व्यवस्थापन करण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष रघुलाल कस्देकर, ग्रामस्थ तसेच संबंधित टीम उपस्थित होती.

## बाळूमामांच्या पालखीचा भक्तिमय सोहळा

**अंजनगाव बारी-** येथे धनगर समाजाचे आराध्यदैवत श्री



बाळूमामांची पालखी मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात संपूर्ण गावातून काढण्यात आली. ठिकठिकाणी भाविकांनी पालखीचे स्वागत केले. ढोल-ताशांचा गजर, जयघोष आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.पालखी सोहळ्यात सहभागी भाविकांच्या सेवेसाठी गावातील युवकांनी पुढाकार घेत पोहे व चहाचे वाटप केले. पालखी मार्गावर भाविकांना अल्पोपहार देत युवकांनी सेवा बजावली. या सेवाभावी उपक्रमाचे भाविक व नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. या उपक्रमात गोपाल शेवतकर, अजय जुमळे, निलेश चांदुरे, अक्षय बारबुद्धे,रोशन गभणे, दिपाली मलवार, अमोल येरण,गोपाल हटवार, रोशन पुनिया, अक्षय वाईकर, निखिल नवखरे, पवन पवार, प्रतीक न्यायखोरे, पंकज ढोबरे, रोशन जुमळे, मंगेश गोदे, प्रशांत माहेकर,जयता आखरे, निखिल धुर्वे,जयश ठाकूर, पिंटूभाऊ भस्मे, कुणाल दारोकार, देवा न्यायखोरे, सुरेश धुर्वे, अतुल कारमोरे, बंडू बोन्डे, शशांक नवखरे, गजानन पाटील,प्रवीण तलमले व रुपेश भुरे यांच्यासह अनेक युवक सहभागी झाले.

## फेस्कॉम अधिवेशनात प्रा.अशोक सारडा व राजेगावकर सन्मानित

**मेहकर-**महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ(फेस्कॉम) मुंबई संलग्नित प्रादेशिक विभाग बुलढाणाचे अधिवेशन व आमसभा ३० ऑगस्टला गर्दे वाचनालय बुलढाणा येथे पार पडले. सभेच्या अध्यक्षस्थानी विभागिय अध्यक्ष अशोक खेडेकर,तर उदघाटक वप्रमुख उपस्थितीत अशोक तेरेकर, प्रकाश पिंपरकर,विवेक देशपांडे,दत्तात्रय चौधरी, नाना इंगळे, उदय देशपांडे आदी होते.कार्यक्रमात तडकाकार प्रा.अशोक सारडा,अध्यक्ष बालाजी जेष्ठ नागरिक संघ मेहकर यांचा उत्कृष्ठ कार्यकर्ता व संघटन सचिव रामदास राजेगावकर यांना उत्कृष्ठ संघटक म्हणून शाल श्रीफळ सन्मानचिन्ह,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

## गाजर गवत निर्मूलन जनजागृती सप्ताह

**धामणगाव रेल्वे-**श्रीसंत शंकर महाराज कृषी महाविद्यालयात गाजर गवत निर्मूलन सप्ताह विविध उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. सप्ताहात आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात प्रा. कुणाल गावंडे यांनी गाजर गवतबद्दल माहिती, रासायनिक व जैविक व्यवस्थानाच्या विविध पद्धती, मानवावर गाजर गवताचे होणारे दुष्परिणाम व उपाययोजना याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. दीपक बोंद्रे, प्रा. कुणाल गावंडे, प्रा. राजश्री भस्मे व प्राचार्य डॉ. शरद नायक यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिसरातील गाजर गवताचे निर्मूलन केले. सदर गाजर गवतापासून कंपोस्ट खत कसे तयार करता येईल, या संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष नंदू चव्हाण, महादेव शिवणकर, ॲड. प्रकाशराव देशमुख, प्राचार्य डॉ. शरद नायक यांचे सहकार्य लाभले.

# पीएम सूर्यघर योजनेमुळे सौर क्रांती

## जिल्ह्यातील ४३ हजार वीज ग्राहकांच्या घरांवर होत आहे १७१ मेगावॅट वीज निर्मिती

**अमरावती/का.प्र.**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला अमरावती जिल्ह्यात उत्तम प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्याची वाटचाल सौर क्रांतिच्या दिशेन होत आहे. जिल्ह्यातील ४३ हजार १४८ वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेत घराच्या छतावर सौर प्रकल्प बसविला असून या प्रकल्पाच्या माध्यमातून १७१ मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. अशी माहिती अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी दिली आहे.

दरमहा तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे यासाठी केंद्र सरकारने ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेत अमरावती जिल्ह्याअंतर्गत महावितरणच्या अचलपूर विभागात ७ हजार ८८८ ग्राहकांनी ३०.५० मेगावॅट, अमरावती ग्रामीण विभागातील ५ हजार ३३९ ग्राहकांनी २०.२५ मेगावॅट, मोर्शी विभागातील ५ हजार ९९९ ग्राहकांनी २३.३० मेगावॅट आणि अमरावती शहरातील २३ हजार ९४२ ग्राहकांनी ९६.९७२ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा संच घराच्या छतावर उभारले आहेत.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत



केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे संच बसवणाऱ्या वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या संचासाठी ७८ हजार रुपये अनुदान मिळते. एक किलोवॅटच्या सौर यंत्रणेतून दरमहा सुमारे १२० युनिट वीज तयार होते. गरजेपेक्षा जास्त वीज तयार झाल्यामुळे वीजबिल जवळपास शून्य होते तसेच अतिरिक्त निर्माण झालेली वीज, विजबिलात समायोजित करण्यात येते.

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला प्रोत्साहन देण्यासाठी ग्राहकांना लागणारे सोलर नेट मीटर महावितरणकडून विनामूल्य पुरवण्यात येत आहेत. त्यामुळे ग्राहकांचे पैसे वाचण्यासोबत त्यांना मोबाईल फोनवरच वीजनिर्मिती, वीज वापर, अतिरिक्त युनिट इत्यादी माहिती दररोज मिळते. त्यानुसार त्यांना वीजबिल कमी करण्यासाठी नियोजन करता येत आहे.

घरांच्या छतावर सौर यंत्रणा बसवून वीज ग्राहकांना आपले वीजबिल शुन्यापर्यंत कमी करता येते,प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांनाwww.pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. तसेच वीज ग्राहकांना महावितरणकडून संपूर्ण सहकार्य करण्यात येणार.

**दिलीप दोडके,**
मुख्य अभियंता
महावितरण अमरावती परिमंडळ

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राहकांना www.pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर नोंदणी करावी लागते. महावितरण ही या योजनेची अंमलबजावणी करणारी राज्यातील नोडल एजन्सी आहे. महावितरणने यासाठी एक स्वतंत्र पोर्टल तयार केले आहे. त्यामुळे वीज ग्राहकांना व पुरवठादारांना महावितरणच्या कार्यालयात येण्याची आवश्यकता राहत नाही. नोंदणी केल्यापासून अंतिम मंजुरीनंतर प्रकल्प सुरू करेपर्यंत 'फेसलेस' व 'पेपरलेस' पद्धतीने काम चालू राहते. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत गतिमानता आली आहे.

## शेत जमिन अद्यापही तहानलेलीच,पावसाने पाठ फिरविली

### पिकांची वाढ खुंटली, शेतकरी आर्थिक संकटात

**खल्लार/वार्ताहर**

यंदाचा पावसाळा शेतकऱ्यांसाठी मोठी चिंता निर्माण करणारा ठरत आहे. गेल्या अनेक वर्षांच्या तुलनेत यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प असून पावसाळ्याचा मोठा कालावधी उलटूनही समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे परिसरातील शेत जमिन अद्यापही तहानलेलीच असून, पिकांच्या वाढीवर त्याचा गंभीर परिणाम झाला आहे.

पावसाअभावी खरीप हंगामातील पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके कोमेजण्याच्या मार्गावर आहेत. सुरुवातीला पावसाच्या आशेवर शेतकऱ्यांनी महागडी बियाणे, खते, औषधे आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र, त्यानंतर अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या आशेवरच पाणी फिरण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांचे संपूर्ण पिक नियोजन कोलमडले आहे. आधीच वाढलेला उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि त्यात पावसाची अनिश्चितता यामुळे शेतकरी चारही बाजूंनी आर्थिक संकटात सापडला आहे. पिके वाचवण्यासाठी उपलब्ध पाण्याचा वापर करण्याचा प्रयत्न होत असला तरी अनेक शेतकऱ्यांकडे सिंचनाची पुरेशी सुविधा नसल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचे प्रत्येक निवडणुकीत सांगितले जाते. मात्र, संकटाच्या काळात त्याच शेतकऱ्याला मदतीसाठी शासनाच्या दारात उभे राहावे लागत असल्याची खंत शेतकरी व्यक्त करत आहेत. निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आश्वासने देण्याऐवजी सध्याच्या संकटाच्या काळात तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पावसाची आस लागलेल्या शेतकऱ्यांना आता केवळ आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीची गरज आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# अमरावतीच्या १६७ वर्षांच्या वारशावर आघात?

## ऐतिहासिक रेल्वे स्टेशन पाडण्याची तयारी; परवानगी कोणी दिली, नागरिकांचा सवाल

**अमरावती/का.प्र.**

अमरावतीच्या ऐतिहासिक ओळखीचे प्रतीक असलेले आणि ब्रिटिशकालीन स्थापत्यकलेचा वारसा जपणारे सुमारे १६७ वर्षे जुने रेल्वे स्टेशन आता अस्तित्वाच्या संकटात सापडले आहे. राज्य सरकारच्या वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट असलेल्या या ऐतिहासिक वास्तूच्या पाडकामाची तयारी सुरू झाल्याने नागरिक आणि इतिहासप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

विशेष म्हणजे, अमरावती आणि बडनेरा शहरांतील ऐतिहासिक वास्तू, इमारती व स्थळांचा वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये जुन्या रेल्वे स्टेशनचाही समावेश असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या वास्तूच्या पाडकामाला नेमकी परवानगी कोणी दिली, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### १८५९ मध्ये सुरू झाला ऐतिहासिक प्रवास

अमरावती रेल्वे स्टेशनचा इतिहास सुमारे १६७ वर्षे जुना आहे. १८५९ मध्ये स्टेशनचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर अमरावतीच्या रेल्वे प्रवासाला ऐतिहासिक सुरुवात झाली. ब्रिटिशकालीन स्थापत्यशैलीत उभारलेली ही इमारत त्या काळातील बांधकामकलेचे महत्त्वपूर्ण उदाहरण मानली जाते.अमरावती आणि बडनेरा शहरांची ऐतिहासिक ओळख जपण्यासाठी सुमारे ५५ जुन्या वास्तू, इमारती आणि स्थळांचा वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे. याशिवाय सहा स्थळे आणि तलावांना पर्यटनस्थळ म्हणून मान्यता देण्यात आल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत वारसा यादीतील महत्त्वाच्या वास्तूचेच अस्तित्व धोक्यात आल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे

### वारसा स्थळांच्या संवर्धनाचे काय?

वारसा वास्तू जतन करण्यामागील प्रमुख उद्देश शहराचा इतिहास, स्थापत्यशैली आणि सांस्कृतिक ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हा असतो. मात्र, वारसा यादीत समाविष्ट असलेली वास्तूच पाडण्याची प्रक्रिया सुरू झाल्यास या यादीच्या उपयुक्ततेवरच प्रश्न उपस्थित होतो.

'जर ही वास्तू वारसा स्थळ म्हणून घोषित केली असेल, तर तिचे जतन का केले जात नाही?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने या प्रकरणात स्पष्ट भूमिका जाहीर करून पाडकामाची परवानगी कोणत्या प्राधिकरणाने आणि कोणत्या नियमांच्या आधारे दिली, याची माहिती सार्वजनिक करावी, अशी मागणी होत आहे.

### 'वारसा' आहे, त्याचे जतन का नाही?

माजी राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी ऐतिहासिक रेल्वे स्टेशनचे जतन करण्याची मागणी केली आहे. राज्य सरकारच्या वारसा यादीत समाविष्ट असलेली ही वास्तू कोणत्याही परिस्थितीत पाडली जाऊ नये, असे त्यांनी म्हटले आहे. या ऐतिहासिक वास्तूचे जतन व संवर्धन करून अमरावतीचा ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली.

ऐतिहासिक रेल्वे स्टेशनच्या पाडकामासाठी रेल्वे प्रशासनाने परवानगी दिली आहे की स्थानिक नगर नियोजन विभाग अथवा अन्य सक्षम प्राधिकरणाने, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम आहे. जर परवानगी देण्यात आली असेल, तर ती कोणत्या वारसा संवर्धनाच्या नियमांनुसार देण्यात आली, याची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. अमरावतीची ऐतिहासिक ओळख जपण्यासाठी सामाजिक संघटना, इतिहासप्रेमी आणि नागरिकांकडून आंदोलनाची तयारी सुरू असल्याचेही सांगितले जात आहे. त्यामुळे प्रशासन या प्रकरणी काय भूमिका घेते आणि १६७ वर्षे जुना हा ऐतिहासिक वारसा वाचवला जातो की नाही, याकडे अमरावतीकरांचे लक्ष लागले आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांची संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात सामाजिक भेट

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स (AI&DS) विभाग आणि FAID (Forum of AI Developer) फोरमच्या वतीने संत गाडगेबाबा परमधाम वृद्धाश्रमास सामाजिक भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता, माणुसकी आणि ज्येष्ठांप्रती आदराची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांसोबत मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या जीवनातील



अनुभव, आठवणी आणि कथा जाणून घेत विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत आनंदाचे क्षण घालवले. विद्यार्थ्यांनी ज्येष्ठांसोबत हास्यविनोद व संवाद साधत त्यांना आवश्यक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. विद्यार्थ्यांच्या सहवासामुळे वृद्धाश्रमातील वातावरण आनंदमय झाले.

हा उपक्रम केवळ सामाजिक भेट न राहता विद्यार्थ्यांसाठी माणुसकी, करुणा आणि कृतज्ञतेचा प्रेरणादायी अनुभव ठरला. तंत्रज्ञान हे भविष्यातील प्रगतीचे महत्त्वाचे साधन असले, तरी माणुसकी हीच समाजाची खरी पायाभूत शक्ती आहे, हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला.

या उपक्रमासाठी AI&DS विभागाचे विभागप्रमुख डॉ. अजय बी. गाडिचा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मीनल पारडे यांनी जबाबदारी सांभाळली, तर सहसमन्वयक प्रा. एम. एस. चिंचामलतपुरे यांनी सहकार्य केले. यावेळी प्रा. के. के. मोहोद आणि प्रा. एस. सी. पखाले यांचीही उपस्थिती होती.

FAID फोरमच्या अध्यक्षा श्रावणी गिरी,तसेच खुशी गुप्ता, प्रणिशिता बागडे आणि FAID टीमच्या सर्व सदस्यांनी या सामाजिक उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा उपक्रम अत्यंत अर्थपूर्ण व प्रेरणादायी ठरला.

## राजर्षी शाहू कॉलेजचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संकल्प

**चांदुर रेल्वे-**पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचा संदेश देण्यासाठी राजर्षी शाहू सायन्स कॉलेज, चांदूर रेल्वे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही 'मातीचे गणपती अभियाना' अंतर्गत पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या सिग्नेचर, वनस्पतिशास्त्र व गणित विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विक्री केंद्रात दि. १ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर या कालावधीत १०, १२, १४ आणि १६ इंच आकारातील सुबक मातीच्या गणेशमूर्ती अत्यंत प्रतीकात्मक आणि स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या मूर्ती महाविद्यालय परिसर आणि नगर परिषद संकुल, चांदूर रेल्वे येथे नागरिकांसाठी विक्रीस ठेवण्यात आल्या आहेत. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडनेरकर आणि आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. एस. ए. वाणी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले असून, प्रा. डॉ. गजानन संतापे, प्रा. डॉ. संपदा पाथरकर, प्रा. डॉ. रेखा केने व प्रा. डॉ. ममता पळसपगार यांनी विशेष परिश्रम घेतले.गणेशोत्सव श्रद्धेने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने मातीच्या गणेशमूर्ती खरेदी कराव्यात, असे आवाहन आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी संपर्क: प्रा. डॉ. संपदा पाथरकर - ९०९६६८२९५७,डॉ. आर. व्ही. केने - ८०८०९४९७२५

# कोंडेश्वरच्या २५ कोटींच्या विकासकामांना गती

## विविध विकासकामांचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा उत्साहात

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

ब वर्ग तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र कोंडेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनामार्फत मंजूर करण्यात आलेल्या २५ कोटी रुपयांच्या निधीतून विविध विकास कामांचा शुभारंभ व



लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी श्री क्षेत्र कोंडेश्वर संस्थानचे पदाधिकारी, सरपंच, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्याने आणि आ. रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कोंडेश्वर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. या निधीतून योग भवन, उद्योग भवन सभागृह, गणेश भवन, शंकर-पार्वती संकुल, प्राथमिक आरोग्य केंद्र यांसह विविध पायाभूत सुविधांची कामे करण्यात येणार आहेत. या कामांमुळे कोंडेश्वर तीर्थक्षेत्राचा धार्मिक, पर्यटन व सामाजिक विकासाला मोठी चालना मिळणार असून, भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

कार्यक्रमास श्री क्षेत्र कोंडेश्वर संस्थानचे अध्यक्ष रमेश पकडे, उपाध्यक्ष सुरेश टेटू, सहसचिव सुरेंद्र बारापात्रे, कोषाध्यक्ष परफुल वाठ, विश्वस्त रामकृष्ण लांडोरे, वीरेंद्र वासू चेकुले, आशिष अग्रवाल, प्रमोद राजनकर, प्रविण दातीर, देविदास बांडाबुचे, किशोर अंबाडकर यांची उपस्थिती होती. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, सभापती ॲड. प्रीती हर्षल रेवने, नगरसेवक अजय जयस्वाल, प्रशांत वानखडे, किशोर जाधव, संजय हिंगलासपुरे, दीपक सम्राट,विजय, नगरसेविका सुमती ढोके, रांजणी डोंगरे, नंदा मेघवानी, प्रियंका भूषण पाटणे, पांड, समाजसेवक लपीशेठ उर्फ चंद्रकुमार जाजोदिया, ह.भ.प. ॲड. सागर महाराज देशमुख, तसेच अमरावती तालुका अध्यक्ष अजय घुले उपस्थित होते.

अंजनगाव बारीच्या सरपंच/प्रशासक शोभा खडसे, उपसरपंच अरविंद निंबर्ते, कस्तुरा मोगरा येथील सरपंच सुधाकर काळे, वडगाव जिरेचे उपसरपंच अरुण मळगे, पार्डीचे सरपंच अक्षय मेश्राम, भानखेडा येथील उपसरपंच विनोद बंडाबुचे, नाना इंगोले, प्रमोद निचत,बंडू डकरे, शरद इंगोले, प्रवीण टवलारे, ओंकार मोहोळ, करमन, कांता राठोड, नंदा सावदे,आनंद वारी, सुनील निचत, दिनेश टेकाम, जगदीश अंबाडकर, महेश मूलचंदानी, प्रशांत वानखेडे, नितीन बोरकर, आशिष गावंडे, समाधान वानखेडे, सुनील राणा, आशीष कावरे, राजू हरने,देवानंद राठोड, उमेश ढोणे, शुभम उंबरकर यांच्यासह परिसरातील भाविक भक्त, नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री क्षेत्र कोंडेश्वरच्या विकासासाठी मंजूर झालेल्या २५ कोटी रुपयांच्या निधीतून होणाऱ्या विविध कामांमुळे तीर्थक्षेत्राच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, आगामी काळात कोंडेश्वर हे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकसित होण्यास मदत होणार आहे.

# प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

## 'एसआयआर'मध्ये जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार ३९५ मतदार

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीनुसार ८ विधानसभा मतदार संघामध्ये एकूण २१ लाख ९२ हजार ३९५ मतदारांची नोंद असून ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. जिल्ह्यातील एकूण मतदार केंद्रांची संख्या प्रस्तावित मतदान केंद्र आणि समायोजनाअंती २ हजार ६८२ वरून वाढून २ हजार ७०४ झाली आहे. सर्व पात्र मतदारांनी आणि वगळण्यात आलेल्या मतदारांनी ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ दरम्यान संबंधित मतदार नोंदणी अधिकारी, सहायक नोंदणी अधिकारी यांच्याकडे दावे व आक्षेप नोंदवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाद्वारे देशभरात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण हाती घेण्यात आले आहे. या मोहिमेचा तिसरा टप्पा महाराष्ट्रासह १६ राज्य व ३ केंद्रशासित प्रदेशात राबविला जात आहे. या मोहिमेअंतर्गत 'एकही पात्र नागरिक सुटणार नाही आणि एकही अपात्र नागरिक समाविष्ट होणार नाही.' या उद्दिष्ट्याने अमरावती जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत (बीएलओ) २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांच्या तपशिलाची प्रत्यक्ष खातर जमा करण्यात आली आहे. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याात आली आहे. यात जिल्ह्यातील एकूण ८ विधानसभा मतदार संघात ११ लाख २४ हजार ८३ पुरूष मतदार तर १० लाख ६८ हजार २५१ महिला मतदार आणि ६१ तृतीयपंथी मतदार असे एकूण २१ लाख ९२ हजार ३९५ मतदारांची नोंद करण्यात आली आहे. मय्यत मतदार वगळता जिल्ह्यातील एकही पात्र मतदार यादीमध्ये येण्यापासून वंचित राहू नये. या उद्देशाने पात्र मतदारांना गणनापत्रक बीएलओकडे जमा करण्यासाठी अधिकृत संकेतस्थळावर यादी उपलब्ध करून देण्यात आली होती. या प्रक्रियेअंती ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध प्रारूप मतदार यादीतून ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.



### ३ लाख ५३ हजार २८२ मतदारांची नावे वगळली ; २२ मतदान केंद्रांची वाढ,

### ३० सप्टेंबरपर्यंत दावे हरकती नोंदवा- जिल्हाधिकारी

### जिल्ह्यात २१ लाख ९२ हजार ३९५ मतदार-

प्रारूप मतदार यादीमध्ये धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघात १ लाख ३८ हजार ४६५ पुरूष, तर १ लाख ३० हजार ९३५ महिला मतदार आणि १ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ६९ हजार ४०१ मतदार नोंदण्यात आले आहेत. बडनेरा विधानसभा मतदार संघात १ लाख ५६ हजार ८३१ पुरूष, तर १ लाख ५३ हजार ९१५ महिला मतदार आणि ३२ तृतीयपंथी मतदार असे एकूण ३ लाख १० हजार ७७८ मतदार नोंदण्यात आले आहेत.

अमरावती विधानसभा मतदार संघात १ लाख ५१ हजार ८२ पुरूष, तर १ लाख ४८ हजार ५०४ महिला मतदार आणि १८ तृतीयपंथी मतदार असे एकूण २ लाख ९९ हजार ६०४ मतदार नोंदण्यात आले आहेत. तिवसा विधानसभा मतदार संघात १ लाख २८ हजार ९३ पुरूष, तर १ लाख १९ हजार १८६ महिला मतदार असे एकूण २ लाख ४७ हजार २७९ मतदार नोंदण्यात आले आहेत. (पान २ वर)

# पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्याची राहत्या घरी आत्महत्या

## इन्स्टावर स्टेटस ठेवून घेतला गळफास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अलहिलाल कॉलनी परिसरात राहणाऱ्या २१ वर्षीय पॉलिटेक्निक विद्यार्थ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोमवारी, ३१ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. मोहम्मद बिलाल मोहम्मद हनीफ असे मृत विद्यार्थ्याचे नाव असून, तो शहरातील एका महाविद्यालयात पॉलिटेक्निकच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी बिलाल बराच वेळ त्याच्या खोलीतून बाहेर न आल्याने कुटुंबीयांना संशय आला. त्यांनी खोलीचे दार उघडण्याचा प्रयत्न केला; मात्र आतून बंद असल्याने दार उघडता आले नाही. अखेर कुटुंबीयांनी दार तोडून



खोलीत प्रवेश केला असता बिलाल गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.


घाबरलेल्या कुटुंबीयांनी त्याला तातडीने खाली उतरवून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासणीनंतर त्याला मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच गाडगेनगर (पान २ वर)

# अचलपूर नाका ते माळवेशपुरा गेट पर्यंतचे सिमेंट कॉंक्रीटीकरण संशयाच्या भोवऱ्यात

## बांधकामात नियोजनाचा अभाव, माळवेशपुरा गेट अनेक दिवसापासून बंद

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील सर्वात महत्वाचा वाहतुकीची वर्दळ असणारा रस्ता म्हणजे मालवेशपुरा गेट ते अचलपूर नाका पर्यंत रस्त्याचे शासनाच्या साडे अकरा कोटीच्या निधीतून सिमेंट कॉंक्रीटीकरण चे बांधकाम सुरू झाले आहे .मात्र संबंधित ठेकदाराणे पुन्हा आपल्या मनमर्जीप्रमाणे शासकीय नियमांना तिलांजली देत या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे बांधकाम विविध त्रुटी मुळे चर्चेत आले आहे.

बांधकाम होत असताना नियोजन शून्य कारभार सुरू असल्याचे चित्र आहे .हा रस्ता वाहतूक वर्दळीचा मुख्य रस्ता असताना या रस्त्यावर बस स्थानक ,अचलपूर शहरातील जिल्हा स्त्री व बाल रुग्णालय, शहरातील शासकीय कार्यालय , बँक,शाळा , महाविद्यालय,व्यापार संकुल आदी कडे जाण्यासाठी अमरावती ,मोर्शी आदी शहरातून येणारे वाहन ,चारचाकी वाहन,दुचाकी , ऑटो



या रस्त्यावरून वाहतूक करतात. मात्र या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे बांधकाम सुरू असल्याने चक्क संबंधित ठेकेदाराने माळवेशपुरा गेट बंद केल्याने वाहतूक बंद झाली आहे.यामुळे वाहन चालकांना पर्यायी रस्त्याचा शोध घ्यावा लागत आहे .तसेच त्या ठिकाणी विकासकामांचा माहिती फलकांचा अभाव असल्याने ठेकेदार कोण आहे ? या निधीत कोणकोणती सुविधा उपलब्ध होणार आहे ? निधी किती व कोणत्या विभागाद्वारे आहे ? या माहितीपासून नागरिक अनभिज्ञ राहत आहे .या रस्त्यावर अनेक ठिकाणी रस्त्याचे बांधकाम लहान - मोठे झाल्याचा आरोप ही (पान २ वर)

# अतिदक्षता विभागाची नव्याने उभारणी करू

## - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे - बालकांच्या पालकांना ५ लाखांचा धनादेश प्रदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रूग्णालयातील आगीमध्ये ३ बालकांचा मृत्यू झाला आहे. ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. याठिकाणचा अतिदक्षता विभाग हा गरजूंसाठी महत्वाचा असल्याने अत्याधुनिक आणि सुसज्ज अतिदक्षता विभागाची नव्याने उभारणी करण्यात येईल, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

पालकमंत्री बावनकुळे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय मुरके हॉस्पीटल आणि जिल्हा स्त्री रूग्णालयाला भेट दिली. त्यानंतर



जिल्हाधिकारी कार्यालयात प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, रवी राणा, जिल्हाधिकारी आशिष येरेकर आदी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, रूग्णालयातील आपत्कालीन वेळेत नवजात शिशूंचे जीव वाचविणे ही प्राथमिकता होती. ३६ बालकांना तातडीने खासगी रूग्णालयात हलविण्यात आले. त्यांच्यावर यशस्वी उपचार झाल्याने या सर्व बालकांची प्रकृती आज ठिक झाली आहे. तसेच घटनेनंतर जिल्हा प्रशासनाशी सातत्याने संपर्कात राहून परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यात यश मिळविले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोग्य मंत्र्यांनी त्याच दिवशी भेट देऊन चौकशी समितीची घोषणा केली आहे. आरोग्य आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालानंतर दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल. मात्र भविष्यात अशा प्रकारच्या घटना होऊ नये, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

जिल्हा स्त्री रूग्णालयाला गेल्या दोन वर्षात आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करून देण्यात आला. यावर्षी (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी येथील माऊली मल्टीस्टेट बँकेचे व्यवहार ठप्प?

## लाखोच्या ठेवी अडकल्याने चिंतेचे वातावरण

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी येथील माऊली मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. च्या शाखेत ठेवीदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आणि चिंतेचे



वातावरण आहे. गेल्या एक महिन्यापासून ग्राहकांना त्यांच्या स्वतःच्या ठेवी काढता येत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. सोमवार, दिनांक ३१ ऑगस्ट रोजी अनेक ठेवीदार पुन्हा एकदा बँकेच्या शाखेत पैसे काढण्यासाठी गेले होते, मात्र त्यांना पुन्हा एकदा रिकाम्या हाताने परतावे लागले.ठेवीदारांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या महिनाभरापासून ते सातत्याने बँकेत फेऱ्या मारत आहेत. प्रत्येक वेळी बँक व्यवस्थापनाकडून 'सर्व्हर डाऊन आहे', 'हेड ऑफिसकडून क्लिअरन्स आले नाही' किंवा 'लिक्विडिटीची (पान २ वर)

# खारवगळ नाल्यावर पूल बांधा, अन्यथा आमरण उपोषण!

## घुईखेड परिसरातील शेतकऱ्यांचा प्रशासनाला इशारा

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील खारवगळ नाल्यावर तातडीने पक्का पूल बांधण्यात यावा, या मागणीसाठी परिसरातील शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, चांदूर रेल्वे येथे निवेदन सादर केले. येत्या एका आठवड्यात पुलाच्या कामाबाबत ठोस निर्णय न झाल्यास ७ सप्टेंबर २०२६ पासून खारवगळ नाल्याजवळ आमरण उपोषण करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. घुईखेड येथील खारवगळ



नाल्याच्या पलीकडे अनेक शेतकऱ्यांच्या शेतीजमिनी आहेत. मात्र पावसाळ्यात नाल्याला पूर आल्याने शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी जीव धोक्यात घालून नाला ओलांडावा लागतो. संततधार पावसामुळे नाल्याची पाणीपातळी (पान २ वर)

# मेंढपाळांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन

**शासन निर्णयावर अंमल करण्याची मागणी**

**अमरावती/प्रतिनिधीः-** संपूर्ण महाराष्ट्रात मेंढी चराई शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या प्रमुख मागणी साठी मेंढपाळ बांधवांनी आज सोमवार ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर ढोल वाजवा आंदोलन करून शासन प्रशासनाला झोपेतून जागे करण्याचा प्रयत्न केला.

येळकोट,येळकोट ,जय मल्हारच्या घोषणेने संपूर्ण परिसर दणाणून गेला. जनावरां सह मेंढपाळ बांधवानी हे आंदोलन केले.संपूर्ण महाराष्ट्रात मेंढी चराई



साठी राज्य शासनाने काढलेल्या २४ ऑगस्टच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करावी, स्थानिक परिस्थितीनुसार उपलब्ध होणाऱ्या वनक्षेत्रात चराईची परवानगी देण्याचे निर्देश द्यावे, सर्व जिल्ह्यांमध्ये मेंढी चराईसाठी उपलब्ध असलेले वनक्षेत्र, गायरान, ई-क्लास, झुडपी व पडीक जमीन तात्काळ निश्चित करून त्याची तालुकानिहाय यादी जाहीर करावी. यापूर्वी वनमंत्री गणेश नाईक आणि (पान २ वर)

# बसपाचे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन

## फ्रेजरपुरा परिसरातील देशी दारू व गांजा विक्रीला विरोध

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा परिसरात सुरू असलेल्या देशी दारू आणि गांजाच्या विक्रीला परिसरातील नागरिक आणि नगरसेवकांचा विरोध आहे. अवैध दारू आणि गांजा विक्री बंद करण्याच्या मागणीसाठी बहुजन समाज पार्टीच्या वतीने आज सोमवार ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत धरणे आंदोलन करण्यात आले. या नंतर ही मागणी पूर्ण



नाही झाली तर यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना निवेदनातून दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, फ्रेजरपुरा परिसरात अवैधरित्या सुरू असलेल्या देशी दारू आणि गांजाच्या विक्रीमुळे महिला वर्ग सर्वाधिक त्रस्त (पान २ वर)

# उपवर्गीकरणावरून संघर्ष पेटवण्याचे काम सरकारने करू नये- चरणदास इंगोले

## उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** राज्य सरकार हे अनुसूचित जातीतील संविधानिक आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याच्या विचारात आहे.तर दुसरीकडे उपवर्गीकरणाच्या विरोधात राज्यातील आंबेडकरवादी जनता पेटून उठत आहे. उपवर्गीकरण होऊ नये ही मागणी केवळ एका बौद्ध समाजाची नाही. एक जात सोडली तर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या ५८ जातीची आहे.त्यामुळे उपवर्गीकरणावरून आरक्षणात मोडणाऱ्या ५९ जातींमध्ये अंतर्गत सामाजिक



संघर्ष पेटवण्याचे काम राज्य सरकारने करू नये असा इशारा पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष चरणदास इंगोले यांनी चांदूर रेल्वे येथे उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना मार्च आगमना प्रसंगी बोलताना राज्य सरकारला दिला आहे.

विदर्भव्यापी उपवर्गीकरण विरोधी संघर्ष चेतना मार्च च्या पार्श्वभूमीवर (पान २ वर)

# आज 'डाक अदालत'

**अमरावती :** अमरावती विभागातील स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तु रजिस्टर पार्सल,बचत बँक व मनीऑर्डर आदी सहा आठवडयात निराकरण न झालेल्या तक्रारींच्या समाधानासाठी मंगळवार, १ सप्टेंबर रोजी प्रवर अधीक्षक डाकघर अमरावती यांच्या कार्यालयात सकाळी ११ वाजता डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सहा आठवडयात निराकरण न झालेल्या व समाधानकारक उत्तर न मिळालेल्या तक्रारींची डाक अदालतीत दखल घेण्यात येणार आहे.

या अदालतीत अर्ज सादर करताना तक्रारीचा सर्व तपशील ,तक्रारीची तारिख, ज्या अधिकाऱ्यांना तक्रार पाठविली त्यांचे नाव व हुद्दा आदींचा उल्लेख असावा. वेळेत प्राप्त अर्जांचा विचार डाक अदालतील केला जाईल, असे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी कळविले आहे.

# तरुणीवर अत्याचार, जीवे मारण्याची धमकी

## आरोपीविरुद्ध बलात्कारासह विविध कलमांत गुन्हा

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील अल्पवयीन मुलीच्या घरात घुसून तिच्यावर अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. अत्याचारानंतर पीडितेला व तिच्या आईला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप असून, पीडितेच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी ३० ऑगस्ट रोजी आरोपीविरुद्ध बलात्कारासह विविध गंभीर कलमांत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना १८ ऑगस्ट रोजी सकाळी ८ ते ११.३० वाजताच्या दरम्यान घडली. पीडिता घरात एकटी असताना आरोपी तिच्या घरात शिरला आणि त्याने आतून दरवाजा बंद केल्याचा आरोप आहे. पीडितेने आरोपीला घरात येण्याचे कारण विचारले असता त्याने तिच्याशी जबरदस्ती केल्याचे तक्रारीत नमूद आहे. पीडितेने प्रतिकार (पान २ वर)



# शिवकावड यात्रा रॅलीने मोर्शीनगरी दुमदुमली!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** शिव कावड यात्रा उत्सव समितीतर्फे श्रावण महिन्याचे औचित्य साधून देशभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या सालबर्डी येथील सातपुड्याच्या पायथ्याशी पहाडावर वसलेल्या भुयारात भोले शंकराच्या शिवलिंगावर पाणी सोडण्याकरिता काढण्यात आलेल्या कावड यात्रा रॅलीने मोर्शीनगरी दुमदुमली.

या कावड यात्रेदरम्यान उज्जैन येथील डमरू पथकाने उपस्थित भाविक भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कावड यात्रेची सुरुवात हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बालाजी मंदिर येथून सकाळी १० वाजता करण्यात




आली.सर्वप्रथम बालाजी मंदिर येथे निर्मलानंद स्वामी दादाजी, माधवदासजी महाराज, सोपान कनेरकर प्रबोधनकार महाराज यांच्या हस्ते कलशाचे पूजन करून कावड यात्रेला सुरुवात झाली. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा २५१ कलश खांद्यावर घेऊन महिला युवक युवतींची मिरवणूक छत्रपती शिवाजी चौक येथे पोहचताच कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव विपुल भडांगे,शिवसेनेचे उमेश शहाणे यांनी कावड यात्रेवर फुलांचा वर्षाव करून जोरदार स्वागत केले.नंतर ही कावड यात्रा जयस्तंभ चौक येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणपती मंदिरासमोर पोहोचताच त्या ठिकाणी रॅलीत ट्रॅक्टरवर सजविलेल्या झाक्यांवर जेसीपीद्वारे फुलांचा वर्षाव करण्यात आला.यावेळी संपूर्ण शहर भक्तिमय झाल्याचे चित्र दिसून येत होते.जयस्तंभ चौक येथील कावड यात्रेला संबोधित करतांना कळमनुरी मतदारसंघाचे आमदार संतोष बांगर यांनी ही कावड यात्रा सुरू करून धर्माला वाचविण्याचे काम तसेच हिंदू धर्म पताका घेऊन कार्य करण्याचे धाडस नगरसेवक रवी गुल्हाने व नगराध्यक्ष प्रतीक्षाताई गुल्हाने यांनी केले असल्याचे सांगीतले. पुढील कावड यात्रेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सुद्धा कावड यात्रेला (पान २ वर)

